| ९२. | अग्निशमन केंद्र अधिकारी | ०७ | ९३००-३४८०० | ४३०० | एस-१४ |
| ९३. | उप-अग्निशमन केंद्र अधिकारी | ०७ | ९३००-३४८०० | ४२०० | एस-१३ |
| ९४. | प्रमुख अग्निशमन विमोचन | २१ | ५२००-२०२०० | २४०० | एस-८ |
| ९५. | चालक यंत्र चालक | ४२ | ५२००-२०२०० | २००० | एस-७ |
| ९६. | अग्निशमन विमोचन | १४७ | ५२००-२०२०० | १९०० | एस-६ |
| ९७. | परिवहन व्यवस्थापक | ०१ | १५६००-३९१०० | ६६०० | एस-२३ |
| ९८. | शिक्षण अधिकारी | ०१ | १५६००-३९१०० | ६६०० | एस-२३ |
| ९९. | प्रशासन अधिकारी (शिक्षण) | ०१ | ९३००-३४८०० | ४३०० | एस-१४ |
| १००. | ग्रंथपाल | ०२ | ५२००-२०२०० | २८०० | एस-१० |
| १०१. | सहा-ग्रंथपाल | ०८ | ५२००-२०२०० | १९०० | एस-६ |
| १०२. | आरेखक | ११ | ५२००-२०२०० | २८०० | एस-१० |
| १०३. | अनुरेखक | ०५ | ५२००-२०२०० | २००० | एस-७ |
| १०४. | मुख्य सर्व्हेअर | ०२ | ९३००-३४८०० | ४२०० | एस-१३ |
| १०५. | सर्व्हेअर | ०६ | ५२००-२०२०० | २००० | एस-७ |
| १०६. | विजतंत्रि | १९ | ५२००-२०२०० | २४०० | एस-८ |
| १०७. | सहा-विजतंत्रि | ०९ | ५२००-२०२०० | १९०० | एस-६ |
| १०८. | तारतंत्रि | २४ | ५२००-२०२०० | १९०० | एस-६ |
| १०९. | सहा-आरोग्यप्रमुख | ०२ | ९३००-३४८०० | ४४०० | एस-१५ |
| ११०. | एनव्हायर्नमेंट मॅनेजर | ०१ | १५६००-३९१०० | ६६०० | एस-२३ |
| १११. | मुख्य आरोग्य निरिक्षक | ०४ | ९३००-३४८०० | ४४०० | एस-१५ |
| ११२. | वरिष्ठ आरोग्य निरिक्षक | २३ | ९३००-३४८०० | ४३०० | एस-१४ |
| ११३. | आरोग्य निरिक्षक | ४८ | ५२००-२०२०० | २४०० | एस-८ |
| ११४. | वैद्यकीय अधिकारी | ०९ | १५६००-३९१०० | ५४०० | एस-२० |
| ११५. | शहर अभियंता (स्थापत्य) | ०२ | १५६००-३९१०० | ७६०० | एस-२५ |
| ११६. | कार्यकारी अभियंता (स्थापत्य) | १२ | १५६००-३९१०० | ६६०० | एस-२३ |
| ११७. | उप-अभियंता (स्थापत्य) | ५८ | १५६००-३९१०० | ५४०० | एस-२० |
| ११८. | शाखा अभियंता (स्थापत्य) | ५३ | ९३००-३४८०० | ४४०० | एस-१५ |
| ११९. | कनिष्ठ अभियंता (स्थापत्य) | १३५ | ९३००-३४८०० | ४३०० | एस-१४ |
| १२०. | शहर अभियंता (पाणीपुरवठा) | ०१ | १५६००-३९१०० | ७६०० | एस-२५ |
| १२१. | कार्यकारी अभियंता (विद्युत) | ०३ | १५६००-३९१०० | ६६०० | एस-२३ |
| १२२. | उपअभियंता (विद्युत) | ०७ | १५६००-३९१०० | ५४०० | एस-२० |
| १२३. | शाखा अभियंता (विद्युत) | ०४ | ९३००-३४८०० | ४४०० | एस-१५ |
| १२४. | कनिष्ठ अभियंता (विद्युत) | २९ | ९३००-३४८०० | ४३०० | एस-१४ |
| १२५. | वैद्यकीय (आरोग्य) अधिकारी | ०१ | ९३००-३४८०० | ५४०० | एस-२० |
| १२६. | उप आरोग्य अधिकारी | ०२ | ९३००-३४८०० | ४४०० | एस-१५ |
| १२७. | सहाय्यक आरोग्य अधिकारी | ०४ | ९३००-३४८०० | ५४०० | एस-२० |
| १२८. | वैद्यकीय अधिक्षक | ०२ | १५६००-३९१०० | ६६०० | एस-२३ |
| १२९. | चेस्ट स्पेशालिस्ट | ०२ | १५६००-३९१०० | ६६०० | एस-२३ |
| १३०. | आय. सी. यु. फिजीशियन | ०२ | १५६००-३९१०० | ५४०० | एस-२० |
| १३१. | इन्टेसिव्हिस्ट | ०१ | १५६००-३९१०० | ६६०० | एस-२३ |
| १३२. | शल्य विशारद (निवासी) | ०४ | ९३००-३४८०० | ५४०० | एस-२० |
| १३३. | स्त्री रोग तज्ज्ञ | ०४ | १५६००-३९१०० | ६६०० | एस-२३ |

| | | | | | |
|---|---|---|---|---|---|
| १३४. | बाल रोग तज्ज्ञ | ०४ | १५६००-३९१०० | ६६०० | एस-२३ |
| १३५. | क्ष-किरण तज्ज्ञ | ० | ९३००-३४८०० | ४२०० | एस-१३ |
| १३६. | न्याय वैद्यकशास्त्र तज्ज्ञ | ०२ | १५६००-३९१०० | ६६०० | एस-२३ |
| १३७. | विकृतीशास्त्र तज्ज्ञ | ०२ | १५६००-३९१०० | ६६०० | एस-२३ |
| १३८. | बधिरीकरण तज्ज्ञ | ०४ | १५६००-३९१०० | ६६०० | एस-२३ |
| १३९. | अस्थिव्यंग तज्ज्ञ | ०२ | १५६००-३९१०० | ६६०० | एस-२३ |
| १४०. | कान, नाक, घसा तज्ज्ञ | ०२ | १५६००-३९१०० | ६६०० | एस-२३ |
| १४१. | दंत शल्यचिकीत्सक | ०१ | ९३००-३४८०० | ५४०० | एस-२० |
| १४२. | मानसोपचार तज्ज्ञ | ०२ | १५६००-३९१०० | ६६०० | एस-२३ |
| १४३. | त्वचा व गुप्तरोग तज्ज्ञ | ०२ | १५६००-३९१०० | ६६०० | एस-२३ |
| १४४. | नेत्र शल्य चिकीत्सक | ०२ | १५६००-३९१०० | ६६०० | एस-२३ |
| १४५. | मेडीकल ॲडमिनिस्ट्रेटिव्ह ऑफिसर | ०२ | १५६००-३९१०० | ५४०० | एस-२० |
| १४६. | शहर क्षयरोग अधिकारी | ०१ | १५६००-३९१०० | ६६०० | एस-२३ |
| १४७. | भौतिकोपचार तज्ज्ञ | ०१ | ९३००-३४८०० | ४३०० | एस-१४ |
| १४८. | आहारतज्ज्ञ | ०१ | ९३००-३४८०० | ४३०० | एस-१४ |
| १४९. | फिजीशियन | ०४ | १५६००-३९१०० | ५४०० | एस-२० |
| १५०. | निवासी वैद्यकीय अधिकारी/ वैद्यकीय अधिकारी | ४७ | १५६००-३९१०० | ५४०० | एस-२० |
| १५१. | आयुर्वेदिक वैद्यकीय अधिकारी | २७ | १५६००-३९१०० | ५४०० | एस-२० |
| १५२. | जीवरसायन तज्ज्ञ (बायोकेमिस्ट) | ०१ | १५६००-३९१०० | ६६०० | एस-२३ |
| १५३. | व्हेटर्नरी ऑफिसर | ०१ | ९३००-३४८०० | ४४०० | एस-१५ |
| १५४. | वरिष्ठ औषध निर्माता | ०२ | ९३००-३४८०० | ४२०० | एस-१३ |
| १५५. | औषध निर्माता | ०३ | ५२००-२०२०० | २८०० | एस-१० |
| १५६. | कक्ष सेवक/सेविका | १२ | ४४४०-७४४० | १३०० | एस-१ |
| १५७. | अधिसेविका (मेट्रन) | ०२ | ९३००-३४८०० | ४४०० | एस-१५ |
| १५८. | परिसेविका (सहाय्यक मेट्रन) | १० | ९३००-३४८०० | ४४०० | एस-१५ |
| १५९. | स्टाफ नर्स/नर्स मिडवाईफ | १४९ | ९३००-३४८०० | ४२०० | एस-१३ |
| १६०. | प्रसविका/परिचारिका (ए.एन.एम.) | १२५ | ५२००-२०२०० | २४०० | एस-८ |
| १६१. | सांख्यिकी अधिकारी | ०१ | ९३००-३४८०० | ४३०० | एस-१४ |
| १६२. | उप निबंधक (जन्म-मृत्यु) | ०१ | ९३००-३४८०० | ४४०० | एस-१५ |
| १६३. | आया | ०४ | ४४४०-७४४० | १३०० | एस-१ |
| १६४. | समुपदेशी | ०४ | ९३००-३४८०० | ४३०० | एस-१४ |
| १६५. | मलेरिया ऑफिसर | ०१ | ९३००-३४८०० | ४४०० | एस-१५ |
| १६६. | सफाई कामगार | ४९८ | ४४४०-७४४० | १३०० | एस-१ |
| १६७. | मुकादम | २३ | ४४४०-७४४० | १६०० | एस-३ |
| १६८. | वाहन चालक | २६ | ५२००-२०२०० | १९०० | एस-६ |
| १६९. | मजुर | ७१ | ४४४०-७४४० | १३०० | एस-१ |
| १७०. | सुतार | ०२ | ५२००-२०२०० | १९०० | एस-६ |
| १७१. | गवंडी | ०२ | ५२००-२०२०० | १९०० | एस-६ |
| १७२. | जमादार/हवालदार | ०५ | ४४४०-७४४० | १६०० | एस-३ |

| | | | | | |
|---|---|---|---|---|---|
| १७३. | विद्युत पर्यवेक्षक | १६ | ९३००-३४८०० | ४२०० | एस-१३ |
| १७४. | शिपाई | १२३ | ४४४०-७४४० | १३०० | एस-१ |
| १७५. | व्हॉलमन | ०६ | ४४४०-७४४० | १३०० | एस-१ |
| १७६ | ड्रेसर कम प्युन | ०२ | ४४४०-७४४० | १३०० | एस-१ |

मा. शासन निर्णय क्र. सनिव-२०१९/प्र.क्र.५८/सेवा-४, दिनांक २४ जानेवारी २०१९ च्या शासन निर्णयान्वये दि. १ जानेवारी, २०१६ पुर्वीच्या निवृत्तीवेतनधारकांच्या निवृत्तीवेतनात/कुटुंब निवृत्ती वेतनात ७ व्या वेतन आयोगानुसार सुधारणा करण्याबाबत निर्देश देण्यात आले आहेत. सदर निर्देशाच्या अनुषंगाने महानगरपालिकेतील सेवानिवृत्त अधिकारी/कर्मचारी यांना, त्यांच्या वारसांना ७ व्या वेतन आयोगानुसार सुधारीत निवृत्तीवेतन/कुटूंब निवृत्तीवेतन व इतर अनुषंगिक लाभ लागू करण्याची शिफारसी या द्वारे लागू करण्यात येत आहे.

मा. राज्य शासनाने ६ व्या वेतन आयोगामध्ये सुधारीत सेवाअंतर्गत आश्वासित प्रगती योजना ही संपूर्ण सेवा कालावधीत दोन लाभाची योजना होती. मा. शासनाच्या वित्त विभागाकडील शासन निर्णय क्र. वेतन १९१९/प्र.क्र.३/२०१९/सेवा-३, दिनांक २ मार्च २०१९ अन्वये सातवा वेतन आयोगामध्ये राज्य शासनाचे कर्मचाऱ्यांना १०-२०-३० वर्षाचे सेवेनंतर तीन लाभांची सुधारित सेवा अंतर्गत आश्वासित प्रगती योजना लागु करण्याची शिफारस केलेली आहे. त्यानुसार महानगरपालिका आस्थापनेवरील १०-२०-३० वर्षांची सेवा पूर्ण करणाऱ्या कर्मचाऱ्यांना उपरोल्लेखीत शासन निर्णयातील शिफारशीप्रमाणे १०-२०-३० या प्रमाणे तीन लाभ देण्यास या द्वारे मान्यता देण्यात येत आहे.

सदरचा परिपूर्ण प्रस्ताव शासनाकडे पाठविण्यात यावा व शासन मान्यता मिळताच महानगरपालिकेच्या कर्मचाऱ्यांना १ जानेवारी, २०१६ पासून ७ व्या वेतन आयोगानुसार वेतनश्रेणी लागू करुन फरक व इतर देय रक्कमा देणेस मान्यता देत आहे.

16/8/2020

आयुक्त तथा प्रशासक
वसई विरार शहर महानगरपालिका

# वसई-विरार शहर महानगरपालिका

मुख्य कार्यालय, विरार पुर्व, जि. - पालघर, पिन नं. ४०१ ३०५
दुरध्वनी - ०२५०-२५२५१०१/०२/०३/०४/०५/०६, फॅक्स - ०२५०-२५२५१०७,
ई-मेल vasaivirarcorporation@yahoo.com

---

**प्रशासकीय ठराव क्र.** ५६ विभाग :- पाणी पुरवठा
दिनांक :- १४/०७/२०२०

---

**प्रस्तावाचा विषय** :- खोलसापाडा -२ लघु पाटबंधारे योजना ता. वसई, जि. पालघर हा प्रकल्प ठेव तत्वावर पिण्याच्या पाण्याचा स्त्रोत म्हणुन विकसित करणे.

**प्रस्तावाचा मजकूर** :- खोलसापाडा - २ ल.पा. योजना, ता. वसई, जि. पालघर या प्रकल्पास सन १९८४ मध्ये मूळ प्रशासकीय मान्यता शासन निर्णय क्रमांक लपायो/१०८३/२९९/(१५६/०२), जसअ-३ मंत्रालय, मुंबई दिनांक ३१/०१/१९८४ अन्वये रू. ६८.८२ लक्ष इतक्या किंमतीस मान्यता मिळालेली आहे. या योजनेचे सुधारित अंदाजपत्रक सन २००८-२००९ च्या प्रादेशिक दरसूचीनुसार तयार करण्यात आलेले होते व त्यास शासन निर्णय क्रमांक लपायो/२००९/(२५६/२००९)/खारभूमी, मंत्रालय, मुंबई दिनांक २९/०८/२००९ नुसार रक्कम रुपये १५५२ लक्ष इतक्या किंमतीस प्रथम सुधारित प्रशासकीय मान्यता प्राप्त झाली आहे. या योजनेचे सुधारीत अंदाजपत्रक सन २००८-०९ च्या दरसुचीनुसार तयार करण्यात आले होते.

तसेच सदर योजनेची निविदा प्रक्रिया २००९ मध्ये पूर्ण झाली असून या प्रकल्पाचे रू. १०९६.९८ लक्ष इतक्या किंमतीस कार्यारंभ आदेश मुख्य धरणाचे बांधकाम व इतर अनुषांगिक कामे, निविदा क्र.ब-१/९ सन २०१०-११ अन्वये मे. एस.एस.मुचंडी, कोल्हापूर यांना दिनांक ८/३/२०११ अन्वये देण्यात आले आहेत. परंतू प्रकल्पास लागणारा निधी उपलब्ध न झाल्याने प्रकल्पास लागणाऱ्या वनजमीनीस वर्तमान मुल्य (NPV) न भरल्याने अंतिम मान्यता न मिळाल्याने कामास अद्याप पर्यंत सुरवात करण्यात आलेली नाही.

सदर योजना पूर्वी सिंचनासाठी प्रस्तावित होती. परंतु सद्य:स्थितीत योजनेचा मुख्यउद्देश हा वसई-विरार शहर महानगरपालिकेस पिण्यासाठी पाणीपुरवठा कारणे असून वसई-विरार शहर महानगरपालिकेने सर्वसाधारण सभा ठराव क्र. १८ दिनांक १९/९/२०१८ अन्वये रू. ३५ कोटी इतक्या अंदाजीत रक्कमेस आर्थिक व प्रशासकीय मान्यता देण्यात आली असून दिनांक २/११/२०१८ च्या पत्रान्वये लघुपाटबंधारे विभागास कळविले आहे. याबाबत शासनाने सुध्दा शासन निर्णय क्र.बिसिंआ-(२०१९/२९०/१९) सिं.व्य.(धो) मंत्रालय, मुंबई ४०००३२ दिनांक ३१/८/२०१९ अन्वये पिण्याच्या पाण्यासाठी पाणीपुरवठा प्रकल्प म्हणून प्रकल्पाचा पुर्ण पाणीसाठी ३.४१८ द.ल.घ.मी. राखीव ठेवणे बाबत मान्यता दिली आहे.

तसेच योजनेस लागणाऱ्या ३०.८७ हे. इतक्या वनजमिन प्रस्तावास केंद्र शासनाच्या पर्यावरण व वन मंत्रालय विभागाचे पत्र क्र. एफसी. एमएचसी /००७ /२०१४/बीएचओ/२५६५, दिनांक २१/०९/२०१७ अन्वये तत्वत: मान्यता प्राप्त झाली आहे. तत्वत: मान्यतेच्या अटीनुसार वन विभागास वन जमिनीचे वर्तमान मुल्य (NPV) वन विभागास अदा करावयाची आहे. या प्रमाणे सदर प्रकल्प अहवालामध्ये सादर केलेल्या सर्व लेखाशिर्षाखालील तरतुदींची माहिती खालील प्रमाणे असल्याचे पाटबंधारे विभागाने कळविले आहे.

**अ, प्राथमिक :-**

सदर लेखाशिर्षाखाली सर्वेक्षणाच्या कामासाठी सीमांकन करणे, मोजणी इ. बाबींचा समावेश करण्यात आला आहे. यामध्ये प्रथम अंदाजपत्रकामध्ये "अ" प्राथमिक सर्वेक्षणाच्या कामाकरिता रू. ७.८ लक्ष इतकी तरतूद करण्यात आली होती. सद्य:स्थितीत त्यावर एकूण ८.७० लक्ष इतकी रक्कम खर्च झाली आहे. प्रकल्पाच्या कामाकरिता विमोचक व सांडवा यांचे संकल्पन प्राप्त करुनघेणेसाठी लागणाऱ्या सर्वेक्षण, सीमांकन व मोजणी करणे करिता रू. १०.६६ लक्ष (सामाईक दरसूची सन २०१८-१९) इतकी तरतुद करण्यात आली आहे.

**भुसंपादन, वनझाडे व फळझाडे :-**

या योजनेच्या धरण व बूडीत क्षेत्रासाठी ३०.८७ हे. वन जमिन संपादित करावी लागणार आहे. त्यासाठी वनविभागाची तत्व:मान्यता प्राप्त झाली असून तत्वत: मान्यता पत्रातील अटींची पुर्तता केल्यानंतरच वनजमिनीचे भुसंपादन करण्यात येईल. त्यासाठी लागणाऱ्या रू. ११.६९ कोटी वनजमिनीच्या वर्तमानमुल्याच्या रकमेचा समावेश सुधारीत अंदाजपत्रकात करण्यात आलेला आहे.

**मातीधरण :-**

या योजनेच्या धरणाची लांबी ३६५ मी. असून उंची ३०.२५ मी. इतकी आहे. या योजनेच्या धरणाचे सुधारीत काटछेदाचे संकल्पन मध्यवर्ती संकल्पचित्र संघटना, नाशिक यांचेकडून प्राप्त झाले आहे व धोरणाचे काटछेद मा. मुख्य अभियंता कोकण प्रदेश, मुंबई यांनी दि. १४/११/२०१९ रोजी मान्यता दिलेली आहे. सदर काटछेदानुसार सुधारित अंदाजपत्रकाची किंमत रू. कोटी इतकी आहे.

**दळणवळण (R-Communication) :-**

यापुर्वी दळणवळणासाठी रस्त्याच्या बांधकामाची तरतूद ढोबळ मानाने रू. ४.१५ लक्ष इतकी करण्यात आली होती. सदरच्या अंदाजपत्रकातील रक्कम रू. ६२.३७ लक्ष इतकी झाली असून GST २.९७ लक्ष इतकी येत आहे. सदरच्या अंदाजपत्रकात धरणाच्या पोहोच रस्त्याकरीता सार्वजनिक बांधकाम विभागाच्या सन २०१९-२० दरसूची नूसार (WBM) रस्त्याची तरतुद करण्यात आली आहे.

यापुर्वी या प्रकल्पाच्या रू. १५५२.८४ लक्ष इतक्या किंमतीच्या अंदाजपत्रकास सुधारीत प्रशासकिय मान्यता मिळालेली आहे. सदर प्रशासकिय मान्यताप्राप्त अंदाजपत्रकावर रू. ४१८५.८६ लक्ष ने वाढ झाली आहे. त्या अनुषंगाने प्रकल्पाचे रू. ५७३८.७० लक्ष इतक्या किंमतीचे सुधारीत अंदाजपत्रक प्रशासकीय मान्यतेसाठी सादर करण्यात आले आहे. परंतू प्रकल्पास लागणारा निधी उपलब्ध न झाल्याने कामावर

खर्च करण्यात आलेला नाही. सदर अंदाजपत्रकात धरण शिर्ष कामे व इतर या अनुषंगाने प्रकल्पाच्या किंमतीत झालेल्या वाढीची सविस्तर वर्गवारी खालील प्रमाणे आहे.

**१. दरसूचीच्या दरातील वाढीमुळे :- (३६.२२%)**

मुळ प्रशासकीय मान्यतेच्या वेळी सन २००८-०९ च्या दरसूचीचा वापर करण्यात आला होता. व त्यावर सुधारीत भाववाढ विचारात घेण्यात आली आहे. सन २०१८-१९ ची जलसंपदा विभागाची दरसूची वापरण्यात आली आहे व काही बाबी (Bridge & Road) साठी सार्वजनिक बांधकाम विभागाचे सन २०१९-२०ची दरसूची वापरण्यात आली आहे. त्यामुळे प्रकल्पाच्या खर्चात रु. १५१६.२७ लक्ष (३६.२२%) वाढ झाली आहे.

**२. भूसंपादनातील किंमतीतील वाढीमुळे (२२.२९%)**

या योजनेच्या धरण व बुडीत क्षेत्रासाठी ३०.८७ हे. वनजमिन संपादित करावी लागणार आहे. मूळ प्रशासकीय मान्यतेच्या वेळी भुसंपादनाच्या प्रक्रियेसाठी रु. ३५२.७ लक्ष इतक्या रकमेची तरतूद करण्यात आली होती. सद्य:स्थितीत सुधारित वर्तमान मुल्यासहित रु. १२८५.५३ लक्ष इतकी रक्कम आवश्यक असल्याने निव्वळ वाढ रु. ९३३.२६ लक्ष (२२.२९%) इतकी येत आहे.

**३. संकल्पचित्रातील बदल (४.४८%)**

धरणाच्या सुधारीत काटछेदाचे संकल्पन मध्यवर्ती संकल्पचित्र संघटना नाशिक यांचेकडून प्राप्त झाले असून सुधारित अंदाजपत्रक तयार करण्यात आले आहे. सांडव्याचे व मुख्य विमोचकाचे संकल्पन पर्यंत प्राप्त न झाल्याने ढोबळ मानाने तरतूद करण्यात आलेली आहे. सुधारित काटछेद व ढोबळ मानाने तरतुद केल्यामुळे प्रकल्पाच्या खर्चात रु. १८७.२२ लक्ष (४.४८ % ) वाढ झाली आहे.

**४. इतर कारणे (३६.७७%)**

मूळ प्रशासकीय मान्यतेच्या वेळी जीएसटी लागू करण्यात आली नव्हती. सुधारित अंदाजपत्रकात येणारी किंमत रु. १५३९.११ लक्ष ही निव्वळ वाढ (३६.७७%) झालेली आहे.

सदरचा प्रकल्प हा वसई-विरार शहर महानगरपालिकेकरिता पिण्याच्या पाण्यासाठी राबविण्यात येणार असल्याने अत्यावश्यक सेवेमध्ये समावेश होत आहे. सदर प्रकल्पासाठी अंदाजे ५७३८.७० लक्ष इतका खर्च येणार असून त्याबाबचा MOU (सामंजस्य करार) होऊन सदरची रक्कम मिळाल्यानंतर वनजमिनीच्या दुसऱ्या टप्यास (अंतिम मान्यता) मंजूरी घेऊन, प्रकल्पाचे व्दितीय सुधारीत अंदाजपत्रक तयार करण्यात आले असून दि. १२/०२/२०२० च्या पत्रान्वये महानगरपालिकेकडे सुधारीत अंदाजपत्रक आर्थिक व प्रशासकीय मान्यतेसाठी सादर करण्यात आले आहे.

सदर अंदाजपत्रकाची पडताळणी केली असता रॉयल्टीसाठी रु. ६,००,२१,२६२/- इतकी रक्कम समाविष्ट केली आहे. सदर बाब वगळता अंदाजपत्रकातील अन्य समाविष्ट बाबी योग्य असल्याचे वाटते. सदर रॉयल्टीसाठी गृहित धरलेला बाबीचा अंदाजपत्रकीय खर्च वगळता रु. ५१,३८,४८,७३८/- किंमतीचे अंदाजपत्रक होत आहे. सदर खर्च हा सन २०२०-२१, २०२१-२२ व २०२२-२३ या त्रैवार्षिक वर्षात होणार असून जलसंपदा विभागास पहिल्या टप्प्यात अंदाजे रु. २० कोटी

(NPV व प्रकल्प कामांसाठी) सन २०२०-२१ या वर्षात वर्ग करावयाचे झाल्यास सन २०२०-२१ च्या अर्थसंकल्पातील "खोलसापाडा धरण १ व २" या लेखाशिर्षाअंतर्गत रु. ६० कोटी तरतूद मधुन खर्च भाविणे शक्य आहे.

तरी खोलसापाडा -२ लघु पाटबंधारे योजना ता. वसई, जि. पालघर हा प्रकल्प ठेव तत्वावर पिण्याच्या पाण्याचा स्त्रोत म्हणुन विकसित करणे कामी सादर केलेल्या रु. ५१,३८,४८,७३८/- सुधारीत अंदाजपत्रकीय खर्चास आर्थिक व प्रशासकीय मान्यतेचा प्रस्ताव मा.आयुक्त तथा प्रशासक सो, यांच्या मंजुरीस्तव सादर.

---

**ठराव :-** १) खोलसापाडा - २ लघुपाटबंधरे योजना ता.वसई, जि.पालघर हा प्रकल्प वसई विरार शहर महानगरपालिकेस पिण्याच्या पाण्यासाठी आरक्षित करण्यास व सदर प्रकल्प पुर्ण ठेव तत्वावर पाटबंधारे विभागामार्फत राबविण्यास व रु. ३५ कोटी खर्चास मा.सर्वसाधारण सभा ठ.क्र १८ दि.१९/०९/२०१८ अन्वये मान्यता प्राप्त असून शासन निर्णय दि.३१/०८/२०१९ अन्वये महापालिकेस मोठया प्रमाणात पाण्याच्या हक्क प्रस्तावास मान्यता दिली आहे.

२) पाटबंधारे विभागाने सन १८/१९ च्या दरसुचीवर आधारीत तयार केलेल्या सुधारीत अंदाजपत्रक रु.५७,३८,७०,०००/- मधून मातीच्या रॉयल्टीसाठीची रक्कम रु. ६,००,२१,२६२/- वजा करून उर्वरित रु. ५१,३८,४८,७३८/- च्या सुधारीत अंदाजपत्रकास आर्थिक व प्रशासकीय मान्यता देण्यात येत आहे.

३) सदर कामी पाटबंधारे विभागासोबत आवश्यक अटी-शर्तीचा करारनामा करण्यास मान्यता देण्यात येत आहे.

४) वन जमिन संपादित करणेसाठी भरावी लागणारी N.P.V ची रक्कम रु.११.६९ कोटी व धरणाच्या कामासाठी पाटबंधारे विभागामार्फत येणाऱ्या मागणी नुसार रक्कम वर्ग करण्यास मान्यता देण्यात येत आहे.

14/8/2020.

(गंगाथरन डी.)
आयुक्त तथा प्रशासक
वसई-विरार शहर महानगरपालिका

# वसई-विरार शहर महानगरपालिका

मुख्य कार्यालय, विरार पुर्व, जि. - पालघर, पिन नं. ४०१ ३०५
दुरध्वनी - ०२५०-२५२५१०१/०२/०३/०४/०५/०६, फॅक्स ०२५०-२५२५१०७,
ई-मेल- vasaivirarcorporation@yahoo.com

प्रशासकीय ठराव क्र. ५२

विभाग: सामान्य प्रशासन
दिनांक :२४/८/२०२०

**प्रस्तावाचा विषय:- कोविड-१९ उपचार केंद्रावर रुग्णांकरिता पिण्याचे पाणीसाठी आर.ओ.वॉटर फिल्टर खरेदी करणेकामी येणा-या खर्चास प्रशासकीय वित्तीय मंजुरीबाबत.**

**प्रस्तावाचा मजकूर :-** वसई-विरार शहर महानगरपालिका क्षेत्रामध्ये कोविड-१९ साथीचे रोगाची लागण झालेली असून कोविड-१९ पॉझिटीव्ह रुग्ण दिवसेंदिवस वाढत आहेत. महानगरपालिकेने खालील ठिकाणी आयसोलेशन केंद्र व कोविड उपचार केंद्र तयार केलेले आहेत.

| अ.क्र. | ठिकाण | प्रकार | रुग्ण संख्या / स्टाफ संख्या |
|---|---|---|---|
| १. | म्हाडा इमारत क्रं. १० विरार (प) | विलगीकरण केंद्र | ३५० रुग्ण |
| २. | म्हाडा इमारत क्रं. १४ विरार (प) | डॉक्टर, नर्स, कर्मचारी निवास व्यवस्था | ७५ स्टाफ |
| ३. | गोन्सालो गार्सिया कॉलेज, वसई(प) | उपचार केंद्र | ५०० रुग्ण |

वरील ठिकाणी पेशंट, डॉक्टर व इतर स्टाफ यांना पिण्याचे पाण्याची व्यवस्था नसल्याने २० लिटर बाटली बंद जार द्वारे पिण्याचे पाण्याच्या पुरवठा करण्यातं येत आहे. परंतू पावसाळा असल्याने पूरपरिस्थिती निर्माण झाल्यास पिण्याचे पाणी पोहचण्यास विलंब झाला तर पेशंटचे हाल होतील त्याकरिता सदर ठिकाणी आर.ओ. वॉटर फिल्टर बसविण्यास दैनंदिन पिण्याचे पाणी पूरवठा सुरळीत राहील व खर्च वाचेल. तसेच कोविड-१९ साथ संपल्यानंतर सदर आर.ओ.वॉटर फिल्टर मनपा कार्यालयाकरिता वापर करता येतील. त्याकरीता खालील प्रमाणे आर.ओ.वॉटर फिल्टर खर्च येईल.

| अ.क्र | ठिकाण | क्षमता | आवश्यक नग | दर प्रति नग | एकूण |
|---|---|---|---|---|---|
| १. | गोन्सालो गार्सिया कॉलेज, वसई (प) | ३०० लिटर | आर.ओ.वॉटर - १ नग | २,२०,००० | २,२०,००० |
| | | १००० लिटर | टँक - १ नग | १२,६०० | १२,६०० |
| २. | म्हाडा इमारत क्रं. १० विरार (प) | ३०० लिटर | आर.ओ.वॉटर - १ नग | २,२०,००० | २,२०,००० |
| | | १००० लिटर | टँक - १ नग | १२,६०० | १२,६०० |
| ३. | म्हाडा इमारत क्रं. १४ विरार (प) | १०० लिटर | आर.ओ.वॉटर - १ नग | १०५००० | १०५००० |
| | | ५०० लिटर | टँक - १ नग | ६३०० | ६३०० |
| | | | | एकूण | ५७६५०० |
| | | | | १८%GST | १०३७७० |
| | | | | एकूण | ६,८०,२७०/- |

तसेच सदरचा खर्च सन २०२०-२१ मधील नैसर्गिक आपत्ती विभाग अंतर्गत नैसर्गिक आपत्ती साहित्य खरेदी या लेखाशिर्ष अंतर्गत करण्यात येईल.

तरी उपरोक्त आर.ओ.वॉटर फिल्टर म्हाडा इमारत क्रं. १० विरार, म्हाडा इमारत क्रं. १४ विरार व गोन्सालो गार्सीया कॉलेज,वसई येथील येथील उपचार केंद्रावर खरेदी करण्यास महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियम १९४९ चे कलम ६७ (३) क अन्वये मा. आयुक्त सो. यांना असलेले अधिकारानुसार विना निविदा पूरवठादार रोहन नाईक यांचेकडून तात्काळ थेट खरेदीस येणाऱ्या रक्कम रु. ६,८०,२७०/- खर्चास मा. आयुक्त तथा प्रशासक यांचे प्रशासकीय व वित्तीय मंजुरीस्तव सविनय सादर.

ठराव :- सदर साहित्य कोविड-१९ प्रतिबंधक उपाययोजनेकरिता आवश्यक आहे. तरी उपरोक्त प्रस्तावा मधील वरील आर.ओ.वॉटर फिल्टर तात्काळ पूरवठादार रोहन नाईक हयाच्यांकडून विना ई निविदा खरेदी करणेकामी महानगरपालिका अधिनियम कलम ६७(३)(क) अन्वये मला प्राप्त असलेल्या अधिकारानुसार कोविड-१९ रुग्णांकरिता आर.ओ.वॉटर फिल्टर खरेदी करणेकामी येणाऱ्या रक्कम रु. ६,८०,२७०/- (अक्षरी रुपये सहा लक्ष ऐंशी हजार दोनशे सत्तर मात्र) खर्चास प्रशासकीय व वित्तीय मान्यता देण्यात येत आहे.

आयुक्त तथा प्रशासक
वसई विरार शहर महानगरपालिका

वसई विरार शहर महानगरपालिका
मुख्य कार्यालय, विरार (पुर्व)
ता. वसई, जि.पालघर

---

प्रशासकीय ठराव क्र. ५३ विभागः- सार्व. वाचनालय

दि.:१४/०८/२०२०

प्रस्तावाचा विषय :- वसई - विरार शहर महानगरपालिकेच्या प्रभाग समिती 'आय' वसई येथील सार्व. वाचनालयासाठी सन २०२० - २१ या वर्षाकरिता लागणारी वृत्तपत्रे, नियतकालिके व दिवाळी अंक खरेदी करणेकामी येणा-या खर्चास मंजूरी मिळणेबाबत.

प्रस्तावाचा मजकूर :-

वसई - विरार शहर महानगरपालिकेच्या प्रभाग समिती 'आय' वसई येथील डॉ.धोंडो गोविंद अभ्यंकर स्मृती सार्व. वाचनालयात मोठया प्रमाणात वाचकवर्ग ज्ञान अर्जनासाठी येत असून वाचनालयात येणा-या वृत्तपत्राचा लाभ मोठया प्रमाणात विद्यार्थी, वाचक, जेष्ठ नागरिक घेतात. सन २०२०-२१ या वित्तीय वर्षासाठी लागणारी वृत्तपत्रे, नियतकालिके व दिवाळी अंक खरेदी कामी अंदाजित रक्कम रु. ३,००,०००/- (अक्षरी रु. तीन लक्ष) इतका खर्च होणे अपेक्षित आहे. सन २०१९-२० या वित्तीय वर्षाकरीता वर्तमानपत्र, मासिके, साप्ताहिके, पाक्षिके व दिवाळी अंक खरेदी करणे कामी रक्कम रुपये ६४,६५७/- इतका खर्च झालेला आहे. सन २०२०-२१ या वित्तीय वर्षाकरीता वर्तमानपत्र, मासिके, साप्ताहिके, पाक्षिके व दिवाळी अंक खरेदी करणे कामी वार्षिक अंदाजपत्रकात वृत्तपत्रे, नियतकालिके व दिवाळी अंक या लेखाशीर्षांतर्गत रक्कम रुपये ३,००,०००/- (अक्षरी रु. तीन लक्ष मात्र) इतकी तरतूद असून त्यासंबंधीचा अहवाल हा लेखाविभाग 'आय' प्रभाग समिती 'आय' वसई यांचेकडे सादर केला आहे. ग्रंथालयासाठी लागणारी दैनंदिन वृत्तपत्रे, नियतकालिके मासिके, पाक्षिके व दिवाळी अंक वार्षिक दरपत्रक पध्दतीने खरेदी केल्यास खरेदीच्या रक्कमेवर महानगरपालिकेस मिळणारी सूट लक्षात घेता महानगरपालिकेचा फायदा होणार आहे. तरी सन २०२०-२१ वित्तीय वर्षासाठी लागणारी दैनंदिन वृत्तपत्र, नियतकालिके व दिवाळी अंक दरपत्रक पध्दतीने खरेदी करणे कामी होणा-या रक्कम रु. १,५०,०००/- (अक्षरी रु. एक लक्ष पन्नास हजार) मात्र इतक्या खर्चास प्रशासकीय व वित्तीय मंजुरी मिळणेकामी सदरचा प्रस्ताव मा.आयुक्त वसई-विरार शहर महानगरपालिका यांचेकडे मंजुरीस्तव सादर.

ठराव :-

वरील विषयावर मा.आयुक्त साहेब प्रशासक व.वि.श.म. यांचे सभागृहात सविस्तर चर्चा करण्यात आली. त्यानुसार सन २०२०-२१ या वित्तीय वर्षा करीता व.वि.श.म.च्या प्रभाग समिती 'आय' वसई येथील सार्व. वाचनालयाकरीता लागणारी वृत्तपत्रे / मासिके / साप्ताहिके / पाक्षिके व दिवाळी अंक खरेदी करणेकामी वृत्तपत्रात जाहीर दरपत्रक सूचना प्रसिध्द करुन दरपत्रक मागवून जास्त सवलत देणा-या मंजूर दरपत्रकधारकाकडून खरेदी करणेकामी प्रशासकीय मंजूरी देत आहे, तसेच सदरचे देयक अदा करणेकामी येणाऱ्या अंदाजित रक्कम रु. १,५०,०००/- (अक्षरी रु. एक लक्ष पन्नास हजार मात्र) इतक्या खर्चास वित्तीय मंजूरी देत आहे.

प्रशासक

वसई विरार शहर महानगरपालिका

# वसई-विरार शहर महानगरपालिका

मुख्य कार्यालय, विरार पुर्व, जि. - पालघर, पिन नं. ४०१ ३०५
दुरध्वनी - ०२५०-२५२५१०१/०२/०३/०४/०५/०६, फॅक्स ०२५०-२५२५१०७,
ई-मेल- vasaivirarcorporation@yahoo.com

**प्रशासकीय ठराव क्र.** ५४

विभाग: सामान्य प्रशासन
दिनांक १७/०८/२०२०

**प्रस्तावाचा विषय:- कोरोना (कोविड-१९) उपचार केंद्रावर औषधे ठेवण्यासाठी लोखंडी रॅक खरेदी करणेकामी येणा-या खर्चास कार्योत्तर प्रशासकीय व वित्तीय मंजुरीबाबत.**

**प्रस्तावाचा मजकूर :-** वसई-विरार शहर महानगरपालिका हद्दीत कोविड-१९ साथीचे मोठया प्रमाणात रुग्ण सापडत असुन या रुग्णांवर उपचार करण्यासाठी मनपाने खालील ठिकाणी रुग्ण उपचार केंद्र सुरु केले आहे.

| अ.क्र. | ठिकाण | प्रकार |
|---|---|---|
| १. | वरुण इंडस्ट्रीअल इस्टेट कोविड ट्रीटमेंट केंद्र | कोविड उपचार केंद्र |

या ठिकाणी कोवीड-१९ प्रतिबंधक उपचार केंद्र वालीव येथे पॉझिटीव्ह रुग्णांवर उपचार करण्यात येतो. सदर रुग्णांना उपचारासाठी लागणारी औषधे ठेवण्याकरीता लोखंडी रॅक खरेदी करणे बाबत मा. आयुक्त सो. यांनी निर्देश दिलेले आहेत त्यानूसार औषधे ठेवण्यासाठी लोखंडी रॅक तात्काळ खरेदी करण्यात आलेले आहेत.

सदर रॅकची किंमत खालीलप्रमाणे असुन उत्पादकाने कोटेशन मध्ये दर दिलेले आहे. त्या दराने ८ नग लोखंडी रॅक खरेदी करण्यांस खालीलप्रमाणे खर्च झालेला आहे.

| अ.क्र | मशीनचा तपशिल | दर प्रति नग | पूरविण्याचे नग | पूरविण्याचे ठिकाण | रक्कम |
|---|---|---|---|---|---|
| १. | लोखंडी रॅक साईज L ७८" H x ३६" W x १८" | ३५२५ | ८ नग | वरुण इंडस्ट्रीज (कोविड उपचार केंद्र) | २८२०० |
| | | | | GST १८% | ५०७६ |
| | | | | एकुण | ३३,२७६/- |

तसेच सदरचा खर्च सन २०२०-२१ मधील सामान्य प्रशासन विभाग अंतर्गत फर्निचर / वॉटर कूलर इ. अंतर्गत या लेखाशिर्ष अंतर्गत करण्यात येईल.

उपरोक्त लोखंडी रॅक कोविड उपचार केंद्राकरिता खरेदी केलेले आहेत. त्यानूसार महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियम कलम ६७ (३) क अन्वये मा. आयुक्त सो. यांना असलेले अधिकारानुसार विना निविदा में.केविन ट्रेडींग को. वसई या उत्पादक कंपनीकडून तात्काळ थेट खरेदी करुन झालेल्या रक्कम रु.३३,२७६/- खर्चास मा. आयुक्त तथा प्रशासक यांचे कार्योत्तर प्रशासकीय व वित्तीय मंजुरीस्तव सविनय सादर.

**ठराव:-** सदर लोखंडी रॅक कोविड-१९ प्रतिबंधात्मक उपाययोजनेकरिता आवश्यक आहे. तरी उपरोक्त प्रस्तावा मधील वरील नमुद लोखंडी रॅक तात्काळ में. केविन ट्रेडींग को. वसई हयाच्यांकडून विना ई निविदा खरेदी करणेकामी महानगरपालिका अधिनियम कलम ६७(३)(क) अन्वये मला प्राप्त असलेल्या अधिकारानुसार कोविड-१९ रुग्णांकरिता उपचार केंद्रावर औषधे ठेवण्यासाठी लोखंडी रॅक खरेदी करणेकामी झालेल्या रक्कम रु. ३३,२७६ /- (अक्षरी एक तेत्तीस हजार दोनशे शहात्तर मात्र) खर्चास कार्योत्तर प्रशासकीय व वित्तीय मान्यता देण्यात येत आहे.

(सही) १७/०८

आयुक्त तथा प्रशासक
वसई विरार शहर महानगरपालिका

# वसई-विरार शहर महानगरपालिका

मुख्य कार्यालय, विरार पुर्व, जि. - पालघर, पिन नं. ४०१ ३०५
दुरध्वनी - ०२५०-२५२५१०१/०२/०३/०४/०५/०६, फॅक्स ०२५०-२५२५१०७,
ई-मेल- vasaivirarcorporation@yahoo.com

प्रशासकीय ठराव क्र. ५५ | विभाग: सामान्य प्रशासन
दिनांक ११/०८/२०२०

**प्रस्तावाचा विषय:- कोरोना (कोविड-१९) उपचार केंद्रावर दैनंदिन स्वच्छता करण्यास रूटस् स्क्रब मशिन खरेदी करणेकामी येणा-या खर्चास प्रशासकीय वित्तीय मंजुरीबाबत.**

**प्रस्तावाचा मजकूर :-** वसई-विरार शहर महानगरपालिका हद्दीत कोविड-१९ साथीचे मोठया प्रमाणात रुग्ण सापडत असुन या रुग्णांवर उपचार करण्यासाठी मनपाने खालील ठिकाणी रुग्ण उपचार केंद्र सुरु केलेली आहेत.

| अ.क्र. | ठिकाण | प्रकार |
|---|---|---|
| १. | मनपा समर्पित हॉस्पीटल, चंदनसार | कोविड आय.सी.यु. केंद्र |
| २. | वरुण इंडस्ट्रीज, वालीव | कोविड उपचार केंद्र |

वरील ठिकाणी कोवीड प्रतिबंधक उपचार केंद्र तयार केलेली आहेत. सदर केंद्रावर दैनंदिन साफसफाई करण्यांस मोठ्या प्रमाणावर स्वच्छता कर्मचारी लागत आहेत. दैनंदिन असणारे कर्मचाऱ्यांना कोवीड १९ ची कामे वाढल्याने अत्यावश्यक सेवेत कर्मचारी कमी पडू नये याकरिता स्वच्छतेची कामे मशीनद्वारे केल्यास कमी वेळामध्ये जास्त काम होईल व कर्मचारी संख्या ही अत्यल्प लागेल.

१) चंदनसार येथील नव्याने तयार करण्यात आलेले रुग्णालय ४ मजली इमारत असून १५० बेड ची संख्या अपेक्षित आहे. या इमारतीचे दैनंदिन स्वच्छता करण्यास सोबत जोडलेले रूटस् स्क्रब मशीन E-४३४० या मॉडेलचे मशीन खरेदी केल्यास मनुष्यबळ वाचून वेळोवेळी स्वच्छतेचे काम सुरळीत करता येईल.

२) शहरामध्ये वरुण इंड्रस्ट्रीज, वालीव या ठिकाणी उपचार केंद्र असून तेथे तळमजळा ५०० व पहिला माळा ५०० बेड चे व्यवस्था असून साफसफाई व्यवस्था साठी रूटस् मल्टीक्लीन लिमिटेड कंपनीचे स्क्रब मशिन मॉडेल क्र. RB - ७५० वापर केल्यास एका मनुष्यासाठी तळमजल्याची साफसफाई या मशीन द्वारे करता येईल. त्यामुळे मनुष्यबळ वाचून त्वरीत लादी पोचण्याचे काम त्वरीत होईल.

३) तसेच नालसोपारा विजयनगर येथील महानगरपालिकेच्या रुग्णालय असून तेथे दैनंदिन ४०० रुग्ण तपासणीसाठी येतात. याठिकाणी दैनंदिन स्वच्छता करावी लागते. त्याकरिता मोठया प्रमाणात स्वच्छता कर्मचारी लागतात. कोविड कामामुळे महापालिकेस कर्मचारी वर्ग अपूरा पडत असल्याने मशीन द्वारे कामे केल्यास कमी मनुष्यबळाने वेळेत स्वच्छता राखता येईल. त्याकरीता रूटस् मल्टीक्लीन लिमिटेड कंपनीचे स्क्रब मशिन मॉडेल क्र. E-४३४० मशीन वापरल्यास योग्य होईल.

यापूर्वी कोविड सेंटर जी.जी.कॉलेज, वसई येथे ३ नग व वरुण इंडस्ट्रीज, वालीव येथे सदर कंपनी चे उपरोक्त मॉडल E-४३४० चे मशिन २ नग प्रमाणे एकुण ५ नग मशीन खरेदी केलेल्या असून त्याचा वापर योग्य होत आहे.

तरी खालील तक्त्यामध्ये नमूद केलेल्या ठिकाणी मशिन खरेदी करणे आवश्यक आहे.

उपरोक्त ठिकाणी रुटस् स्क्रब मशीन खरेदी करण्यास कंपनी ने दरपत्रक दिले असून ते सोबत जोडले आहे. सदर मशीनची किंमत खालीलप्रमाणे असुन पुरावठादाराने सवलतीचा दर दिलेला आहे.

| अ. क्र | मशीनचा तपशिल | दर प्रति नग | वाटाघाटीचा दर | पूरविण्याचे नग | पूरविण्याचे ठिकाण | रक्कम |
|---|---|---|---|---|---|---|
| १. | रूटस् मल्टीक्लीन लिमिटेड कंपनीचे स्क्रब मशिन मॉडेल क्र. RB - ७५० | ५,२५,०००० | ३९३७५० ब्रशसह | १ नग | वरुण इंडस्ट्रीज (कोविड उपचार केंद्र) | ३९३७५० |
| २. | रूटस् मल्टीक्लीन लिमिटेड कंपनीचे स्क्रब मशिन मॉडेल क्र. E-४३४० | ११७०००० | ८६९०० ब्रशसह | १ नग | चंदनसार कोविड आय.सी.यु. केंद्र | ८६९०० |
| | ब्रश | २९८१ | | | | |
| ३. | रूटस् मल्टीक्लीन लिमिटेड कंपनीचे स्क्रब मशिन मॉडेल क्र. E-४३४० | ११७०००० | ८६९०० ब्रशसह | १ नग | मनपा तुळींज रुग्णालय | ८६९०० |
| | ब्रश | २९८१ | | | | |
| | | | | | एकुण | ५६७५५० |
| | | | | | GST १८% | १०२१५९ |
| | | | | | एकुण | ६,६९,७०९/- |

तसेच सदरचा खर्च सन २०२०-२१ मधील वैद्यकीय विभागातील रुग्णालय व शहराअंतर्गत विविध ठिकाणी दवाखाने व्यवस्थापन अंतर्गत ऑक्सिजन सिलेंडर रिफिलींगसह रुग्णालयातील उपकरणे (खरेदी) देखभाल दुरुस्ती या लेखाशिर्ष अंतर्गत करण्यात येईल.

तरी उपरोक्त मशिन कोविड उपचार केंद्राकरिता व तुळींज रुग्णालयासाठी खरेदी करावयाचे असून त्याकरीता महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियम कलम ६७ (३) क अन्वये मा. आयुक्त सो. यांना असलेले अधिकारानुसार विना निविदा मे. रूटस् मल्टीक्लीन लिमिटेड, नवी मुंबई या उत्पादक कंपनीकडून तात्काळ थेट खरेदी करण्यांस रक्कम रु.६,६९,७०९/- खर्चास मा. आयुक्त तथा प्रशासक यांचे प्रशासकीय व वित्तीय मंजुरीस्तव सविनय सादर.

**ठराव** :- सदर मशिन कोविड-१९ प्रतिबंधात्मक उपाययोजनेकरिता आवश्यक आहे. तरी उपरोक्त प्रस्तावा मधील रूटस् स्क्रब मशिन तात्काळ पूरवठादार रुटस् मल्टीक्लीन लिमिटेड, नवी मुंबई हयाच्यांकडून विना ई निविदा खरेदी करणेकामी महानगरपालिका अधिनियम कलम ६७(३) (क) अन्वये मला प्राप्त असलेल्या अधिकारानुसार कोविड-१९ उपचार केंद्रावर रूटस् स्क्रब मशिन खरेदी करणेकामी येणाऱ्या रक्कम रु. ६,६९,७०९/- (अक्षरी रुपये सहा लक्ष एकोणसत्तर हजार सातशे नऊ मात्र) खर्चास प्रशासकीय व वित्तीय मान्यता देण्यात येत आहे.

(सही)

आयुक्त तथा प्रशासक
वसई विरार शहर महानगरपालिका

# वसई-विरार शहर महानगरपालिका

मुख्य कार्यालय, विरार पुर्व, जि. - पालघर, पिन नं. ४०१ ३०५
दुरध्वनी - ०२५०-२५२५१०१/०२/०३/०४/०५/०६, फॅक्स ०२५०-२५२५१०७,
ई-मेल- vasaivirarcorporation@yahoo.com

प्रशासकीय ठराव क्र. ५६ विभाग:-सामान्य प्रशासन
दिनांक:-१० /०८/२०२०

**प्रस्तावाचा विषय :- कोविड १९ रुग्णांकरिता आर.ओ.+UV वॉटर आय.एस.आय.मार्क बाटलीबंद २० लिटर पिण्याचे पाणी खरेदी करणेकामी येणा-या खर्चास मंजुरीबाबत.**

प्रस्तावाचा मजकूर :- महानगरतालिका हद्दीमध्ये कोविड-१९ या रोगाचा प्रादुर्भाव होऊन साथीचे रुग्ण आढळून येत आहेत. कोविड-१९ या साथीचे रोगाचा प्रादुर्भाव रोखण्यासाठी महानगरपालिकेने खालील ठिकाणी आयसोलेशन केंद्र व कोविड उपचार केंद्र तयार केलेले आहेत तसेच डॉक्टर व नर्स यांना २४ तास उपलब्धतेसाठी निवासाची व्यवस्था केलेली आहे.

| अ.क्र. | ठिकाण |
|---|---|
| १. | बोळीज UPHC कोविड ट्रीटमेंट केंद्र |
| २. | अग्रवाल कोविड ट्रीटमेंट केंद्र |
| ३. | रिध्दी विनायक हॉस्पीटल कोविड ट्रीटमेंट सेंटर |
| ४. | बाभोळा अग्रवाल कोविड ट्रीटमेंट केंद्र |
| ५. | म्हाडा इमारत क्रं. १० (संशयित कोविड) |
| ६. | म्हाडा इमारत क्रं. १४ (डॉक्टर, नर्स, कर्मचारी निवास) |
| ७. | वागड हायस्कूल खानिवडे |
| ८. | गोन्सालो गार्सीया कॉलेज वसई |

सदर ठिकाणी संशयीत रुग्ण व पॉझिटिव्ह रुग्ण मोठया प्रमाणावर दाखल होत असल्याने त्यांना पिण्याचे पाण्याची व्यवस्था डिस्पेन्सरी व २० लि. पाण्याचा जार ठेवून केलेली आहे. वरील ठिकाणी संशयित रुग्ण तसेच डॉक्टर, नर्स इत्यादीसाठी पिण्याचे पाणी व्यवस्था करण्यासाठी आर.ओ.+UV वॉटर आय.एस.आय.मार्क २० लिटर जार उपलब्ध करुन देण्यांत येत आहेत. यापूर्वी मे.सेवालाल इंटरप्रायझेस यांना २० लिटर चे २००० जार पूरवठा आदेश दिलेला होता.

सदरचा खर्च सन २०२०-२१ मधील वैद्यकीय विभागातील रुग्णालय व शहराअंतर्गत विविध ठिकाणी दवाखाने व्यवस्थापन अंतर्गत रुग्णालय इतर साहित्य खरेदी या लेखाशिर्षा अंतर्गत करता येईल.

प्रत्येक दिवसाला सुमारे १०० ते १२० पाणी जार वापर होत आहे व यापूर्वीचा २००० नग जार संपत आले असून पूढील कालावधी साठी ६००० लिटर जार ची आवश्यकता आहे. प्रती जार रु. ४२.४०/- + जी.एस.टी. १८% प्रमाणे ६००० लिटर जार करिता ३,००,१९२/- खर्चास मा.आयुक्त तथा प्रशासक यांचे प्रशासकीय व वित्तीय सविनय सादर.

ठराव :- सदर व्यवस्था कोविड-१९ प्रतिबंधक उपाययोजने करिता आवश्यक आहे. तरी उपरोक्त प्रस्तावा मधील वरील नमुद साहित्य तात्काळ विना ई निविदा खरेदी करणेकामी महानगरपालिका अधिनियम १९४९ चे कलम ६७(३) (क) अन्वये मला प्राप्त असलेल्या अधिकारानुसार उपरोक्त आर.ओ.+UV वॉटर आय.एस.आय.मार्क २० लिटर पाणी जार खरेदी करणे कामी येणाऱ्या रक्कम रु. ३,००,१९२/- (अक्षरी रुपये तीन लक्ष एक्या हजार आठशे मात्र) खर्चास प्रशासकीय व वित्तीय मान्यता देण्यात येत आहे

आयुक्त तथा प्रशासक
वसई विरार शहर महानगरपालिका

# वसई-विरार शहर महानगरपालिका

मुख्य कार्यालय, विरार पुर्व, जि. - पालघर, पिन नं. ४०१ ३०५
दुरध्वनी - ०२५०-२५२५१०१/०२/०३/०४/०५/०६, फॅक्स ०२५०-२५२५१०७,
ई-मेल- vasaivirarcorporation@yahoo.com

**प्रशासकीय ठराव क्र.** ५७ | विभाग: सामान्य प्रशासन
दिनांक २७/०८/२०२०

**प्रस्तावाचा विषय:- कोविड-१९ रूग्णांकरिता उपचार केंद्रावर आवश्यक साहित्य खरेदी करणेकामी येणा-या खर्चास कार्योत्तर प्रशासकीय व वित्तीय मंजुरीबाबत.**

**प्रस्तावाचा मजकूर :-** सादर करण्यांत येते की, वसई विरार शहर महानगरपालिका हद्दीमध्ये कोविड-१९ या साथीच्या रोगाचे रुग्ण मोठ्या प्रमाणात सापडत आहेत. सदर रुग्णांवर उपचार करण्यासाठी व संशयित रुग्ण विलगिकरण केंद्र म्हणून महानगरपालिकेमार्फत खालील ठिकाणी व्यवस्था केलेली आहे.

| अ.क्र. | ठिकाण | प्रकार |
|---|---|---|
| १. | अग्रवाल कोविड ट्रीटमेंट केंद्र | उपचार केंद्र |
| २. | रिध्दी विनायक हॉस्पीटल कोविड ट्रीटमेंट सेंटर | उपचार केंद्र |
| ३. | जी.जी. कॉलेज कोविड ट्रीटमेंट सेंटर | उपचार केंद्र |
| ४. | म्हाडा इमारत क्रं. १० | संशयित कोविड रुग्ण विलगीकरण केंद्र |
| ५. | म्हाडा इमारत क्रं. १४ | डॉक्टर, नर्स, कर्मचारी निवास |
| ६. | बोळीज UPHC कोविड ट्रीटमेंट केंद्र | उपचार केंद्र |
| ७. | बाभोळा अग्रवाल कोविड ट्रीटमेंट केंद्र | उपचार केंद्र |

सदर केंद्रामध्ये रुग्णांना आवश्यक सुविधा देण्यासाठी मा. आयुक्त सो. यांनी खालील साहित्य तात्काळ खरेदी करण्याबाबत सुचना दिलेल्या आहेत. त्याप्रमाणे खालील प्रमाणे होलसेलरकडून साहित्य खरेदी केलेले आहे.

| अ. क्र | साहित्याचा तपशिल | पुरवठा केलेले दिनांक | आवश्यक नग | दर प्रति नग + GST | एकूण |
|---|---|---|---|---|---|
| १. | प्लास्टिक चमचा | १६/०६/२०२० | २५०० | ०.६० + १८ % | १७७० |
| २. | पॅकिंग बॅग | १६/०६/२०२० | १२५० | ३.०५ + १८ % | ४४९९ |
| ३. | ब्ल्यु बॅग | १६/०६/२०२० | १३८५ | ६.४४ + १८ % | १०५२५ |
| ४. | ब्ल्यु बॅग | २५/०६/२०२० | ३२५ | ६.४४ + १८ % | २४७० |
| ५. | ब्ल्यु बॅग | २९/०६/२०२० | १७५० | ६.४४ + १८ % | १३२९९ |
| ६. | पॅकिंग बॅग | ०१/०७/२०२० | १००० | ३.०५ + १८ % | ३५९९ |
| ७. | जेल ५०० ml | ०७/०७/२०२० | १० | १६५ + १८ % | १९४७ |
| ८. | स्प्रे ५०० ml | ०७/०७/२०२० | ५ | १६५ + १८ % | ९७४ |
| ९. | जेल ५ लिटर | ०७/०७/२०२० | ५ | ६५० + १८ % | ३८३५ |
| १०. | स्प्रे ५ लिटर | ०७/०७/२०२० | ५ | ६५० + १८ % | ३८३५ |
| ११. | हॅण्डवॉश बॉटल ५०० लिटर | ०७/०७/२०२० | २० | ६० + १८ % | १४१६ |
| १२. | हॅण्डवॉश ५ लिटर | ०७/०७/२०२० | १० | २५४.२४ + १८ % | ३००० |

| | | | | | |
|---|---|---|---|---|---|
| १३. | हॅण्डवॉश ५ लिटर | ०७/०७/२०२० | १० | २५४.२४ + १८ % | ३००० |
| १४. | ब्ल्यु बॅग | १४/०७/२०२० | ८७५ | ६.४४ + १८ % | ६६४९ |
| १५. | हॅण्ड वॉश ५ लिटर | १६/०७/२०२० | १० | २५४.२४ + १८% | ३००० |
| १६ | ब्ल्यु बॅग | २९/०७/२०२० | ८७५ | ६.४४ + १८ % | ६६४९ |
| १७. | गारबेज बॅग | २९/०७/२०२० | ३० kg | १३५ + १८ % | ४७७९ |
| | | | | एकुण | ७५,२४६/- |

तसेच सदरचा खर्च सन २०२०-२१ मधील वैद्यकीय विभागातील रुग्णालय व शहराअंतर्गत विविध ठिकाणी दवाखाने व्यवस्थापन अंतर्गत रुग्णालय विभागातील इतर साहित्य खरेदी या लेखाशिर्ष अंतर्गत करण्यात येईल.

तरी उपरोक्त साहित्य उपचार केंद्राकरिता खरेदी केलेले आहे. त्याकरीता महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियम कलम ६७ (३) क अन्वये मा. आयुक्त सो. यांना असलेले अधिकारानुसार विना निविदा मे.अरिहंत ट्रेडर्स, वसई यांचेकडून तात्काळ थेट खरेदी करुन झालेल्या रक्कम रु.७५,२४६/- खर्चास मा. आयुक्त तथा प्रशासक यांचे कार्योत्तर प्रशासकीय व वित्तीय मंजुरीस्तव सविनय सादर.

**ठराव:-** सदर साहित्य कोविड-१९ प्रतिबंधात्मक उपाययोजनेकरिता आवश्यक आहे. तरी उपरोक्त प्रस्तावा मधील वरील नमुद आवश्यक साहित्य तात्काळ मे. अरिहंत ट्रेडर्स. वसई हयाच्यांकडून विना ई निविदा खरेदी करणेकामी महानगरपालिका अधिनियम कलम ६७(३)(क) अन्वये मला प्राप्त असलेल्या अधिकारानुसार कोविड-१९ रुग्णांकरिता उपचार केंद्रावर आवश्यक साहित्य खरेदी करणेकामी झालेल्या रक्कम रु. ७५,२४६/- (अक्षरी एक पंच्याहत्तर हजार दोनशे शेहेचाळीस मात्र) खर्चास कार्योत्तर प्रशासकीय व वित्तीय मान्यता देण्यात येत आहे.

आयुक्त तथा प्रशासक
वसई विरार शहर महानगरपालिका

वसई-विरार शहर महानगरपालिका
मुख्य कार्यालय, विरार पुर्व, जि. - पालघर, पिन नं. ४०१ ३०५
दुरध्वनी - ०२५०-२५२५१०१/०२/०३/०४/०५/०६, फॅक्स ०२५०-२५२५१०७,
ई-मेल- vasaivirarcorporation@yahoo.com

प्रशासकीय ठराव क्र. ५८ विभाग: सामान्य प्रशासन
दिनांक १७/०८/२०२०

**प्रस्तावाचा विषय:- वसई-विरार शहर महानगरपालिकेच्या हद्दीमध्ये सन २०२० गणेश विसर्जनाकरिता लाकडी व फायबर तराफे दुरूस्ती व पुरवठा करणे कामी येणाऱ्या खर्चास प्रशासकिय व वित्तीय मान्यता मिळणेबाबत.**

**प्रस्तावाचा मजकूर :-**

महानगरपालिका क्षेत्रामध्ये गणेश विसर्जन सोहळा मोठयाप्रमाणात साजरा करण्यांत येतो. शहरामध्ये घरगुती गणेशमूर्ती व सार्वजनिक गणेश मूर्तींचे विसर्जन मोठया प्रमाणवर करण्यांत येते.

सन २०२० मधील गणेश विसर्जन व्यवस्था शहरामध्ये खालील तारखांना करण्यांत येणार आहे.

| अ.क्र | दिनांक | विसर्जन दिवस |
|---|---|---|
| १ | २३/०८/२०२० | दिड दिवसाचे गणेश विसर्जन |
| २ | २६/०८/२०२० | पाच दिवसांचे गणेश विसर्जन |
| ३ | २७/०८/२०२० | जेष्ठा गौरी विसर्जन |
| ४ | २८/०८/२०२० | ७ दिवसांचे गणेश विसर्जन |
| ५ | ०१/०९/२०२० | अनंत चर्तुदर्शी गणेश विसर्जन |

शहरामध्ये १०२ ठिकाणी गणेश विसर्जन होते. शहरामध्ये बहूसंख्य भागात तलाव असल्याने तलावामध्ये विसर्जन करण्यांत येते.याकामी लाकडी तराफे व फायबर तराफे वापरण्यांत येतात.

शहरामधील विविध ठिकाणी विविध मापांचे २२ नग फायबर तराफे असून दरवर्षी त्यांची ऍंचवर्क ,कडया दुरूस्ती, रंगरंगोटी करावी लागते.तसेच जूने तराफेची दुरुस्ती न झाल्यास आवश्यकत्ता वाटल्यास नविन लाकडी व फायबर तराफे खरेदी करणे आवश्यक आहे.

सदर कामी वार्षिक दर नसल्याने प्रत्येक प्रभागात दरपत्रक मागवून दुरूस्ती करण्यापेक्षा सर्व कामांचे एकच टेंडर काढल्यास योग्य होईल.

तरी गणेश विसर्जन करण्यांस खालील बाबींचे कामासाठी ई-निविदा मागविणे आवश्यक आहे.

| अ.क्र | कामाचा तपशिल | दर मागविणे |
|---|---|---|
| १ | फायबर तराफे दुरुस्ती करणे | प्रती.चौ.फूट |
| २ | लाकडी तराफा दुरुस्ती करणे (१०एम.एम.प्लायवूड) | प्रती.चौ.फूट |
| ३ | फायबर तराफा रंगरंगोटी करणे | संपूर्ण साईजनुसार |
| ४ | लाकडी तराफा रंगरंगोटी करणे | संपूर्ण साईजनुसार |
| ५ | तराफ्यावर महानगरपालिकेचे नाव लिहणे. | एक बाजूचा दर |
| ६ | प्लायवुड तराफ्यासाठी ट्रकची टयूब जूनी पुरविणे (साईज १०.२०X१८) | प्रती.नग |
| ७ | प्लायवुड तराफ्यासाठी ट्रकची टयुब नविन पुरविणे (साईज १०.२०X१८) | प्रती.नग |
| ८ | नॉयलॉन जाड रोप पुरविणे (२० एम.एम.जाड) | प्रती.किलो |
| ९ | निर्माल्य कलश पुरविणे | प्रती.नग |
| १० | विविध साईजचे लाकडी व फायबर तराफे पुरविणे. | प्रती.नग |

तरी वरील प्रमाणे काम करण्यांस अंदाजपत्रकामध्ये देव देवतांच्या मुर्ती विसर्जन तराफे दुरुस्ती, तलाव व्यवस्थापन निर्माल्य कलश दुरुस्ती,देव देवतांच्या मुर्ती विसर्जन तराफे बनविणे व निर्माल्य कलश खरेदी या लेखाशिर्षातील तरतुदी मधून खर्च करता येईल.

तरी उपरोक्त कामी ई-निविदा मागविणेस व त्याकरिता येणाऱ्या अंदाजित रक्कम रु.१० लक्षपर्यंतचे खर्चास मा. आयुक्त तथा प्रशासक यांचे प्रशासकीय व वित्तीय मंजुरीस्तव सविनय सादर.

**ठराव :-** सन-२०२० गणेश विसर्जनाकरिता लाकडी व फायबर तराफे दुरुस्ती व पुरवठा करणे ई-निविदा मागविणेकामी मा.सर्वसाधारण सभा ठराव क्रमांक ०४/२०१० दि.२०/०९/२०१० अन्वये मला प्राप्त असलेल्या अधिकारानुसार लाकडी व फायबर तराफे दुरुस्ती व नविन खरेदी करणेकामी ई-निविदा मागविणेस व त्याकरिता येणाऱ्या अंदाजित रक्कम रु.१०,००,०००/- (अक्षरी रुपये दहा लक्ष मात्र) खर्चास प्रशासकीय व वित्तीय मान्यता देण्यात येत आहे.

७/८

आयुक्त तथा प्रशासक
वसई विरार शहर महानगरपालिका

# वसई- विरार शहर महानगरपालिका

मुख्य कार्यालय, विरार (पूर्व), जि.- पालघर, पिन नं. 401 305
दूरध्वनी- 0250-2525101/02/03/04/05/06, फॅक्स – 0250-2525107
ई-मेल- vasaivirarcorporation@yahoo.com

**प्रशासकीय ठराव क्र.** ५८ | विभाग : वैद्यकीय आरोग्य
दिनांक : १७/०८/2020

**प्रस्तावाचा विषय :-** वसई विरार शहर महानगरपालिकेमध्ये कोरोना (कोव्हिड-१९) प्रतिबंधात्मक उपाय योजनेची तातडीने अंमलबजावणी होत असल्याने महानगरपालिकेमध्ये तात्पुरत्या स्वरुपात कोव्हिड-१९ च्या डेडीकेटेड कोव्हीड हॉस्पिटल, डेडीकेटेड कोव्हीड हेल्थ सेंटर, कोव्हीड केअर सेंटर येथे तज्ञ वैद्यकीय अधिकारी, वैद्यकीय अधिकारी एम.बी.बी.एस, बी.ए.एम.एस व बी.एच.एम.एस यांची सेवा घेणेकामी त्यांचे प्रतिदिन मानधन निश्चित करुन अदा करणेस मान्यता मिळणेबाबत.

**प्रस्तावाचा मजकूर :-** वसई विरार शहर महानगरपालिका कार्यक्षेत्रात महानगरपालिकेचे २ रुग्णालये तसेच विविध ठिकाणी २१ नागरी प्राथमिक आरोग्य केंद्रे, ३ माता बाल संगोपन केंद्र, क्षयरोग विभाग व ९ दवाखाने कार्यरत आहेत. या सर्व रुग्णालयाचे, नागरी प्राथमिक आरोग्य केंद्राचे, माता बाल संगोपन केंद्र, दवाखाने व वैद्यकीय आरोग्य विभागासाठी महानगरपालिकेने महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियम १९४९ मधील कलम ५३(३) यानुसार मा. आयुक्त यांना असलेल्या अधिकारात तात्पुरत्या स्वरुपात ६ महिन्यांच्या कालावधीसाठी कंत्राटी पध्दतीने आवश्यक अधिकारी/ कर्मचारी वर्ग दरमहा मानधनावर नियुक्ती करणेकामी आवश्यक असलेले वैद्यकीय अधिकारी/कर्मचारी वर्ग महानगरपालिकेच्या ०२ रुग्णालये, २१ नागरी प्राथमिक आरोग्य केंद्रे, ०९ दवाखाने, आय.सी.यू.विभाग, डायलेसीस विभाग, ०३ माताबाल संगोपन केंद्रे व वैद्यकीय आरोग्य विभाग येथे कामकाज करणेसाठी तात्पुरत्या स्वरुपात ६ महिन्यांच्या कालावधी साठी कंत्राटी पध्दतीने स्त्रीरोग तज्ञ, बालरोग तज्ञ, भिषक, अस्थिरोग तज्ञ, शल्यचिकित्सक, पॅथॉलॉजिस्ट, रेडिओलॉजिस्ट, भूल तज्ञ, नेफ्रॉलॉजिस्ट, एम.बी.बी.एस, बी.ए.एम.एस., पी.एच.एन., जी.एन.एम., ए.एन.एम., प्रयोगशाळा सहाय्यक, फार्मासिस्ट, क्ष-किरण सहाय्यक, समुपदेष्टा, शितसाखळी तंत्रज्ञ, डायलेसिस सुपरवायझर व डायलेसिस टेक्निशियन इत्यादी वैद्यकीय अधिकारी/कर्मचारी वर्ग यांना नियुक्त करण्यात आलेल्या आहेत.

तथापि वसई-विरार शहर महानगरपालिका कार्यक्षेत्रात कोरोना विषाणूंचा संसर्ग व प्रादुर्भाव पसरण्याची शक्यता लक्षात घेता त्यावर नियंत्रण करणे व कोरोना विषाणूचा संसर्ग असल्यास त्यात अधिक वाढ होऊ न देता त्यावर प्रतिबंधात्मक उपाययोजना आखणे आवश्यक असल्याने याकरिता आरोग्य यंत्रणा सक्षम व येणाऱ्या आपत्तीला प्रतिसाद देण्यासाठी तयार ठेवणे आवश्यक आहे. त्यानुषंगाने महानगरपालिका विविध आरोग्य सुविधा तयार करत असून त्याचाच एक महत्वाचा भाग म्हणून वसई विरार शहर महानगरपालिकेने विविध ठिकाणी अलगीकरण कक्ष व विलगीकरण कक्ष तयार करण्यात आलेले आहेत.

त्यानुषंगाने महानगरपालिकेने महानगरपालिका कार्यक्षेत्रात यापूर्वीच महानगरपालिकेची २ रुग्णालये, २१ नागरी प्राथमिक आरोग्य केंद्रे, ३ माता बाल संगोपन केंद्रे, ९ दवाखाने असून रुग्णांना वैद्यकीय सेवा देणेकामी महानगरपालिकेने कंत्राटी पद्धतीने ६ महिन्यासाठी विविध विषयांचे तज्ञ वैद्यकीय अधिकारी, वैद्यकीय अधिकारी एम.बी.बी.एस, बी.ए.एम.एस व इतर कर्मचारी यांची नियुक्ती केलेली आहे. तथापि वसई विरार शहर महानगरपालिका कार्यक्षेत्रात कोरोना विषाणू (कोव्हीड -१९) वाढता प्रादुर्भाव लक्षात घेऊन कार्यरत मनुष्यबळ संख्या अपूरी पडत असल्याने विशेष बाब म्हणून कोव्हीड-१९ करिता डेडीकेटेड कोव्हीड हॉस्पिटल, डेडीकेटेड कोव्हीड हेल्थ सेंटर, कोव्हीड केअर सेंटर याठिकाणी

कोरोना विषाणु रुग्णांना वैद्यकीय सेवा देणेकरिता तज्ञ वैद्यकीय अधिकारी, वैद्यकीय अधिकारी एम.बी.बी.एस, बी.ए.एम.एस. व बी.एच.एम.एस यांची ६ महिन्यासाठी अथवा कोव्हीड -१९ चा प्रादुर्भाव संपेपर्यंतच्या कालावधीसाठी नियुक्ती केलेली आहे व या व्यतिरिक्त महानगरपालिकेस आवश्यकतेप्रमाणे वेळोवेळी लागणारे वैद्यकीय अधिकारी यांची नियुक्त करणेची कार्यवाही सुरु आहे. त्याचप्रमाणे महानगरपालिका कार्यक्षेत्रातील खाजगी डॉक्टर एम.बी.बी.एस, बी.ए.एम.एस, बी.एच.एम.एस. या पदवीधारक डॉक्टर्सची वैद्यकीय सेवा अधिग्रहित केलेली आहे. यानुसार महानगरपालिकेने निश्चित केलेल्या दराप्रमाणे संबंधितांना मानधन अदा करण्यांत येते. तरीसुद्धा खाजगी डॉक्टरांचा प्रतिसाद मिळत नाही. याकरीता डेडीकेटेड कोव्हीड हॉस्पिटल, डेडीकेटेड कोव्हीड हेल्थ सेंटर, कोव्हीड केअर सेंटर येथील तज्ञ वैद्यकीय अधिकारी, वैद्यकीय अधिकारी एम.बी.बी.एस, बी.ए.एम.एस व बी.एच.एम.एस या पदाची आवश्यकता लक्षात घेऊन मा.आयुक्त यांच्याशी झालेल्या चर्चेनुसार तज्ञ वैद्यकीय अधिकारी यांना रु.२५००/- प्रतिदिन, वैद्यकीय अधिकारी एम.बी.बी.एस यांना रु.२०००/- प्रतिदिन, वैद्यकीय अधिकारी बी.ए.एम.एस यांना रु.१५००/- प्रतिदिन, वैद्यकीय अधिकारी बी.एच.एम.एस यांना रु.१२००/- प्रतिदिन याप्रमाणे मानधन निश्चित करणेस संमती दर्शविलेनुसार वरीलप्रमाणे प्रतिदिन मानधनावर महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियम १९४९ मधील कलम ५३ (३) नुसार मा. आयुक्त यांचे अधिकारात कंत्राटी पद्धतीने वर नमुद केलेले डॉक्टर्सची सेवा (कोव्हीड-१९ उद्रेक संपेपर्यंतच्या कालावधीसाठी) अस्थायी स्वरुपात सेवा घेणे आवश्यक आहे.

सदरचा खर्च सन २०२०-२१ या वित्तीय वर्षात वैद्यकीय अधिकारी / वैद्यकीस सेवा व्यवस्थापन ठेका या लेखाशिर्षाखाली रु.२९,००,००,०००/- या तरतुदीमधून भागविता येईल. तरी वरीलप्रमाणे सर्व डॉक्टर्सना प्रतिदिन मानधन निश्चित करुन अदा करणेबाबतच्या मान्यतेस्तव सादर.

**ठराव** :- वसई विरार शहर महानगरपालिकेच्या वैद्यकीय आरोग्य विभागाअंतर्गत येणारे रुग्णालये, माता बाल संगोपन केंद्र, नागरी प्राथमिक आरोग्य केंद्र, दवाखाने यांचे कामकाजासाठी आवश्यक असणारे वैद्यकीय अधिकारी व इतर पदावरील सर्व कर्मचारी वर्ग हा महानगरपालिकेने ६ महिन्यासाठी कंत्राटी पध्दतीने नियुक्त केलेला आहे. सदयस्थितीत महानगरपालिका कार्यक्षेत्रात कोरोना विषाणू (कोव्हीड -१९) वाढता प्रादुर्भाव लक्षात घेऊन कार्यरत मनुष्यबळ संख्या अपूरी पडत असल्याने विशेष बाब म्हणून कोव्हीड-१९ करिता डेडीकेटेड कोव्हीड हॉस्पिटल, डेडीकेटेड कोव्हीड हेल्थ सेंटर, कोव्हीड केअर सेंटर याठिकाणी कोरोना विषाणु रुग्णांना वैद्यकीय सेवा देणेकरिता तज्ञ वैद्यकीय अधिकारी, वैद्यकीय अधिकारी एम.बी.बी.एस, बी.ए.एम.एस. व बी.एच.एम.एस. यांची ६ महिन्यासाठी अथवा कोव्हीड -१९ चा प्रादुर्भाव संपेपर्यंतच्या कालावधीसाठी नियुक्ती केलेली आहेत व या व्यतिरिक्त महानगरपालिकेस आवश्यकतेप्रमाणे वेळोवेळी लागणारे वैद्यकीय अधिकारी यांची नियुक्त करण्यात येत आहेत. त्याचप्रमाणे महानगरपालिका कार्यक्षेत्रातील खाजगी डॉक्टर एम.बी.बी.एस, बी.ए.एम.एस, बी.एच.एम.एस. या पदवीधारक डॉक्टर्सची वैद्यकीय सेवा अधिग्रहित केलेली आहे. यानुसार महानगरपालिकेने अधिग्रहित केलेले खाजगी डॉक्टरांना सेवा देणेकामी चांगला प्रतिसाद मिळत नसल्याने कोव्हीड-१९ चे डेडीकेटेड कोव्हीड हॉस्पिटल, डेडीकेटेड कोव्हीड हेल्थ सेंटर, कोव्हीड केअर सेंटर येथील कामकाजाची आवश्यकता लक्षात घेऊन अधिग्रहित केलेल्या तज्ञ वैद्यकीय अधिकारी यांना रु.२५००/- प्रतिदिन, वैद्यकीय अधिकारी एम.बी.बी.एस यांना रु.२०००/- प्रतिदिन, वैद्यकीय अधिकारी बी.ए.एम.एस यांना रु.१५००/- प्रतिदिन, वैद्यकीय अधिकारी बी.एच.एम.एस यांना रु.१२००/- प्रतिदिन याप्रमाणे कोव्हीड-१९ चा उद्रेक संपेपर्यंतच्या कालावधीसाठी प्रतिदिन मानधन निश्चित करणेस मंजुरी देण्यांत येत असून याकामी येणाऱ्या संपूर्ण खर्चास प्रशासकीय व वित्तीय मंजूरी देण्यात येत आहे.

(गंगाथरन डी.) 14/8/2020

प्रशासक

वसई विरार शहर महानगरपालिका

# वसई- विरार शहर महानगरपालिका

मुख्य कार्यालय, विरार (पूर्व), जि.- पालघर, पिन नं. 401 305
दूरध्वनी- 0250-2525101/02/03/04/05/06, फॅक्स – 0250-2525107
ई-मेल- vasaivirarcorporation@yahoo.com

---

**प्रशासकीय ठराव क्र.** ६० | विभाग : वैद्यकीय आरोग्य
दिनांक : १६/०८/2020

---

प्रस्तावाचा विषय :- वसई विरार शहर महानगरपालिकेच्या कार्यक्षेत्रात कोव्हीड उद्रेकामध्ये सेवा देत असलेले वैद्यकीय आरोग्य विभागा अंतर्गत येणारे स्थायी व कंत्राटी पदांवरील वैद्यकीय अधिकारी व सर्व पदांवरील (वर्ग-३ व वर्ग-४) कर्मचारी वर्गास जोखीम म्हणून प्रोत्साहन भत्ता अदा करणेकामी प्रशासकीय व वित्तीय मान्यता मिळणेबाबत.

**प्रस्तावाचा मजकूर** :- वसई विरार शहर महानगरपालिका कार्यक्षेत्रात महानगरपालिकेची २ रुग्णालये, ३ माताबाल संगोपन केंद्रे तसेच विविध ठिकाणी २१ नागरी प्राथमिक आरोग्य केंद्रे व ८ दवाखाने कार्यरत असून यांचे कामकाज महानगरपालिकेच्या वैद्यकीय आरोग्य विभागामार्फत पाहिले जाते. यासाठी आवश्यक असणारे तज्ञ वैद्यकीय अधिकारी, वैद्यकीय अधिकारी एम.बी.बी.एस, वैद्यकीय अधिकारी बी.ए.एम.एस, जी.एन.एम, ए.एन.एम, फार्मासिस्ट, प्रयोगशाळा सहाय्यक, समुपदेष्टा, क्ष-किरण सहाय्यक, डायलेसिस सुपरवायझर, डायलेसिस टेक्निशियन, समुपदेष्टा, समाजसेवक, शितसाखळी तंत्रज्ञ इत्यादी पदे ही ६ महिन्यासाठी कंत्राटी पध्दतीने नियुक्त केलेले आहेत. जगभरात कोरोना विषाणूचा संसर्ग मोठ्या प्रमाणात झाला असून त्याचा प्रादुर्भाव आता आपल्या देशात व राज्यातही होत असल्याचे दिसून येत आहे. कोरोना विषाणू संदर्भात राष्ट्रीय आपत्ती व्यवस्थापन कायदा २००५ व भारतीय साथ नियंत्रण अधिनियम १८९७ अंतर्गत राज्य शासनाने दिलेल्या सूचनांचे अनुषंगाने वसई-विरार शहर महानगरपालिका कार्यक्षेत्रात कोरोना विषाणूंचा संसर्ग व प्रादुर्भाव पसरण्याची शक्यता लक्षात घेता त्यावर नियंत्रण करणे व कोरोना विषाणूचा संसर्ग असल्यास त्यात अधिक वाढ होऊ न देता त्यावर प्रतिबंधात्मक उपाययोजना आखणे आवश्यक आहे. महानगरपालिका कार्यक्षेत्रात कोव्हीड-१९ कोरोनाग्रस्त रुग्णांची संख्या दिवसेंदिवस वाढत असून त्यामध्ये मोठया प्रमाणावर वाढ होण्याची शक्यता नाकारता येत नाही. तसेच महानगरपालिका क्षेत्रात कोव्हीड-१९ चा वाढता प्रादुर्भाव लक्षात घेता महानगरपालिकेने सद्यस्थितीत कार्यरत अधिकारी, कर्मचारी वर्गाची अतिरिक्त तज्ञ वैद्यकीय अधिकारी, वैद्यकीय अधिकारी एम.बी.बी.एस, वैद्यकीय अधिकारी बी.ए.एम.एस, वैद्यकीय अधिकारी बी.एच.एम.एस, जी.एन.एम, ए.एन.एम, फार्मासिस्ट, प्रयोगशाळा सहाय्यक, क्ष-किरण सहाय्यक ही पदे कंत्राटी पध्दतीने कोव्हीड-१९ चा प्रादुर्भाव संपुष्टात येईपर्यंत नियुक्त करण्यांत आलेले आहेत.

सबब महानगरपालिका कार्यक्षेत्रात कोव्हिड-१९ वर नियंत्रण आणण्यासाठी व त्याचा प्रादुर्भाव रोखण्यासाठी विविध उपाययोजना करण्यात येत असून कोव्हीड-१९ रुग्णांवर उपचार करणेकरीता बोळींज आयसोलेशन सेंटर (DCH), विरार (प.), रिद्धी विनायक कोव्हीड रुग्णालय (DCH), नालासोपारा (प.), अग्रवाल विलगीकरण कक्ष (DCH), गोलानी नाका, वालिव, वसई (पूर्व), संत गोन्सालो गार्सिया कोव्हीड हेल्थ सेंटर (DCHC), वसई (प.), डेडिकेटेड कोव्हीड हॉस्पिटल, कौल सिटी (DCH), वसई (प.), वरुण इंडस्ट्रियल इस्टेट समर्पित कोव्हीड हेल्थ सेंटर (DCHC), वालीव, वसई (पू.) व विवा कॉलेज ऑफ आर्किटेक्चर, कोव्हीड केअर सेंटर (CCC), शिरगाव, विरार (पू.) व म्हाडा संकुल इमारत क्र.१० (CCC), बोळींज, विरार (प.) या ठिकाणी स्थापन करण्यांत आली आहेत. तसेच

महानगरपालिकेच्या चंदनसार, विरार (पू.) येथील ट्रामा केअर इमारतीत १५० खाटांचे समर्पित कोव्हीड रुग्णालय सुरु करण्याचे काम प्रगतीपथावर आहे.

कोव्हीड-१९ उद्रकामध्ये कर्तव्यावर असलेल्या डॉक्टर, नर्स व इतर आरोग्य कर्मचारी यांना कामकाज करताना असलेली जोखीम जास्त असल्याकारणाने अनेक डॉक्टर्स व इतर आरोग्य कर्मचारी कामावर येत नाही तसेच अनेक डॉक्टर्स हे दि.२९/०५/२०२० रोजी ६ महिन्याचा करार संपुष्टात आल्यावर पुन: कार्यालयात हजर झाले नाही. महानगरपालिकेद्वारे अनेक वेळा डॉक्टर व इतर आरोग्य कर्मचाऱ्यांच्या थेट मुलाखतीकरीता जाहिरात प्रसिध्द केली असता सदर जाहिरातींना जास्त प्रमाणात प्रतिसाद मिळाला नाही. दरम्यान इतर महानगरपालिकेद्वारे वेळोवेळी प्रसिद्ध होत असलेल्या थेट मुलाखतींमध्ये नमूद केलेले मानधन हे वसई विरार शहर महानगरपालिके मार्फत देत असलेल्या मानधनापेक्षा जास्त असल्याने वसई विरार शहर महानगरपालिकेच्या वैद्यकीय आरोग्य विभागामध्ये बहुतांश वैद्यकीय अधिकारी हे ८-१० वर्षापासुन चांगले अनुभव प्राप्त वैद्यकीय अधिकारी इतर ठिकाणी मिळत असलेल्या जास्त वेतनामुळे अन्य ठिकाणी रुजू होत आहेत किंवा कोव्हीड च्या जोखमीचा काही मोबदला मिळत नसल्यामुळे नोकरी सोडून जात आहेत. त्यामुळे वसई विरार शहर महानगरपालिकेमध्ये डॉक्टर व आरोग्य कर्मचारी यांची कमतरता निर्माण होत आहे व याचे परिणाम कामकाजावर होत आहे. ही सर्व कारणे लक्षात घेणे आवश्यक आहे. बृहन्मुंबई महानगरपालिकेने जोखीम पत्करुन कर्तव्यावर हजर होत असलेल्या आपल्या वैद्यकीय अधिकारी/कर्मचारी वर्गाकरीता रु.३००/- प्रति दिवस पुढील आदेशापर्यंत मंजूर केलेले आहे. शासनाच्या मा. आयुक्त, आरोग्य सेवा तथा अभियान संचालक, राष्ट्रीय आरोग्य अभियान, मुंबई यांचे कार्यालयीन पत्र क्र.राआसो/मनुष्यबळ कक्ष/कोव्हीड-१९/प्रोत्साहन भत्ता/१९२४३-३९७/२०२० दि.०६ जूलै २०२० नुसार खालील तक्त्यात नमुदप्रमाणे प्रोत्साहन भत्ता सप्टेंबर २०२० च्या मासिक वेतनासोबत अदा करणेस मंजूर केलेला आहे.

| अ.क्र. | पात्र अधिकारी/कर्मचारी | निकष | देय प्रोत्साहन भत्ता |
|---|---|---|---|
| १. | अतिदक्षता विभाग / शस्त्रक्रियागृह/प्रसुती कक्षात प्रत्यक्ष कार्यरत राहून कोविड पॉझिटिव्ह रुग्णांना सेवा देत आहेत असे राष्ट्रीय आरोग्य अभियानातील अधिकारी /कर्मचारी | दि.०१/०४/२०२० ते ३१/०८/२०२० या कालावधीत ज्यांची उपस्थिती ७५% पेक्षा जास्त | चालू वेतनाच्या १००% रक्कम |
| | | दि.०१/०४/२०२० ते ३१/०८/२०२० या कालावधीत ज्यांची उपस्थिती ५०% ते ७५% दरम्यान | चालू वेतनाच्या ७५% रक्कम |
| | | दि.०१/०४/२०२० ते ३१/०८/२०२० या कालावधीत ज्यांची उपस्थिती २५% ते ५०% दरम्यान | चालू वेतनाच्या ५०% रक्कम |
| २. | कोविड-१९ संशयित रुग्ण किंवा निदान झालेल्या रुग्णांच्या संपर्कात राहुन सेवा देणारे राष्ट्रीय आरोग्य अभियानातील अधिकारी / कर्मचारी(उदा. समर्पित कोविड आरोग्य केंद्र /कोविड केअर सेंटर) | दि.०१/०४/२०२० ते ३१/०८/२०२० या कालावधीत ज्यांची उपस्थिती ७५% पेक्षा जास्त | चालू वेतनाच्या ७५% रक्कम |
| | | दि.०१/०४/२०२० ते ३१/०८/२०२० या कालावधीत ज्यांची उपस्थिती ५०% ते ७५% दरम्यान | चालू वेतनाच्या ७५% रकमेच्या ५०% |
| | | दि.०१/०४/२०२० ते ३१/०८/२०२० या कालावधीत ज्यांची उपस्थिती २५% ते ५०% दरम्यान | चालू वेतनाच्या ७५% रकमेच्या २५% |
| ३. | कोविड-१९ च्या सर्वेक्षणाच्या कामात आहेत | दि.०१/०४/२०२० ते ३१/०८/२०२० या कालावधीत ज्यांची उपस्थिती | चालू वेतनाच्या ५०% रक्कम |

| | | | |
|---|---|---|---|
| | असे अधिकारी व कर्मचारी तसेच कोविड-१९ च्या साथरोगाच्या काळात कार्यालयीन कामकाज करणारे राष्ट्रीय आरोग्य अभियानातील अधिकारी/कर्मचारी (चक्राकार पद्धतीने कार्यरत कर्मचारी धरुन) | ७५% पेक्षा जास्त | |
| | | दि.०१/०४/२०२० ते ३१/०८/२०२० या कालावधीत ज्यांची उपस्थिती ५०% ते ७५% दरम्यान | चालू वेतनाच्या ५०% रकमेच्या ५०% |
| | | दि.०१/०४/२०२० ते ३१/०८/२०२० या कालावधीत ज्यांची उपस्थिती २५% ते ५०% दरम्यान | चालू वेतनाच्या ५०% रकमेच्या २५% |

यानुसार वसई विरार शहर महानगरपालिकेच्या वैद्यकीय आरोग्य विभागात राष्ट्रीय आरोग्य अभियान या कार्यक्रमांतर्गत कार्यरत असलेले वैद्यकीय अधिकारी व इतर सर्व पदांवरील कर्मचाऱ्यांना शासनाकडुन उपरोक्त तक्त्यात नमुद केलेप्रमाणे प्रोत्साहन भत्ता देण्यांत येणार आहे. याच धर्तीवर मा. आयुक्त, वसई विरार शहर महानगरपालिका यांच्यासोबत सदर विषयावर झालेल्या चर्चेनुसार वसई विरार शहर महानगरपालिकेच्या वैद्यकीय आरोग्य विभागामध्ये महानगरपालिकेच्या २ रुग्णालये, २१ नागरी प्राथमिक आरोग्य केंद्रे, ३ माताबाल संगोपन केंद्रे व १ माणिकपूर दवाखाना यांचे कामकाज वैद्यकीय आरोग्य विभागामार्फत करण्यात येते. त्यामुळे वैद्यकीय आरोग्य विभागांतर्गत काम करणारे सर्व स्थायी व कंत्राटी अधिकारी व कर्मचारी २ रुग्णालये, २१ नागरी प्राथमिक आरोग्य केंद्रे, ८ दवाखाने, ४ समर्पित कोव्हीड रुग्णालये (DCH), २ समर्पित कोव्हीड आरोग्य केंद्रे (DCHC), २ कोव्हीड केअर सेंटर (CCC), आर.सी.एच व आर.एन.टी.सी.पी या सर्व ठिकाणी कार्यरत सर्व पदांवरील स्थायी व कंत्राटी अधिकारी व सेवतील सर्व पदांवरील कर्मचारी (वर्ग-३ व वर्ग-४ चे सर्व कर्मचारी धरुन) हे जोखमीचे काम करीत असल्याने या सर्वांना कामकाज करणेसाठी प्रोत्साहन भत्ता हा जोखीम भत्ता म्हणून माहे जून २०२० ते पुढील आदेशापर्यंत कोव्हीड-१९ चा उद्रेक संपेपर्यंतच्या कालावधीसाठी वैद्यकीय अधिकारी यांना रु.४००/- प्रति दिवस व इतर सर्व पदावरील अधिकारी व कर्मचारी यांना रु.२००/- प्रति दिवस प्रोत्साहन भत्ता देणे आवश्यक आहे. यामुळे वैद्यकीय आरोग्य विभागा अंतर्गत सेवा देत असलेले सर्व वैद्यकीय अधिकारी व सर्व कर्मचारी वर्ग यांना प्रोत्साहन मिळेल व महानगरपालिकेच्या कामकाजासाठी आवश्यक अतिरिक्त मनुष्यबळ या जोखीम भत्ताच्या आश्वासनामुळे जास्तीत जास्त उमेदवार उपलब्ध होऊ शकतील.

तरी यानुसार वसई विरार शहर महानगरपालिकेच्या वैद्यकीय आरोग्य विभागा अंतर्गत येणारे (एन.एच.एम वगळून) कार्यरत महानगरपालिकेचे सर्व कंत्राटी पध्दतीच्या वैद्यकीय अधिकारी यांना **पूर्वलक्षीप्रभावाने माहे जून २०२० पासून रु.४००/- प्रति दिवस व इतर स्थायी व कंत्राटी पध्दतीचे** सर्व **अधिकारी व कर्मचारी यांना रु.२००/- प्रति दिवस पुढील आदेशापर्यंत कोव्हीड-१९ चा उद्रेक संपेपर्यंतच्या** कालावधीसाठी जोखीम म्हणून प्रोत्साहन भत्ता अदा करणेकामीच्या प्रशासकीय व वित्तीय मंजुरीच्या मान्यतेस्तव सादर.

**ठराव** :- शासनाच्या मा. आयुक्त, आरोग्य सेवा तथा अभियान संचालक, राष्ट्रीय आरोग्य अभियान, मुंबई यांचे कार्यालयीन पत्र क्र.राआसो/मनुष्यबळ कक्ष/कोव्हीड-१९/प्रोत्साहन भत्ता/१९२४३-३९७/२०२० दि.०६ जूलै २०२० चे नमुद तक्त्याप्रमाणे एन.यु.एच.एम. या कर्मचाऱ्यांना प्रोत्साहन भत्ता सप्टेंबर २०२० च्या मासिक वेतनासोबत अदा करणेस मंजूरी दिलेली आहे. यानुसार महानगरपालिकेच्या वैद्यकीय आरोग्य विभागात राष्ट्रीय आरोग्य अभियान या कार्यक्रमांतर्गत कार्यरत असलेले वैद्यकीय अधिकारी व इतर सर्व पदांवरील कर्मचारी वगळून शासनाच्या याच धर्तीवर वसई विरार शहर महानगरपालिकेच्या **वैद्यकीय आरोग्य विभाग व वैद्यकीय आरोग्य विभागांतर्गत येणारी रुग्णालये, नागरी प्राथमिक** आरोग्य **केंद्रे, दवाखाने, समर्पित कोव्हीड रुग्णालये (DCH), समर्पित कोव्हीड आरोग्य केंद्रे (DCHC)**, कोव्हीड **केअर सेंटर (CCC), आर.सी.एच व आर.एन.टी.सी.पी या सर्व ठिकाणी कार्यरत सर्व पदांवरील स्थायी व कंत्राटी अधिकारी व सेवतील सर्व पदांवरील कर्मचारी स्थायी, कंत्राटी व ठेका (वर्ग-३ व वर्ग-४ चे सर्व कर्मचारी धरुन)** हे जोखमीचे काम करीत असल्याने या सर्वांना कामकाज करणेसाठी प्रोत्साहन भत्ता हा

जोखीम भत्ता म्हणून पूर्वलक्षीप्रभावाने माहे जून २०२० ते पुढील आदेशापर्यंत कोव्हीड-१९ चा उद्रेक संपेपर्यंतच्या कालावधीसाठी वैद्यकीय अधिकारी यांना रु.४००/- प्रति दिवस व इतर सर्व पदावरील अधिकारी व कर्मचारी यांना रु.२००/- प्रति दिवस प्रोत्साहन भत्ता अदा करणेस मंजुरी देण्यांत येत असून याकामी येणाऱ्या संपूर्ण खर्चास प्रशासकीय व वित्तीय मंजूरी देण्यात येत आहे.

(गंगाथरन डी.)
प्रशासक
वसई विरार शहर महानगरपालिका

# वसई- विरार शहर महानगरपालिका

मुख्य कार्यालय, विरार (पूर्व), जि.- पालघर, पिन नं. 401 305
दूरध्वनी- 0250-2525101/02/03/04/05/06, फॅक्स – 0250-2525107
ई-मेल- vasaivirarcorporation@yahoo.com

**प्रशासकीय ठराव क्र.** ६९ | विभाग : वैद्यकीय आरोग्य
दिनांक :१७/०८/2020

**प्रस्तावाचा विषय** :- कोव्हीड-१९ करिता आरोग्य सेवा देणाऱ्या डॉक्टर्स व इतर सर्व पदावरील कर्मचारी वर्ग यांना कोव्हीड -१९ चा संसर्ग होऊन मृत्यु झाल्यास अथवा कोव्हिड-१९ चे कर्तव्यावर अपघाती मृत्यु झाल्यास महाराष्ट्र शासनाकडील झाल्यास महाराष्ट्र शासनाकडील प्रधानमंत्री गरीब कल्याण पॅकेज अंतर्गत इन्शुरन्स योजनेचे लाभ शासनाकडून मिळणेकरिता शासनास प्रस्तावित करणेकामी मंजूरी मिळणेबाबत.

**प्रस्तावाचा मजकूर** :- उपरोक्त विषयान्वये वसई-विरार शहर महानगरपालिका कार्यक्षेत्रात कोरोना विषाणूंचा संसर्ग व प्रादुर्भाव पसरण्याची शक्यता लक्षात घेता त्यावर नियंत्रण करणे व कोरोना विषाणूचा संसर्ग असल्यास त्यात अधिक वाढ होऊ न देता त्यावर प्रतिबंधात्मक उपाययोजना आखणे आवश्यक असल्याने याकरिता आरोग्य यंत्रणा सक्षम व येणाऱ्या आपत्तीला प्रतिसाद देण्यासाठी तयार ठेवणे आवश्यक आहे. त्यानुषंगाने महानगरपालिका विविध आरोग्य सुविधा तयार करत असून त्याचाचएक महत्वाचा भाग म्हणून वसई विरार शहर महानगरपालिकेने विविध ठिकाणी अलगीकरण कक्ष व विलगीकरण कक्ष तयार करण्यात आलेले आहेत.

वसई विरार शहर महानगरपालिकेने महानगरपालिका कार्यक्षेत्रात सद्यस्थितीत खालील ठिकाणी कोव्हीड-१९ ची रुग्णसेवेची व्यवस्था उपलब्ध करुन देण्यांत आली आहे.

तक्ता क्र .१

| अ.क्र. | कोव्हीड -१९ समर्पित रुग्णालये | केंद्राचे प्रकार | ठिकाण |
|---|---|---|---|
| १ | रिद्धी विनायक कोव्हीड रुग्णालय, | डेडीकेटेड कोव्हीड हॉस्पिटल | नालासोपारा (प.) |
| २ | अग्रवाल आयसोलेशन सेंटर | डेडीकेटेड कोव्हीड हॉस्पिटल | वालिव, वसई (पूर्व) |
| ३ | संत गोन्सालो गार्सिया कोव्हीड हेल्थ सेंटर, | डेडीकेटेड कोव्हीड हेल्थ सेंटर | वसई (प.) |
| ४ | म्हाडा संकूल इमारत क्र.१०, | कोव्हीड केअर सेंटर | बोळींज, विरार (प.) |
| ५ | वरुण इंडस्ट्रियल इस्टेट समर्पित हेल्थ सेंटर | डेडीकेटेड कोव्हीड हेल्थ सेंटर | वालिव, वसई (पूर्व) |
| ६ | डेडिकेटेड कोव्हीड हॉस्पिटल, | डेडीकेटेड कोव्हीड हेल्थ सेंटर | कौल सिटी, वसई (प.) |
| ७ | विवा कॉलेज ऑफ आर्किटेक्चर, कोव्हीड केअर सेंटर, | कोव्हीड केअर सेंटर | शिरगाव, विरार (पूर्व) |

वसई विरार शहर महानगरपालिका कार्यक्षेत्रात यापूर्वीच महानगरपालिकेची २ रुग्णालये, २१ नागरी प्राथमिक आरोग्य केंद्रे, ३ माता बाल संगोपन केंद्रे, ९ दवाखाने असून रुग्णांना वैद्यकीय सेवा देणेकामी महानगरपालिकेने कंत्राटी पद्धतीने ६ महिन्यासाठी विविध विषयांचे तज्ञ वैद्यकीय

1018

अधिकारी, वैद्यकीय अधिकारी एम.बी.बी.एस, बी.ए.एम.एस व इतर कर्मचारी यांची नियुक्ती खालील प्रमाणे केलेली आहे.

तक्ता क्र.२

| अ.क्र | पदाचे नाव | कर्मचारी संख्या |
|---|---|---|
| १ | तज्ञ वैद्यकीय अधिकारी | २२ |
| २ | वैद्यकीय अधिकारी | |
| | एम.बी.बी. एस | १६ |
| | बी.ए.एम.एस | ७७ |
| ३ | पी.एच.एन | ५ |
| ४ | जी.एन.एम | १६० |
| ५ | ए.एन.एम | २१६ |
| ६ | फार्मासिस्ट | ५६ |
| ७ | प्रयोगशाळा सहाय्यक | ४५ |
| ८ | क्ष-किरण सहाय्यक | ८ |
| ९ | शितसाखळी तंत्रज्ञ | १ |
| १० | डायलेसिस सुपरवायझर | १ |
| ११ | डायलेसिस तंत्रज्ञ | २ |
| १२ | समूपदेष्टा / समाजसेवक | ५ |

तथापि वसई विरार शहर महानगरपालिका कार्यक्षेत्रात कोरोना विषाणू (कोव्हीड -१९ ) वाढता प्रादुर्भाव लक्षात घेऊन कार्यरत मनुष्यबळ संख्या अपूरी पडत असल्याने महानगरपालिकेने विशेष बाब म्हणून कोव्हीड-१९ करिता ६ महिन्यासाठी अथवा कोव्हीड -१९ चा प्रादुर्भाव संपेपर्यतच्या कालावधीसाठी खालीलप्रमाणे वैद्यकीय अधिकारी व इतर कर्मचाऱ्यांची नियुक्ती केलेली आहे व या व्यतिरिक्त महानगरपालिकेस आवश्यकतेप्रमाणे वेळोवेळी लागणारे वैद्यकीय अधिकारी व इतर कर्मचारी नियुक्त करणेची कार्यवाही महानगरपालिका स्तरावर सुरु आहे.

तक्ता क्र.३

| अ.क्र | पदाचे नाव | कर्मचारी संख्या |
|---|---|---|
| १ | वैद्यकीय अधिकारी | |
| | मायक्रोबायोलॉजिस्ट | ०१ |
| | स्त्रीरोग तज्ञ | ०१ |
| | एम.बी.बी. एस | ४ |
| | बी.ए.एम.एस | १३ |
| | बी.एच.एम.एस | ०९ |
| २ | जी.एन.एम | ६९ |
| ३ | ए.एन.एम | ४८ |
| ४ | फार्मासिस्ट | ७ |
| ५ | प्रयोगशाळा सहाय्यक | ५ |
| ६ | क्ष-किरण सहाय्यक | २ |

तसेच महानगरपालिकेने महानगरपालिका कार्यक्षेत्रातील कोव्हीड केअर सेंटर, डेडीकेटेड कोव्हीड हेल्थ सेंटर, डेडीकेटेड कोव्हीड हॉस्पिटल येथे दाखल करण्यात आलेल्या रुग्णांना वैद्यकीय सेवा देणेकामी महानगरपालिका मार्फत सूरु असलेल्या थेट मुलाखतीस चांगला प्रतिसाद मिळत नसल्याकारणाने महानगरपालिकेने महानगरपालिका कार्यक्षेत्रातील खाजगी डॉक्टर एम.बी.बी.एस,

बी.ए.एम.एस, बी.एच.एम.एस या पदवीधारक डॉक्टर्सची खालीलप्रमाणे वैद्यकीय सेवा अधिग्रहित केलेली आहे. व आवश्यकतेप्रमाणे वेळोवेळी सेवा अधिग्रहित करण्याची कार्यवाही महानगरपालिका स्तरावर सुरु आहे.

तक्ता क्र – ४

| अ.क्र | पदाचे नाव | कर्मचारी संख्या |
|---|---|---|
| १ | वैद्यकीय अधिकारी | |
| | एम.बी.बी. एस | ४ |
| | बी.ए.एम.एस | १४ |
| | बी.एच.एम.एस | ८ |

वसई विरार शहर महानगरपालिका कार्यक्षेत्रात उपरोक्त तक्त्यात नमुद कोव्हीड केअर सेंटर, डेडीकेटेड कोव्हीड हेल्थ सेंटर, डेडीकेटेड कोव्हीड हॉस्पिटल येथे दाखल करण्यात आलेल्या रुग्णांना खालीलप्रमाणे अनुभवी खाजगी डॉक्टर्स विनामुल्य वैद्यकीय सेवा देत आहेत.

तक्ता क्र.५

| अ.क्र | पदाचे नाव | पद |
|---|---|---|
| १ | वैद्यकीय अधिकारी | ७ |

तसेच महानगरपालिकेत प्रजनन बाल आरोग्य (RCH) योजनेअंतर्गत एकूण २३ अधिकारी कर्मचारी वर्ग, राष्ट्रीय आरोग्य अभियान (NUHM) योजनेअंतर्गत एकूण ५० अधिकारी कर्मचारी वर्ग व सुधारित राष्ट्रीय क्षयरोग नियंत्रण कार्यक्रमांतर्गत (RNTCP) एकूण १५ अधिकारी कर्मचारी वर्ग कार्यरत असून सर्व वैद्यकीय आरोग्य विभागांतर्गत कामकाज करीत आहेत. यानुसार केंद्रशासनाच्या दि. २६/०६/२०२० रोजीच्या व महाराष्ट्र शासनाच्या सार्वजनिक आरोग्य विभागाच्या स्टेट हेल्थ ॲश्युरन्स सोसायटीच्या दि.०९/०४/२०२० रोजीच्या वरील संदर्भिय पत्रानुसार केंद्र शासन व न्यु इंडिया इन्शुरन्स कंपनी लिमिटेड यांच्या संयुक्त विद्यमाने कोव्हीड-१९ करिता लढा देत असलेल्या आरोग्य सेवा देणाऱ्या डॉक्टर्स व इतर कर्मचारी वर्ग यांच्याकरिता प्रधानमंत्री गरीब कल्याण पॅकेज विमा योजना प्रस्तावित केली असून या योजनेअंतर्गत शासकिय, खाजगी रुग्णालयीन कर्मचारी वर्ग, सेवा निवृत्त/ स्वयंसेवक/ स्थानिक स्वराज्य संस्था/ ठेका/ दैनंदिन पगार/ बाहय यंत्रणेद्वारे (Outsource) नियुक्त कर्मचारी वर्ग, अधिग्रहित केलेले डॉक्टर्स व कर्मचारी वर्ग व शासकिय रुग्णालय इ. मधील कर्मचारी वर्ग यांना कोव्हीड संक्रमण झाल्याने मृत्यु, कोव्हीड डयूटी करित असताना अपघाती मृत्यू झाल्यास मृत्युपश्चात या कोव्हीड विमाचा लाभ घेता येईल.

तरी यानुसार वसई विरार शहर महानगरपालिका परिसरातील महानगरपालिकेतील अधिकारी व कर्मचारी वर्ग महानगरपालिकेनेकंत्राटी पद्धतीने नियुक्त केलेले सर्व वैद्यकीय अधिकारी व कर्मचारी वर्ग. खाजगी रुग्णालयीन डॉक्टर व कर्मचारी अधिग्रहीत केलेले सर्व वैद्यकीय अधिकारी व कर्मचारी वर्ग तसेच विनामुल्य वैद्यकीय सेवा देत असलेले अनुभवी डॉक्टर्स RCH, NUHM व RNTCP या विभागात कार्यरत असलेले सर्व अधिकारी व कर्मचारी वर्ग यांना शासनाच्या या विमा योजनेच्या अटी - शर्तीच्या अधीन राहून व योजनेकरिता पात्रता प्रमाणित करुन कोव्हीड संक्रमणाद्वारे दुदैवाने मृत्यु झाल्यास अथवा कोव्हीड डयूटीवर असताना दुदैवाने अपघाती मृत्यू झाल्यास सदर विमा योजनेचे लाभ शासनाकडून मिळणेकरिता शासनाकडे प्रस्तावित करणेबाबत मंजूरीस्तव सादर.

**ठराव :-** वसई विरार शहर महानगरपालिका परिसरातील महानगरपालिकेतील स्थायी अधिकारी व कर्मचारी वर्ग महानगरपालिकेने कंत्राटी पद्धतीने नियुक्त केलेले सर्व वैद्यकीय अधिकारी व कर्मचारी वर्ग, (ठेका कर्मचारी धरुन) खाजगी रुग्णालयीन डॉक्टर व कर्मचारी अधिग्रहीत केलेले सर्व वैद्यकीय अधिकारी व कर्मचारी वर्ग तसेच विनामुल्य वैद्यकीय सेवा देत असलेले अनुभवी डॉक्टर्स RCH, NUHM व RNTCP या विभागात कार्यरत असलेले सर्व अधिकारी व कर्मचारी वर्ग यांना शासनाच्या या विमा योजनेच्या अटी - शर्तीच्या अधीन राहून व योजनेकरिता पात्रता प्रमाणित करुन कोव्हीड संक्रमणाद्वारे

दुर्दैवाने मृत्यु झाल्यास अथवा कोव्हीड डयूटीवर असताना दुर्दैवाने अपघाती मृत्यू झाल्यास सदर विमा योजनेचे लाभ शासनाकडून मिळणेकरिता शासनाकडे प्रस्ताव पाठविणेस प्रशासकीय मंजूरी देण्यात येत आहे.

14/8/2020.

(गंगाथरन डी.)
प्रशासक
वसई विरार शहर महानगरपालिका

# वसई-विरार शहर महानगरपालिका

मुख्य कार्यालय, विरार पुर्व, जि. पालघर, पिन नं. ४०१ ३०५

दुरध्वनी - २०५०-२५२५१०१/०२/०३/०४/०५/०६, फॅक्स - ०२५०-२५२५१०७

ई-मेल-vasaivirarcorporation@yahoo.com


प्रशासकिय ठराव क्र. ६२ विभाग :- आस्थापना

दिनांक :- १७/०८/२०२०

प्रस्तावाचा विषय :- वसई-विरार शहर महानगरपालिका आस्थापनेवरील वर्ग-३ ची पदे भरणेसाठी अनुभवी सक्षम यंत्रणा/ अभिकर्ता (एजन्सी) नेमणेबाबत.

प्रस्तावाचा मजकूर :- वसई-विरार शहर महानगरपालिकेचा सुधारित आकृतीबंध शासनाने दिनांक ०९/०९/२०१४ रोजी मंजूर केला आहे. आकृतीबंध मंजूर झाल्यानंतर मागासवर्ग कक्ष, कोकण भवन यांचेकडून वर्ग-३ व वर्ग -४ या संवर्गाची बिंदूनामावली (Roster) तपासून घेण्यात आली आहे. सदर बिंदूनामावली (Roster) तपासुन घेतांना मागासवर्गीयांचा अनुशेष प्राधान्याने भरावा, असे निर्देश दिलेले आहेत.

नगरविकास विभाग, दि. ०९ सप्टेंबर, २०१४ च्या शासन अधिसूचनेनुसार महानगरपालिकेत नामनिर्देशनाद्वारे (सरळसेवेने) करावयाच्या नियुक्तीसाठी कर्मचारी निवड समितीची रचना खालीलप्रमाणे विहित केलेली आहे.

| | | |
|---|---|---|
| १ | आयुक्त किंवा आयुक्तांनी पदनिर्देशित केलेला अन्य कोणताही अधिकारी | अध्यक्ष |
| २ | मुख्य लेखापरीक्षक | सदस्य |
| ३ | संबंधित विभाग प्रमुख | सदस्य |
| ४ | आयुक्तांनी नामनिर्देशित केलेला मागासवर्गीय प्रवर्गातील अधिकारी | सदस्य |
| ५ | जिल्हा महिला व बालकल्याण अधिकारी | सदस्य |
| ६ | जिल्हा समाज कल्याण अधिकारी | सदस्य |
| ७ | प्रकल्प अधिकारी, एकात्मिक आदिवासी विकास प्रकल्प | सदस्य |
| ८ | अल्पसंख्यांक प्रतिनिधी | सदस्य |
| ९ | उप-आयुक्त (आस्थापना) | सदस्य सचिव व निमंत्रक |

सामान्य प्रशासन विभागाकडील शासन निर्णय, क्र. प्रनिम-१२१४/प्र.क्र. (४३/१४)/१३-अ, दि. ५ जून, २०१४ अन्वये नामनिर्देशनाच्या कोट्यातील गट-क वर्गीय व गट-ब अराजपत्रित पदे भरतांना मौखिक परीक्षा (मुलाखती) न घेता फक्त लेखी परीक्षा घेण्याचे आदेश आहेत. त्याचा तपशिल खालीलप्रमाणे.

१. गट-क तसेच गट-ब (अराजपत्रित) मधील कोणत्याही पदासाठी उमेदवारांची निवड करतांना यापुढे मौखिक परीक्षा (मुलाखती) घेण्यात येऊ नये.
२. खालील अ.क्र. (३) व (४) वगळता, गट-क तसेच गट-ब (अराजपत्रित) मधील अन्य सर्व पदांकरीता उमेदवारांची निवड करतांना २०० गुणांची लेखी परीक्षा घेण्यात यावी. अशा परीक्षेमध्ये उमेदवारांनी प्राप्त केलेल्या गुणांच्या आधारे

निवडसूची तयार करुन निवडसूचीतील पात्र उमेदवारांची गुणवत्तेनुसार शिफारस करण्यात यावी.

३. ज्या पदांसाठी लेखी परीक्षा व व्यावसायिक चाचणी (Proficiency Test) घेणे आवश्यक असेल अशा पदांसाठी १२० गुणांची लेखी परीक्षा व ८० गुणांची व्यावसायिक चाचणी असे गुण ठेवून उमेदवारांची निवड करुन गुणवत्तापात्र उमेदवारांच्या शिफारशी करण्यात याव्यात.

४. शालांत परीक्षा उत्तीर्णपेक्षा कमी अर्हता आवश्यक असलेल्या संवर्गातील पदांसाठी व्यावसायिक चाचणी, आवश्यक तेथे शारिरीक क्षमतेची चाचणी घेणे आवश्यक असल्यामुळे अशा उमेदवरांची निवड करतांना ६० गुणांची व्यासायिक चाचणी व आवश्यक तेथे ४० गुणांची शारिरीक क्षमतेची चाचणी ठेवून उमेदवारांची निवड करण्यात यावी. ज्या पदांसाठी शारिरीक क्षमतेची चाचणी घेण्याची आवश्यकता नाही, अशा पदांसाठी १०० गुणांची व्यावसायिक चाचणी ठेवून उमेदवारांची निवड करण्यात यावी.

५. ज्या पदांसाठी फक्त लेखी परीक्षा घेऊन निवड करावयाची आहे, अशा पदांसाठी मराठी, इंग्रजी, सामान्य ज्ञान व बौध्दिक चाचणी या विषयांवरील प्रश्नांकरीता प्रत्येकी ५० गुण ठेवून २०० गुणांची लेखी परीक्षा घेऊन निवड करण्यात यावी, असे निर्देश आहेत.

महानगरपालिकेकडे सरळसेवेने भरती प्रक्रिया राबविणेसाठी परीक्षा घेण्यासाठी सक्षम पायाभूत सुविधा व अनुभवी कर्मचारीवृंद अपूरा असल्याने पदभरतीची प्रक्रिया पारदर्शक होण्याच्या अनुषंगाने मा. महासभा ठराव क्र.७, दि.१४/०७/२०१७ अन्वये मे. ऑनलाईन लि. या शासन मान्य व अनुभवी सक्षम ऐजन्सीची नेमणुक मान्यता देण्यात आलेली होती. दरम्यानच्या काळात सामान्य प्रशासन (माहिती तंत्रज्ञान) विभागाकडिल शासन निर्णय क्र. मातंसं- ०८८/२७/ २०१६ DIR-IT(MH) दि.१९ सप्टेंबर २०१७ अन्वये शासनाने सरळसेवा भरती प्रक्रिया शासनाच्या महापरिक्षा या पोर्टलवरुन करणे बंधनकारक केलेले होते. त्यानुसार मा. महासभा ठराव क्र. ०५, दि.१९/१२/२०१७ अन्वये "महापरिक्षा" सेल ची नेमणुक करण्यास मान्यता दिलेली आहे.

सामान्य प्रशासन (माहिती तंत्रज्ञान) विभागाकडिल शासन निर्णय क्र. मातंसं - २०/ प्र.क्र.११ / से-२/३९, दि.२०/०२/२०२० अन्वये "महापरिक्षा" पोर्टल अंतर्गत घेण्यात येणाऱ्या परिक्षा पध्दतीला आवश्यक बदल करण्यासाठी तात्पुर्ती स्थगीती देण्यात आलेली आहे. त्याअनुषंगाने खालीलप्रमाणे निर्णय घेण्यात आलेले आहेत.

१. शासनाच्या विविध विभागाच्या गट-क व गट-ड च्या पदभरती संदर्भात परीक्षा प्रक्रिया राबविण्याकरिता नविन निविदाप्रक्रिया राबविण्यात येवून सर्व्हीस प्रोव्हायडर (Service Provider) चे Empanelment करण्याची कार्यवाही महाआयटी मार्फत करण्यात येईल. त्यानुसार Empalement मधील निवड झालेल्या कंपन्या (Vendor) कडून संबंधित विभागास परीक्षा आयोजित करता येईल. जाहिरात ते निवडप्रक्रिया या परीक्षा प्रकीयेचे संचालन संबंधित विभागाच्या स्तरावर होईल. महाआयटी भूमिका ही OMR Vendor च्या Empanelment पुरती मर्यादीत राहील. OMR Vendor ची निवड ही Empanelment करण्यात

आलेल्या Vendor च्या यादीतून करण्यात यावी.

२. सद्य:स्थितीत ज्या प्रकरणी जाहिरात प्रसिद्ध होऊन निवड प्रक्रिया सुरु करण्यात आलेली आहे अथवा परिक्षेचे आयोजन होणे बाकी आहे अशा प्रकरणी त्या त्या संबंधित विभागांना सर्व आवश्यक माहिती महाआयटीकडून हस्तांतरीत करण्यात येईल.

३. शासनाच्या विविध विभागाच्या गट-क व गट-ड च्या पदभरतीकरिता घेण्यात येणा-या परिक्षा संदर्भातील सर्व प्रशासकिय नियंत्रण हे सामान्य प्रशासन विभागाचे असल्याने, सदर पदभरती संदर्भात उद्‌भवणा-या तांत्रिक बाबींविषयी, आवश्यकता भासल्यास, माहिती तत्रंज्ञान संचालनालय/महाआयटीमार्फत सल्ला पुरविण्यात येईल.

सध्याची परिस्थिती पाहता याबाबत शासनाकडुन Vendor (Service Provider) चे Empanelment करण्याचे कार्यवाहीस विलंब लागु शकतो. त्यानंतर महाआयटी पुढील कार्यवाहीस सुरवात करणार आहे. त्यामुळे त्यास भरपुर विलंब होणार आहे.

महानगरपालिकेत ठेके पध्दतीने लिपीक-टंकलेखक, कनिष्ठ अभियंते, डॉक्टर, फायरमन इत्यादीचे वेतन नियमित वेतनश्रेणी इतके किंवा त्यापेक्षा जास्त होत आहे. त्यामुळे सदरची पदे ठेकेपध्दतीने न घेता सरळसेवा भरती करुन घेतल्यास वेतन भत्त्यावरील खर्च कमी होईल. महानगरपालिकेचे Feeding Cader तयार होईल, सक्षम जबाबदार कर्मचारी वर्ग उपलब्ध होईल सध्या महानगरपालिकेतील बहुतांश कर्मचारी निवृत्ती होण्याच्या दिशेने आहेत. त्यामुळे नविन कर्मचारी वर्ग तयार होणे आवश्यक आहे. सबब महानगरपालिकेत खालील कर्मचारी वर्ग सरळ सेवेने भरणे आवश्यक आहे.

| अ. क्र. | संवर्गाचे नाव | मंजूर पदे | भरलेली पदे | रिक्त पदे |
|---|---|---|---|---|
| १ | उप-अधिक्षक | १६ | ० | १६ |
| २ | लिपीक-टंकलेखक | २०२ | ८५ | ११७ |
| ३ | लघु टंकलेखक | १९ | ० | १९ |
| ४ | कनिष्ठ अभियंता (स्थापत्य) | १०१ | ० | १०१ |
| ५ | कनिष्ठ अभियंता (विद्युत) | २२ | ० | २२ |
| ६ | कनिष्ठ अभियंता (यांत्रिक) | ०६ | ० | ०६ |
| ७ | सहा-उद्यान अधिक्षक | १ | ० | १ |
| ८ | उद्यान निरीक्षक | ७ | ० | ७ |
| ९ | अग्निशमन केंद्र अधिकारी | २ | ० | २ |
| १० | उप-अग्निशमन केंद्र अधिकारी | ४ | ० | ४ |
| ११ | प्रमुख अग्निशमन विमोचक | १० | ० | १० |
| १२ | आरोग्य निरीक्षक | ३६ | ० | ३६ |
| | एकूण | ४२६ | ८५ | ३४१ |

उपरोक्त भरती करताना हजारो अर्ज प्राप्त होण्याची शक्यता आहे. महानगरपालिकेकडे परीक्षा घेण्याकरीता पुरेसा अनुभवी कर्मचारीवर्ग तसेच इतर सक्षम पायाभूत सुविधा नसल्याने आलेल्या अर्जाची संवर्ग निहाय छाननी करणे, परीक्षेसाठी पात्र-अपात्र उमेदवारांची यादी तयार करणे, लेखी परिक्षांचे आयोजन करणे, निकाल जाहीर करणे इत्यादी कामे विहित मुदतीत करणे शक्य होणार नाही. त्यासाठी अनुभवी सक्षम यंत्रणा/अभिकर्ता (एजन्सी) नेमणे आवश्यक आहे.

गट-क मधील विविध संवर्गातील भरतीची प्रक्रिया संगणक प्रणालीद्वारे करावी लागणार आहे. त्यामध्ये भरती प्रक्रियेचे स्वरुप खालीलप्रमाणे असणार आहे.

**कामाचे स्वरुप**

१. भरती प्रक्रियेसंदर्भातील सर्व संवर्गाचे अर्ज ऑनलाईन पध्दतीने भरणेची सुविधा उपलब्ध करुन देणे. परिक्षा शुल्क ऑन लाईन भरण्याची सुविधा उपलब्ध करून देणेची आहे.

२. प्रत्येक संवर्गातील प्राप्त अर्जाची छाननी करुन संवर्गनिहाय (Cadrewise) व प्रवर्गनिहाय पात्र/अपात्र उमेदवारांची यादी मान्यता घेऊन ऑनलाईन प्रसिध्द करणे व त्याबाबतची सूचना संबंधित उमेदवारांना त्यांनी त्यांच्या अर्जात नमूद केलेल्या भ्रमणध्वनी (Mobile/Email Address) लघु संदेश प्रणालीद्वारे (SMS) देणे.

३. पात्र उमेदवारांचे लेखी परिक्षेसाठी बैठक क्रमांक, कार्यालयाने निश्‍चित केलेले परिक्षेचे ठिकाण व आवश्यकत्या सूचना नमूद करुन प्रवेशपत्र तयार करुन ऑनलाईन प्रसिध्द करणे तसेच सदर प्रवेशपत्र (Hall Ticket) डाऊनलोड (Download) प्रणाली तयार करणे.

४. लेखी परिक्षेसाठी परीक्षा केंद्राची निवड महानगरपालिकेच्या कार्यालयाकडून केली जाईल. त्या परिक्षाकेंद्राच्या ठिकाणी प्रत्यक्ष लेखी परीक्षेचे आयोजन करुन परीक्षा घेण्याची कार्यवाही सुरळीत पार पाडण्याची कार्यवाही करणे. लेखी परिक्षेसाठी संवर्ग निहाय प्रश्नपत्रिका महानगरपालिकेमार्फत देण्यात येतील.

५. परीक्षार्थीसाठी ओएमआर (Optical Mark Recognition) पध्दतीच्या उत्तरपत्रिका तयार करणे.

६. सर्व प्रथम ओएमआर (Optical Mark Recognition) मशिनवर काही निवडक उत्तरपत्रिका तपासून निवड समितीकडे द्याव्या लागतील. सदर उत्तरपत्रिका निवड समितीकडून (Manually) तपासून त्या (Optical Mark Recognition) मशिनने बरोबर तपासल्या आहेत किंवा नाही याची खात्री केली जाईल. खात्री झाल्यानंतरच पुढील उत्तर पत्रिका) ओएमआर (Optical Mark Recognition) मशिनवर तपासावयाच्या आहेत.

७. परीक्षा संपल्यानंतर एक तासाचे आत नमूना उत्तरपत्रीका महानगरपालिकेच्या/ संबंधीत वेबसाईटवर अपलोड करणे. तदनंतर उत्तरपत्रिकांची ऑनलाईन तपासणी करुन संवर्गनिहाय गुणवत्ता यादी महानगरपालिका कार्यालयाच्या देखरेखीखाली लेखी परिक्षेच्याच दिवशी तात्काळ तयार करुन देणे.

८. वरील प्रक्रियेच्या प्रत्येक टप्प्यांवर उमेदवारांच्या शंकांच निरसन करणे व आवश्यक ते मार्गदर्शन करणे तसेच आवश्यकतेप्रमाणे माहिती देणे.

९. भरती प्रक्रियेची संपूण माहिती योग्य पद्धतीने संकलीत करून प्राप्त अर्ज परिक्षेस

उपस्थीत उमेदवार, पास झालेले उमेदवार, नापास झालेले उमेदवार व त्यांचा तपशिल, उत्तरपत्रिका व त्यांचे गुणांकन इत्यादी माहिती ज्या माहितीची मागणी होऊ शकते. ५ प्रतीत (Hard copies) ५ प्रती (DVD Disc) व २ प्रती चांगल्या प्रतीची (External Hard Disk) ज्यास कमीत कमी १० वर्षाची हमी आवश्यक आहे.

परीक्षा प्रक्रियेदरम्यान योग्य ती गोपनीयता राखण्याची जबाबदारी संबंधित संस्थेची असेल.

वरीलप्रमाणे काम करु शकणाऱ्या अनुभवी सक्षम यंत्रणा/अभिकर्ता (एजन्सीज) नेमणे आवश्यक आहे. त्यासंबंधीच्या अटी व शर्ती पुढीलप्रमाणे असाव्यात.

## ब) अटी व शर्ती

१. संस्था कंपनी कायदा, १९५० खाली किंवा धर्मादाय आयुक्त कार्यालयाकडे नोंदणीकृत असावी.

२. अभिकर्त्याकडे महाराष्ट्र शासनाच्या कमीत कमी तीन खात्यातील/ कार्यालयातील निमशासकिय संस्था मधिल स्थानिक स्वराज्य संस्था भरती प्रक्रियेबाबत अर्ज भरुन घेणे, प्रत्यक्ष परीक्षेचे आयोजन करण्यापासून ते ओएमआर पध्दतीच्या उत्तरपत्रिका तपासून गुणवत्ता यादी तयार करण्यापर्यंत प्रक्रिया केल्याचा अनुभव असावा. संबंधीत संस्थाचे कामे योग्य प्रकारे पुर्ण केल्याचे प्रमाणपत्र जोडणे आवश्यक आहे.

३. अभिकर्त्याने भरतीप्रक्रियेदरम्यान कमीत कमी ५,००० परीक्षार्थी ओएमआर तंत्रज्ञान वापरुन समाधानकारक परीक्षा घेतलेली असावी.

४. अभिकर्त्याचे ओएमआर मशिन स्वत:चे आहे किंवा भाड्याचे आहे, याबाबत स्पष्ट उल्लेख करावा. भाड्याने घेणार असल्यास त्याचा तपशिल सोबत जोडणे अपेक्षित आहे. तसेच अभिकर्ता व ओएमआर मशिन पुरवठादार यांच्यामध्ये रक्कम रु. १००/- च्या स्टॅम्प पेपरवर संमतीपत्र जोडणे आवश्यक आहे.

५. याकामी वापरण्यात येणाऱ्या ओएमआर मशिनचे स्पेसिफिकेशन अभिकर्त्याने नमूद करणे आवश्यक आहे.

६. अनुभवाचा पुरावा म्हणून संबंधित खात्याचे भरती प्रक्रिया करणेबाबतची वैध आदेशाची प्रत व भरती प्रक्रिया समाधानकारकरित्या पुर्ण केल्याबाबतचे प्रमाणपत्र सादर करावे लागेल.

७. अभिकर्त्याकडे परीक्षा घेण्याकरीता सक्षम पायाभूत सुविधा व अनुभवी कर्मचारीवृंद असणे जरुरीचे आहे. त्याबाबतचा तपशिल निविदेसोबत स्वतंत्र प्रपत्रात सादर करावा लागेल.

८. भरती प्रक्रियेसाठी स्वतंत्र समर्पित इंटरनेट वेबसाईट असणे आवश्यक असेल.

९. आर्थिक क्षमता-अभिकर्त्याची आर्थिक परिस्थिती सक्षम असली पाहीजे. त्याने कोणत्याही एका राष्ट्रीयकृत/अनुसुचित बँकेचे रु. ५०,००,०००/- (अक्षरी रु. पन्नास लाख मात्र) चे पत प्रमाणपत्र (Bank Guarantee) आयुक्त, वसई-विरार शहर महानगरपालिका यांच्या नावे देणे आवश्यक राहील.

१०. अभिकर्त्याची भरती प्रक्रियाबाबतची गेल्या तीन वर्षापैकी कोणत्याही एका

वर्षाची उलाढाल रु. १,००,००,०००/- च्या पेक्षा जास्त असली पाहिजे. निविदा देकारासोबत त्याने गेल्या तीन वर्षाचे वार्षिक अहवाल सादर करणे आवश्यक राहील. सनदी लेखा परिक्षकांकडून प्रमाणित नफा-तोटा लेखा व ताळेबंदची प्रत जोडण आवश्यक

११. अभिकर्त्याचा भरती प्रक्रियेबाबतचा पूर्वइतिहास स्वच्छ असला पाहिजे, त्यासंदर्भात अभिकर्त्याने हमीपत्र देणे गरजेचे आहे. म्हणजेच शासकिय/निमशासकिय/लेखा/वित्तिय संस्था यांचे कडून काळया यादीत संस्थेचे नाव असता कामा नये या पृष्ठयर्थ प्रतीज्ञापत्र जोडावे.

१२. कार्यालयाचे सुचनेप्रमाणे भरती प्रक्रियेची रुपरेषा व वेळापत्रक तयार करुन विहित मुदतीत भरती प्रक्रिया पूर्ण करणे निवडलेल्या अभिकर्त्यावर बंधनकारक राहील. त्यात कसूर झाल्यास संबंधित अभिकर्त्यावर दंडात्मक कारवाई करण्यांत येईल.

सदर निविदेमध्ये एका उमेदवाराचा दर मागविण्याचे प्रस्तावित आहे. त्यामुळे परिक्षेस किती उमेदवार बसणार आहेत याचा अंदाज आताच वर्तविणे शक्य नसल्याने याकामी किती खर्च होईल हे सांगता येत नाही.

महानगरपालिकेकडे सरळसेवेने भरती प्रक्रिया राबविणेसाठी परीक्षा घेण्यासाठी सक्षम पायाभूत सुविधा व अनुभवी कर्मचारीवृंद अपूरा असल्याने याकामी अनुभवी सक्षम यंत्रणा/अभिकर्ता (एजन्सी) नेमणेकामी प्रशासकीय व वित्तीय मान्यता आवश्यक आहे.

महानगरपालिका आस्थापनेवरील वर्ग - ३ मधील विविध संवर्गातील रिक्त पदे भरण्यासाठी अनुभवी व सक्षम यंत्रणा/अभिकर्ता (एजन्सी) नेमणूक करणे बाबतचा प्रशासनाकडून आलेला अहवाल पाहणेत आला. त्यानुसार खालील प्रमाणे निर्णय घेण्यात येत आहे.

ठराव :- महानगरपालिकेकडे सरळसेवेने भरती प्रक्रिया राबविणेसाठी परीक्षा घेण्यासाठी सक्षम पायाभूत सुविधा व अनुभवी कर्मचारीवृंद अपूरा असल्याने याकामी अनुभवी सक्षम यंत्रणा/अभिकर्ता (एजन्सी) नेमणूक करणे आवश्यक आहे. वसई विरार शहर महानगरपालिका आस्थापनेवरील वर्ग-३ मधील काही संवर्गातील पदे प्राधान्याने सरळसेवेने भरणे आवश्यक आहे. महानगरपालिकेची वर्ग-३ ची सरळसेवेने करावयाची भरती प्रक्रिया पारदर्शी होण्याच्या अनुषंगाने अनुभवी व सक्षम एजन्सीची नेमणूक करण्यास व त्यासाठी होणा-या खर्चास प्रशासकीय व वित्तीय मान्यता देण्यात येत आहे.

१५/१२/२०२०.

आयुक्त तथा प्रशासक
वसई विरार शहर महानगरपालिका

# वसई -विरार शहर महानगरपालिका

मुख्य कार्यालय, विरार पुर्व, जि.-पालघर, पिन नं. ४०१ ३०५
दुरध्वनी -०२५०-२५२५१०१/०२/०३/०४/०५/०६, फॅक्स -०२५०-२५२५१०७,
ई-मेल vasaivirarcorporation@yahoo.com

---

प्रशासकीय ठराव क्र. ६३

विभाग : सार्व.बांधकाम
दिनांक : १९/०८/२०२०

प्रस्तावाचा विषय :- वसई विरार शहर महानगरपालिका कार्यक्षेत्रातील प्रभाग समिती A, B, C, D, E, F, G, H, I मधील विविध ठिकाणी लोखंडी जाळीची झाकणे बसविणेकामी प्रशासकीय व वित्तीय मान्यता देऊन ई-निविदा कार्यप्रणालीव्दारे निविदा दर मागविणे बाबत.

प्रस्तावाचा मजकूर :- वसई विरार शहर महानगरपालिका क्षेत्रात पावसाळ्या दरम्यान व या काळात भरतीची पातळी नेहमीच्या प्रमाणापेक्षा जादा असल्याने शहराताली खोलगट भागात तसेच रस्त्यावर पाणी साचून राहते. प्रभाग समिती A,B,C,D,E,F,G,H,I मधील विविध ठिकाणी रस्त्याच्या समपातळीत गटारे अथवा चेंबर कनेक्शन असून त्या ठिकाणी चेबंरवर बंदीस्त झाकणे अस्तीत्वात आहेत.

त्यामुळे पावसाळ्या दरम्यान सदर ठिकाणी पाण्याचा निचरा नैसर्गिकरित्या होऊ शकत नाही व शहरातील पाण्याची पातळी कमी होण्यास अडथळे निर्माण होतात तसेच शहरामध्ये सदर ठिकाणी वॉटर लॉगीग सातत्याने होत असते.

सदर ठिकाणी पाणी तुंबु नये व पाण्याचा निचरा सुरळीत होणे करीता सदर रस्त्याच्या समपातळीत गटारे अथवा चेंबर कनेक्शन असल्यास त्या चेंबरवरील बंदीस्त झाकणे बदलून त्या ठिकाणी लोखंडी जाळीची झाकणे बसविणे आवश्यक असल्याचे मा.आयुक्त सो. यांनी निर्देश दिले आहेत. यावर्षी पावसाचे प्रमाण जादा असल्याबाबतची

शक्यता व भरतीची पातळीची क्षमता कितपत असल्याबाबतचे नाकारता येणार नसल्यामुळे सदर ठिकाणी चेंबरवरील बंदीस्त झाकणे बदलून लोखंडी जाळीची झाकणे बसविणे गरजेचे आहे.

त्यानुसार वसई विरार शहर महानगरपालिका कार्यक्षेत्रातील प्रभाग समिती "A" TO" I " कार्यक्षेत्रामध्ये रक्कम रुपये ७५,६२,४०१/- इतक्या रकमेचे अंदाजपत्रक तयार करण्यात आलेले आहे.

सदर कामाचा खर्च "गटारावर चेंबर व चेंबर व्यवस्था" या लेखाशिर्ष अंतर्गत भागविण्यात येणार आहे.

मुळ तरतुद :- रु. १५,००,००,०००/-

या पुर्वीचा खर्च :- रु. २,७४,९२९/-

प्रस्तावीत खर्च :- रु. ७५,६२,४०१/-

उपलब्ध शिल्लक :- रु. १४,२१,६२,६७०/-

नियंत्रण नोंदवही पृ.क्र ९३ अ.क्र. २ वर नोंद घेतली आहे.

सबब उपरोक्त नमुद ठिकाणी तातडीने सार्व. बांधकाम विभागामार्फत वॉटर लॉगीग होत असलेल्या ठिकाणी समपातळीत गटारे अथवा चेंबर कनेक्शन असल्यास त्या चेंबरवरील बंदीस्त झाकणे बदलून त्या ठिकाणी लोखंडी जाळीची झाकणे बसविणेकामी महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियमाचे कलम ६७ (३) (क) अन्वये मा.आयुक्तांचे अधिकार व कर्तव्य नुसार राज्य दरसुची प्रमाणे तयार केलेल्या अंदाजपत्रकीय रक्कमेस प्रशासकीय व वित्तीय मान्यता देऊन ई - निविदा कार्यप्रणालीव्दारे निविदा दर मागविणे कामीचा प्रस्ताव आपल्या मंजूरीस्तव सादर.

ठराव :- वसई विरार शहर महानगरपालिका कार्यक्षेत्रातील प्रभाग समिती **A,B,C,D,E,F,G,H,I** मधील विविध ठिकाणी लोखंडी जाळीची झाकणे पुरविणे व बसविणे कामी होणाऱ्या एकुण रक्कम रु. ७५,६२,४०१/-इतक्या अंदाजपत्रकीय खर्चास महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियमाचे कलम ६७(३)(क) अन्वये मा. आयुक्त ह्यांचे अधिकार व कर्तव्य नुसार प्रशासकीय व वित्तीय मान्यता देऊन ई-निविदा कार्यप्रणालीव्दारे निविदा दर मागविणे कामी मान्यता देण्यात येत आहे.

18/8/2020.

आयुक्त तथा प्रशासक
वसई विरार शहर महानगरपालिका

वसई विरार शहर महानगरपालिका
मुख्य कार्यालय, विरार (पुर्व)
ता. वसई, जि.पालघर

---

प्रशासकीय ठराव क्र. ६४ विभागः- सार्व. वाचनालय

दि.२००६/२०२०

प्रस्तावाचा विषय :- वसई - विरार शहर महानगरपालिकेच्या प्रभाग समिती 'ड' आचोळे येथील सार्व. वाचनालयासाठी सन २०२० - २१ या वर्षाकरिता लागणारी वृत्तपत्रे, नियतकालिके व दिवाळी अंक खरेदी करणेकामी येणा-या खर्चास मंजूरी मिळणेबाबत.

प्रस्तावाचा मजकूर :-

वसई - विरार शहर महानगरपालिकेच्या प्रभाग समिती 'ड' आचोळे येथील सार्व. वाचनालयात मोठया प्रमाणात वाचकवर्ग ज्ञान अर्जनासाठी येत असून वाचनालयात येणा-या वृत्तपत्राचा लाभ मोठया प्रमाणात विद्यार्थी, वाचक, जेष्ठ नागरिक घेतात. सन २०२०-२१ या वित्तीय वर्षासाठी लागणारी वृत्तपत्रे, नियतकालिके व दिवाळी अंक खरेदी कामी अंदाजित रक्कम रु. ३,००,०००/- (अक्षरी रु. तीन लक्ष) इतका खर्च होणे अपेक्षित आहे. सन २०१९-२० या वित्तीय वर्षाकरीता वर्तमानपत्र, मासिके, साप्ताहिके, पाक्षिके व दिवाळी अंक खरेदी करणे कामी रक्कम रुपये ६४,६५७/- इतका खर्च झालेला आहे. सन २०२०-२१ या वित्तीय वर्षाकरीता वर्तमानपत्र, मासिके, साप्ताहिके, पाक्षिके व दिवाळी अंक खरेदी करणे कामी वार्षिक अंदाजपत्रकात वृत्तपत्रे, नियतकालिके व दिवाळी अंक या लेखाशीर्षांतर्गत रक्कम रुपये ३,००,०००/- (अक्षरी रु. तीन लक्ष मात्र) इतकी तरतूद असून त्यासंबंधीचा अहवाल हा लेखाविभाग प्रभाग समिती 'ड' आचोळे यांचेकडे सादर केला आहे. ग्रंथालयासाठी लागणारी दैनंदिन वृत्तपत्रे, नियतकालिके मासिके, पाक्षिके व दिवाळी अंक वार्षिक दरपत्रक पध्दतीने खरेदी केल्यास खरेदीच्या रक्कमेवर महानगरपालिकेस मिळणारी सूट लक्षात घेता महानगरपालिकेचा फायदा होणार आहे. तरी सन २०२०-२१ वित्तीय वर्षासाठी लागणारी दैनंदिन वृत्तपत्र, नियतकालिके व दिवाळी अंक दरपत्रक पध्दतीने खरेदी करणे कामी होणा-या रक्कम रु. १,५०,०००/- (अक्षरी रु. एक लक्ष पन्नास हजार) मात्र इतक्या खर्चास प्रशासकीय व वित्तीय मंजुरी मिळणेकामी सदरचा प्रस्ताव मा.आयुक्त वसई-विरार शहर महानगरपालिका यांचेक्डे मंजुरीस्तव सादर.

ठराव :-

वरील विषयावर मा.आयुक्त साहेब प्रशासक व.वि.श.म. यांचे सभागृहात सविस्तर चर्चा करण्यात आली. त्यानुसार सन २०२०-२१ या वित्तीय वर्षा करीता व.वि.श.म.च्या प्रभाग समिती 'ड' आचोळे येथील सार्व. वाचनालयाकरीता लागणारी वृत्तपत्रे / मासिके / साप्ताहिके / पाक्षिके व दिवाळी अंक खरेदी करणेकामी वृत्तपत्रात जाहीर दरपत्रक सूचना प्रसिध्द करुन दरपत्रक मागवून जास्त सवलत देणा-या मंजूर दरपत्रकधारकाकडून खरेदी करणेकामी प्रशासकीय मंजूरी देत आहे, तसेच सदरचे देयक अदा करणेकामी येणाऱ्या अंदाजित रक्कम रु. १,५०,०००/- (अक्षरी रु. एक लक्ष पन्नास हजार मात्र) इतक्या खर्चास वित्तीय मंजूरी देत आहे.

प्रशासक

वसई विरार शहर महानगरपालिका

# वसई विरार शहर महानगरपालिका

मुख्य कार्यालय विरार (पूर्व)
ता. वसई जि. पालघर

प्रशासकीय ठराव क्रमांक : ६५                                   विभाग : सार्वजनिक वाचनालय
दि. २०/०८/२०२०

**प्रस्तावाचा विषय :-** वसई-विरार शहर महानगरपालिकेच्या प्रभाग समिती 'सी' चंदनसार येथील सार्वजनिक वाचनालयसाठी सन २०२०-२१ या वर्षा करिता लागणारी वृतपत्रे, नियतकालिके व दिवाळी अंक खरेदी करणे कामी येणाऱ्या खर्चास मंजुरी मिळणे बाबत.

**प्रस्तावाचा मजकूर :-**

वसई विरार शहर महानगरपालिकेच्या प्रभाग समिती 'सी' चंदनसार येथील सार्वजनिक वाचनालयात मोठ्या प्रमाणात वाचक वर्ग ज्ञान अर्जुनासाठी येत असून वाचनालयात येणाऱ्या वृतपत्राचा लाभ मोठ्या प्रमाणात विद्यार्थी, वाचक, ज्येष्ठ नागरिक घेतात. सन २०२०-२१ या वित्तीय वर्षासाठी लागणारी वृत्तपत्रे, नियतकालिके व दिवाळी अंक खरेदी कामी अंदाजित रक्कम रु. ३00000/- (अक्षरी रुपये तीन लक्ष ) इतका खर्च होणे अपेक्षित आहे. सन २०१९-२0 या वित्तीय वर्षाकरिता वर्तमानपत्र, मासिके, साप्ताहिके, पाक्षिके व दिवाळी अंक खरेदी करणे कामी रक्कम रुपये २,९९,७0२/- इतका खर्च झाला आहे. सन २०२0-२१ या वित्तीय वर्षाकरिता वर्तमानपत्रे, मासिके, साप्ताहिके, पाक्षिके व दिवाळी अंक खरेदी करणे कामी वार्षिक अंदाजपत्रकात वृत्तपत्रे, नियतकालिके व दिवाळी अंक या लेखाशीर्षकांतर्गत रक्कम रुपये ३00000/- (अक्षरी रुपये तीन लक्ष ) मात्र इतकी तरतूद असून त्यासंबंधीचा अहवाल हा लेखाविभाग प्रभाग समिती 'सी' चंदनसार यांच्याकडे सादर केला आहे. ग्रंथालयासाठी लागणारी दैनंदिन वृतपत्रे, नियतकालिके, मासिके, पाक्षिके व दिवाळी अंक वार्षिक दरपत्रक पद्धतीने खरेदी केल्यास खरेदीच्या रकमेवर महानगरपालिकेस मिळणारी सूट लक्षात घेता. महानगरपालिकेचा फायदा होणार आहे. तरी सन २०२0-२१ वित्तीय वर्षासाठी लागणारी दैनंदिन वृत्तपत्रे, नियतकालिके व दिवाळी अंक दरपत्रक पद्धतीने खरेदी करणे कामी होणाऱ्या रक्कम रुपये ३00000/- ( अक्षरी रुपये तीन लक्ष मात्र ) इतक्या खर्चास प्रशासकीय व वित्तीय मंजुरी मिळणे कमी सदरचा प्रस्ताव मा. आयुक्त वसई विरार शहर महानगरपालिका यांच्याकडे मंजुरीस्तव सादर .

**ठराव :-**

वरील विषयावर मा. आयुक्त साहेब प्रशासक व वसई विरार शहर महानगरपालिका यांचे सभागृहात सविस्तर चर्चा करण्यात आली. त्यानुसार सन २०२0-२१ या वित्तीय वर्षाकरिता व वसई विरार शहर महानगरपालिकेच्या प्रभाग समिती 'सी' चंदनसार येथील सार्वजनिक वाचनालया करिता लागणारी वृतपत्र, मासिके, साप्ताहिके, पाक्षिके व दिवाळी अंक खरेदी करणे कामी जाहीर दरपत्रक सूचना प्रसिद्ध करून दरपत्रक मागून जास्त सवलत देणाऱ्या मंजुर दरपत्रकधारकास खरेदी करणे कामी प्रशासकीय मंजुरी देत आहे. तसेच सदरचे देयके अदा करणे कामी येणाऱ्या अंदाजित रक्कम २00000/- (अक्षरी रु. दोन लक्ष मात्र) इतका खर्चास वित्तीय मंजुरी देत आहे.

20/8/2020
प्रशासक
वसई विरार शहर महानगरपालिका

# वसई विरार शहर महानगरपालिका

मुख्य् कार्यालय, विरार पूर्व, जि- पालघर पिन नं 401 305
दूरध्वनी – 0250 -2525101/02/03/04/05/06, फॅक्स - 0250- 2525107.
ई-मेल vasaivirarcorporation@yahoo.com

---

प्रशासकीय ठराव क्र. ६६

विभाग: वृक्षप्राधिकरण
दिनांक: २० /०८/ 2020

---

प्रस्तावाचा विषय : वसई-विरार शहर महानगरपालिकेच्या वृक्षप्राधिकरण विभागासाठी 6 नग मकिटा कंपनीचे सॉ कटर मशिन व इतर साहित्य खरेदी कामी प्रशासकीय व वित्तीय मंजुरी मिळणेबाबत.

प्रस्तावाचा मजकूर : सविनय सादर करण्यात येते की, वसई-विरार शहर महानगरपालिकेच्या कार्यक्षेत्रामध्ये नैसर्गिक आपत्तीच्या कालावधीत, पूर परिस्थितीत तसेच वादळी वाऱ्याने कोसळणाऱ्या झाडांची कापणी/छाटणी करून देणेकरिता नागरीकांच्या मोठया प्रमाणात तक्रारी प्राप्त होत असतात. पावसाळयाच्या दिवसात मुसळधार पाऊस तसेच वादळी वाऱ्यामुळे सर्व प्रभाग समिती क्षेत्रामधील रहदारीच्या ठिकाणी, वस्तीच्या ठिकाणी, घरावर, इमारतींच्या आवारात, विद्युत तारांवर, ट्रांन्सफॉर्मरवर, रस्त्यावर ये-जा करीत असलेल्या वाहनांवर झाडे उन्मळून पडल्याच्या घटना खूप मोठया प्रमाणात घडत असतात. त्यामुळे अशा परिस्थितीमध्ये नैसर्गिकरित्या कोसळून पडलेले किंवा धोकादायक असलेले वृक्ष त्वरीत कापून बाजूला करण्यासाठी मकिटा कंपनीच्या पेट्रोल ड्रिव्हन सॉ कटर मशिनची आवश्यकता व महत्व समजून घेऊन सदर मशिन खरेदी करणे करीता सूचना दिलेल्या आहेत. त्यामुळे मकिटा कंपनीचे सॉ कटर बिना निविदा थेट मकिटा कंपनीचे अधिकृत विक्रेत्याकडून खरेदी करणे करीता प्राप्त झालेले दर खालील प्रमाणे आहेत.

| अ.क्र. | तपशिल | दर प्रती नग | खरेदी नग | एकूण अपेक्षित खर्च |
|---|---|---|---|---|
| 1 | 2 | 3 | 4 | 5 |
| 1 | Makita Chain Saw cutter EA7900P6E (Supply with 24 guide bar & Chain) | 59000/- | 6 | 354000/- |
| 2 | Makita Guide Bar 24" | 2900/- | 6 | 17400/- |
| 3 | Makita Chain Saw 24" | 1650/- | 6 | 9900 |
| | Total =1+2+3 | | | 381300/- |
| | | | 18% GST | 68634/- |
| | | | एकूण | 449934/- |

सदर मकिटा कटर मशिन खरेदीस होणारा खर्च रक्कम रू.449934/- (अक्षरी- चार लक्ष एकोणपन्नास हजार नऊशे चौतीस रूपये मात्र/-) इतका खर्च वसई-विरार शहर महानगरपालिकेच्या सन 2020-21 च्या अर्थसंकल्पीय अंदाजपत्रकातील लेखाशिर्ष- संयंत्रे व साहित्य खरेदी (लेखा सांकेतांक क्र. 567-4140) मधील तरतुद रक्कम रू.30 लक्ष मधून भागविता येईल.

सद्या पावसाळा सुरू असून वादळी वाऱ्यामुळे महापालिका क्षेत्रात झाडे उन्मळून पडण्याचे प्रकार जास्त घडतात. महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियम 1949 चे कलम 67(3) क अन्वये मा.आयुक्त सो. यांना असलेले अधिकारानुसार विनानिविदा तातडीने मकिटा कंपनीचे पेट्रोल ड्रिव्हन सॉ कटर मशिन व इतर साहित्य विनानिविदा थेट अधिकृत विक्रेत्यांकडून खरेदी करता येणे शक्य होईल.

तरी मकिटा कंपनीचे पेट्रोल ड्रिव्हन नविन सॉ कटर मशिन 6 नग व इतर साहित्य विनानिविदा थेट अधिकृत विक्रेत्याकडून खरेदी करणेस येणाऱ्या अंदाजित रक्कम रू.4,49,934/- (अक्षरी- चार लक्ष एकोणपन्नास हजार नऊशे चौतीस रूपये मात्र/-) खर्चास महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियम 1949 चे कलम 67(3) क अन्वये मा.आयुक्त तथा प्रशासक ह्यांचेपुढे मांडणेस शिफारस असे.

ठराव : सदर मकिटा कंपनीचे पेट्रोल ड्रिव्हन सॉ कटर मशिन 6 नग व इतर साहित्य विनानिविदा अधिकृत विक्रेत्याकडून थेट खरेदी करणेस येणाऱ्या अंदाजित रक्कम रू.4,49,934/- (अक्षरी- चार लक्ष एकोणपन्नास हजार नऊशे चौतीस रूपये मात्र/-) खर्चास महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियम 1949 चे कलम 67(3) क अन्वये प्रशासकीय व वित्तीय मान्यता देणेत येत आहे.

11/8/2020

प्रशासक

वसई विरार शहर महानगरपालिका

**मुख्य कार्यालय, विरार**
**विरार (पूर्व),**
**ता. वसई, जि. पालघर - ४०१ ३०५.**

**दूरध्वनी :** ०२५० - २५२५१०१ / ०२/०३/०४/०५/०६
**फॅक्स :** ०२५० - २५२५१०७
**ई-मेल :** vasaivirarcorporation@yahoo.com

वसई-विरार शहर महानगरपालिका
स्थापना : ३ जुलै २००९

**जावक क्र. :** व.वि.श.म.
**दिनांक :**

प्रशासकिय ठराव क्र. ६८

विभाग :- सामान्य प्रशासन
दिनांक :- २०/०८/२०२०

---

**प्रस्तावाचा विषय :-** प्रभाग समिती आय कार्यक्षेत्रातील किल्लाबंदर येथे गणेश विसर्जन करिता भाडे तत्वावर बोट पुरविणे याकामी आर्थिक व प्रशासकिय मान्यता मिळणेबाबत.

**प्रस्तावाचा मजकूर :-** वसई - विरार शहर महानगरपालिका प्रभाग समिती आय कार्यालय क्षेत्रातील प्रभाग समिती आय क्षेत्रातील गणपती उत्सव मोठ्या प्रमाणात साजरा होतो. सदर ठिकाणी गणेश विसर्जनाच्या वेळी खाजगी व सार्वजनिक गणपतीचे विसर्जन किल्लाबंदर या ठिकाणी समुद्रात केले जाते. मुर्तीची विंठबना होऊ नये म्हणून दि. २३/०८/२०२०, २६/०८/२०२०, २७/०८/२०२०, २८/०८/२०२० व ०१/०९/२०२० रोजी विसर्जन खोल समुद्रात करणे करिता बोटींची आवश्यकता लागणार आहे. त्याकरिता या वर्षी गणेश विसर्जनाकरिता बोट भाडेतत्वावर उपलब्ध करुन घेणे गरजेचे आहे.

खालील नमूद केल्याप्रमाणे विसर्जनाच्या ठिकाणी बोट तात्पुरत्या स्वरुपासाठी सुविधा देणे गरजेचे आहे.

| अ.क्र. | ठिकाण | प्रती दिन अपेक्षित बोट संख्या | सन २०१९-२० मध्ये प्रती युनिट झालेला खर्च | सन २०२०-२१ मध्ये अंदाजित १०% वाढीव दर |
|---|---|---|---|---|
| १. | किल्लाबंदर | ४ | ५,७००/- | ६,३००/- |

सदर कामाकरिता बोट भाडेतत्वावर पुरवठा करणेकामी रक्कम रु. ४०,०००/- अंदाजित खर्च अपेक्षित आहे.

**ठराव :-** वसई - विरार शहर महानगरपालिका प्रभाग समिती आय वसई विभागीय कार्यक्षेत्रातील किल्लाबंदर या ठिकाणी भाडे तत्वावर बोट पुरवठा करणेकरिता होणार अंदाजित खर्च रक्कम रु. ४०,०००/- (अक्षरी चाळीस हजार मात्र) एवढ्या खर्चास महाराष्ट्र कलम ६७ (३)(क) अन्वये मला प्राप्त असलेल्या अधिकारानुसार प्रशासकिय व वित्तीय मान्यता देण्यात येत आहे.

१५/८
आयुक्त तथा प्रशासक
वसई - विरार शहर महानगरपालिका

# वसई-विरार शहर महानगरपालिका

मुख्य कार्यालय, विरार पुर्व, जि. - पालघर, पिन नं. ४०१ ३०५
दुरध्वनी - ०२५०-२५२५१०१/०२/०३/०४/०५/०६, फॅक्स - ०२५०-२५२५१०७,
ई-मेल vasaivirarcorporation@yahoo.com

---

**प्रशासकीय ठराव क्र.** ६८

विभाग :- पाणी पुरवठा
दिनांक :-२० /०८/२०२०

---

**प्रस्तावाचा विषय :-** पेल्हार जलशुध्दीकरण केंद्र येथे पाणी पुरवठा (जुन्या व नविन) टप्पा-१ व टप्पा-२ योजनेतील फिल्टर मिडीयामधील वाळू (सॅंड) बदलणे तसेच फिल्टरची दुरुस्ती कामे करणे बाबत.

**प्रस्तावाचा मजकूर :-** सादर करण्यांत येते की, पेल्हार जलशुध्दीकरण केंद्र येथे पाणी पुरवठा (जुन्या) टप्पा-१ योजनेअंतर्गत ७.२० द.ल.ली पाणी पुरवठा होत आहे. सदरची योजना १९७९ मध्ये कार्यान्वीत करण्यात आली आहे. सदर योजनेच्या जलशुध्दीकरण केंद्रातील जुन्या टप्पा-१ योजनेतील प्रेशर फिल्टर मिडीयामधील वाळू (सॅंड) सन २००३ साली बदलण्यात आली होती तसेच जलशुध्दीकरण केंद्रातील (नविन) टप्पा-२ योजनेतील रेती बेड फिल्टर मिडीयामधील वाळू (सॅंड) सन २०१३ साली बदलण्यात आली होती . तद्नंतर सदर मिडीयामधून दैनंदिनपणे पाणी शुध्द करण्याची प्रक्रिया अखंड चालु आहे. सद्य:स्थितीत टप्पा-१ मागील १७ वर्षापासुन व टप्पा-२ मागील ०७ वर्षाच्या सततच्या वापराने सदर फिल्टर मिडीयामधील वाळू जुनी होऊन अकार्यक्षम झाली. परिणामी पाणी पुर्णपणे शुध्द होत नाही. सदर जुनी योजना पुर्णपणे निष्कासीत करुन ७.५० द.ल.ली क्षमतेचे नविन जलशुध्दीकरण केंद्र उभारणे प्रस्तावित आहे. सदर नविन योजनेकामे पूर्ण करण्यास अंदाजे १५ ते १८ महिन्याचा कालावधी लागणार आहे. सदर योजना पुर्णपणे सुरु होईपर्यंत जुन्या व नविन योजनेमार्फत जलशुध्दीकरण करणे गरजेचे आहे. त्याअनुषंगाने प्रेशर फिल्टर मधील वाळू काढून त्याऐवजी नविन फिल्टरची वाळू टाकणे आवश्यक आहे. जेणे करुन पाणी शुध्द करण्याची प्रक्रिया योग्य प्रकारे होऊन शुध्द पाणी पुरवठा करता येईल.

पेल्हार पाणी पुरवठा जुन्या योजनेवर खालील प्रमाणे कामे करणे आवश्यक आहे.

| अ. क्र. | कामाचे नाव / स्वरुप | अंदाजपत्रकीय रक्कम | ठेकेदाराचे नाव |
|---|---|---|---|
| १. | पेल्हार जलशुध्दीकरण केंद्र येथे पाणी पुरवठा (जुन्या) टप्पा-१ योजनेतील प्रेशर फिल्टर मिडीयामधील वाळू (सॅंड), नोझल बदलणे तसेच फिल्टरची दुरुस्ती कामे करणे. | रू. १२,२३,४१०/- | मे. के. आर. कन्स्ट्रक्शन |
| २. | पेल्हार जलशुध्दीकरण केंद्र येथे पाणी पुरवठा (नविन) टप्पा-२ योजनेतील प्रेशर फिल्टर मिडीयामधील वाळू (सॅंड), नोझल बदलणे तसेच फिल्टरची दुरुस्ती कामे करणे. | रू. ११,२८,५६९/- | मे. के. आर. कन्स्ट्रक्शन |

वरीलप्रमाणे कामे करण्याकरीता महाराष्ट्र जीवन प्राधिकरणाच्या दरसुचीनुसार अंदाजपत्रक तयार करण्यात आले असून सोबत जोडले आहे. सदर कामाकरीता रू.२३,५१,९७९/- इतका खर्च होणार आहे. सदर खर्च " **पेल्हार पाणी पुरवठा योजना (विद्युत, जनित्र, पपिंग व इतर)** " या लेखाशिर्षा अंतर्गत भागविणे शक्य होणार आहे.

उपरोक्त पेल्हार जलशुध्दीकरण केंद्र येथे पाणी पुरवठा (जुन्या व नविन) टप्पा-१ व टप्पा-२ योजनेतील फिल्टर मिडीयामधील वाळू (सँड) बदलणे तसेच फिल्टरची दुरुस्ती करणे हे काम नागरीकांना शुध्द पाणी पुरवठा करण्याच्या दृष्टीने लवकरात लवकर करणे गरजेचे असून पाणी पुरवठा ही अत्यावश्यक सेवा लक्षात घेता महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियम अनुसुची - ड, प्रकरण-५ संविदा २ (२) नुसार निविदा न काढता वर नमुद केलेल्या नोंदणीकृत ठेकेदारांकडून शासनाच्या दरसुची नुसार तयार केलेल्या अंदाजपत्रकानुसार काम करुन घेणेसाठी संविदा करण्यास व कार्यादेश देण्यास मा.आयुक्त तथा प्रशासक सो, यांच्या मंजुरीस्तव सादर.

---

**ठराव :-** पेल्हार जलशुध्दीकरण केंद्र येथे पाणी पुरवठा (जुन्या व नविन) टप्पा-१ व टप्पा-२ योजनेतील फिल्टर मिडीयामधील वाळू (सँड) बदलणे तसेच फिल्टरची दुरुस्ती कामे करणे कामी रक्कम रु. २३,५१,९७९/- इतक्या अंदाजपत्रकीय खर्चास प्रशासकीय व वित्तीय मान्यता देण्यात येत असून महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियम अनुसुची - ड, प्रकरण-५ संविदा २ (२) नुसार मे. के.आर. कन्स्ट्रक्शन्स यांच्यासमवेत संविदा करून कार्यादेश देण्यास मंजूरी असे.

**मा.आयुक्त तथा प्रशासक**
**वसई-विरार शहर महानगरपालिका**

वसई-विरार शहर महानगरपालिका
मुख्य कार्यालय, विरार पुर्व, जि. - पालघर, पिन नं. ४०१ ३०५
दुरध्वनी - ०२५०-२५२५१०१/०२/०३/०४/०५/०६, फॅक्स ०२५०-२५२५१०७,
ई-मेल- vasaivirarcorporation@yahoo.com

प्रशासकीय ठराव क्र. ६९

विभाग: सामान्य प्रशासन
दिनांक २०/०८/२०२०

**प्रस्तावाचा विषय:- वसई-विरार शहर महानगरपालिकेच्या हद्दीमध्ये सन २०२० गणेश विसर्जनाकरिता लाकडी व फायबर तराफे दुरुस्ती व पुरवठा करणे कामी प्राप्त झालेल्या कमी दरांच्या निविदाकारांबरोबर संविदा करणेस मान्यता मिळणेबाबत.**

**प्रस्तावाचा मजकूर :-**

वसई-विरार शहर महानगरपालिकेस सन २०२० गणेश विसर्जनाकरिता लाकडी व फायबर तराफे दुरुस्ती व पुरवठा करणेकामी मा.आयुक्त यांनी दिनांक०४/०८/२०२० अन्वये दिलेल्या मंजूरीवरुन जा.क्र.वविशम/साप्रवि/१९५/२०२० दि.०४/०८/२०२० रोजी जाहिर सूचना http://mahatender.gov.in या संकेतस्थळावर प्रसिध्द करुन दि. १४/०८/२०२० रोजी दुपारी ३.०० वाजेपर्यंत ई-निविदा मागविण्यात आल्या होत्या. उपरोक्त मुदतीत एकूण ५ ई-निविदा प्राप्त झाल्या आहेत.

१) मे.नालासोपारा इंटरप्रायझेस
२) मे.संदीप सी.मोहिते
३) मे.आदीनाथ इंटरप्रायझेस
४) मे.रोहन वसंत नाईक
५) मे.एम.के.शहा इंटरप्रायझेस

अ.क्र. २ चा वित्तिय बाबींचे लिफाफे दि.१४/०८/२०२० रोजी सायंकाळी ५.३७ वाजता उघडण्यांत आले.प्राप्त ई-निविदामधील तुलनात्मक कमी दरांचे निविदाकार खालीलप्रमाणे आहेत.

१) मे.नालासोपारा इंटरप्रायझेस - घटक क्र.- ३(१)
२) मे.संदीप सी. माहिते - निरंक
३) मे.आदिनाथ इंटरप्रायझेस - घटक क्र. - ३(२,३,४,५,) ६,७,८,९, ११(३)
४) मे. रोहन वसंत नाईक - घटक क्र. - १,२, ४(१,२,३,४,५) ५, १०(१,२,३) ११(१,२)
५) मे.एम.के.शहा इंटरप्रायझेस - निरंक

वरील प्राप्त ई-निविदांमधील तुलनात्मक कमी दराचे घटकांचे प्राप्त दर बाजारभावाप्रमाणे असून योग्य व वाजवी आहेत. तरी प्राप्त झालेले तुलनात्मक कमी दरांचे घटकांना दि.१७/०८/२०२० अन्वये निविदा समितीने मान्यता दिलेली आहे. त्यानुसार ई-निविदे मधील कमी दर मंजूरीस व निविदाकारांसोबत संविदा करण्यांस महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियम कलम ७३ (ड) अन्वये मा.आयुक्त तथा प्रशासक हयांच्या मंजूरीस्तव सादर.

**ठराव :-** सन-२०२० गणेश विसर्जनाकरिता लाकडी व फायबर तराफे दुरुस्ती व पुरवठा करणेकामी प्राप्त ई-निविदामधील तुलनात्मक कमी दरांचे निविदाकार **I)** मे.नालासोपारा इंटरप्रायझेस - घटक क्र.- ३(१) **II)** मे.आदिनाथ इंटरप्रायझेस - घटक क्र.- ३(२,३,४,५,) ६,७,८,९, ११(३) **III)** मे. रोहन वसंत नाईक - घटक क्र.- १,२, ४(१,२,३,४,५) ५, १०(१,२,३) ११(१,२) यांच्या कमी दरांच्या घटकांना दि १७/०८/२०२० रोजी निविदा समितीने मान्यता देण्यांस शिफारस करण्यांत आली आहे. त्यानुसार तुलनात्मक प्राप्त कमी दरांचे घटकांस मंजुरी देणेकामी व निविदाकारांसोबत संविदा करण्यांस महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियमातील कलम ७३ (ड) अन्वये मान्यता देण्यात येत आहे.

आयुक्त तथा प्रशासक
वसई विरार शहर महानगरपालिका

वसई-विरार शहर महानगरपालिका
मुख्य कार्यालय, विरार पुर्व, जि. - पालघर, पिन नं. ४०१ ३०५
दुरध्वनी - ०२५०-२५२५१०१/०२/०३/०४/०५/०६, फॅक्स ०२५०-२५२५१०७,
ई-मेल- vasaivirarcorporation@yahoo.com

प्रशासकीय ठराव क्र. ७० विभाग: सामान्य प्रशासन

दिनांक २० /८/२०२०

**प्रस्तावाचा विषय:- कोविड-१९ विलगीकरण केंद्रावर रुग्ण व स्टाफ करिता बेडशीट व चादरची खरेदी करणेकामी येणाऱ्या खर्चास प्रशासकिय व वित्तीय मंजूरीबाबत.**

**प्रस्तावाचा मजकूर :-**

१) महानगरपालिका क्षेत्रामध्ये कोविड-१९ ची साथ पसरली असून रुग्ण संख्या वाढत आहे. सदर रुग्णांचे संपर्कात असलेल्या व्यक्तींसाठी विरार (प.) येथील म्हाडा संकुल इमारत क्र.१० मध्ये १९८ सदनिकांमध्ये विलिगीकरण केंद्र असून त्यामध्ये कोविड-१९ पॉझिटिव्ह रुग्णांचे संपर्कात आलेल्या नातेवाईकांना विलगीकरण केंद्रामध्ये दाखल करुन ठेवण्यांत येते. त्या ठिकाणी महानगरपालिकेने रुग्णांना विश्रांती साठी फोमच्या गादया उपलब्ध करुन दिलेल्या आहेत. सदर गादयांवर अंथरण्यासाठी चादरी यापूर्वी भाडयाने घेण्यांत आलेल्या होत्या. परंतू कोविड-१९ ची साथ केव्हा संपेल याची निश्चिती नसल्याने चादरी व बेडशीट भाडयाने घेण्यापेक्षा खरेदी करणे योग्य होईल व आर्थिक हिताचे होईल.

२)तसेच म्हाडा संकूल इमारत क्र.१४ मध्ये कोविड-१९ करिता कार्यरत असलेल्या डॉक्टर,नर्स इ.स्टाफ करिता निवासाची व्यवस्था करण्यांत आलेली असुन स्टाफ करिता फोम गादया व्यवस्था केलेली आहे.

३)वरील दोन्ही ठिकाणी खालीलप्रमाणे बेडशीट व चादरीची आवश्यकता आहे.
सदर बेडशीट व चादरींची खरेदी करण्यांस खालीलप्रमाणे खर्च अपेक्षित आहे.

| अ.क्र | ठिकाण | आवश्यक नग | | दर | एकूण खर्च |
|---|---|---|---|---|---|
| १ | म्हाडा इमारत क्र.१० | बेडशीट | ५०० | ११५ | ५७५०० |
| | | चादर | ५०० | १३० | ६५००० |
| २ | म्हाडा इमारत क्र.१४ | बेडशीट | १०० | ११५ | ११५०० |
| | | चादर | १०० | १३० | १३००० |
| | | | | एकूण | १४७००० |
| | | | | ५% GST | ७३५० |
| | | | | एकूण | १,५४,३५०/- |

तसेच सदरचा खर्च सन २०२०-२१ मधील नैसर्गिक आपत्ती विभाग अंतर्गत नैसर्गिक आपत्ती साहित्य खरेदी या लेखाशिर्ष अंतर्गत करण्यात येईल.

तरी कोविड विलगीकरण केंद्र म्हाडा इमारत क्र.१० व म्हाडा इमारत क्र. १४ मध्ये निवासाकरिता असलेल्या डॉक्टरांकरिता बेडशीट व चादर खरेदी करण्यांस महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियम १९४९ चे कलम ६७ (३) क अन्वये मा. आयुक्त सो. यांना असलेले अधिकारानुसार विना निविदा पूरवठादार मे.जैन हॅन्डलूम,वसई यांचेकडून तात्काळ थेट खरेदीस येणाऱ्या रक्कम रु.१,५४,३५०/- खर्चास मा. आयुक्त तथा प्रशासक यांचे प्रशासकीय व वित्तीय मंजुरीस्तव सविनय सादर.

ठराव :- सदर साहित्य कोविड-१९ प्रतिबंधक उपाययोजनेकरिता आवश्यक आहे.तरी उपरोक्त प्रस्तावा मधील वरील बेडशीट व चादर पूरवठादार मे.जैन हॅन्डलूम,वसई हयाच्यांकडून विना ई निविदा तात्काळ खरेदी करणेकामी महानगरपालिका अधिनियम १९४९ चे कलम ६७(३) (क) अन्वये मला प्राप्त असलेल्या अधिकारानुसार कोविड-१९ संशयित रुग्ण व निवासी डॉक्टर यांचेकरिता बेडशीट व चादर खरेदी करणेकामी येणाऱ्या रक्कम रु.१,५४,३५०/- (अक्षरी रुपये एक लक्ष चौपन्न हजार तीनशे पन्नास मात्र) खर्चास प्रशासकीय व वित्तीय मान्यता देण्यात येत आहे.

आयुक्त तथा प्रशासक
वसई विरार शहर महानगरपालिका

# वसई-विरार शहर महानगरपालिका

मुख्य कार्यालय, विरार पुर्व, जि. - पालघर, पिन नं. ४०१ ३०५
दुरध्वनी - ०२५०-२५२५१०१/०२/०३/०४/०५/०६, फॅक्स ०२५०-२५२५१०७,
ई-मेल- vasaivirarcorporation@yahoo.com

प्रशासकीय ठराव क्र. ७९

विभाग: सामान्य प्रशासन
दिनांक२० /८/२०२०

प्रस्तावाचा विषय:- कोरोना (कोविड-१९ करोना प्रतिबंधात्मक उपाय योजना करण्याकरिता रुग्णांना गरम पाण्याचे भांडे (केटल) खरेदी करणेकामी येणा-या खर्चास प्रशासकीय वित्तीय मंजुरीबाबत.

**प्रस्तावाचा मजकूर :-** वसई-विरार शहर महानगरपालिका हद्दीत कोविड-१९ साथीचे मोठया प्रमाणात रुग्ण सापडत असुन कोविड संसर्ग वाढत आहे. दैनंदिन रुग्णांचे प्रमाण वाढत आहे. पॉझिटिव्ह रुग्णांना व त्यांच्या संपर्कात आलेल्या संशयित रुग्णांना उपचार केंद्रामध्ये व विलिगिकरण केंद्रात दाखल करा वे लागते. पॉझिटिव्ह रुग्णांना वरुण इंडस्ट्रीज,वालीव येथे समर्पित कोविड उपचार केंद्र सुरु केले असून येथील रुग्णांना पिण्यासाठी गरमपाणी उपलब्ध होण्यास १५ रुग्णांकरिता एक नग भांडे (केटल) याप्रमाणे सद्यस्थितीत १००० बेड उपलब्ध असून त्याकरिता किमान १५० नग (केटल) खरेदी करणे आवश्यक आहे.

सदर भांडे बाजारात चौकशी केली असता प्रेस्टीज,जयपान, फिलिप्स या कंपन्याची भांडी (केटल) उपलब्ध आहेत. त्यांचे दर खालीलप्रमाणे आहे.

| अ.क्रं. | तपशिल | क्षमता | दर प्रति नग सर्व करासहित |
|---|---|---|---|
| १ | जयपान कंपनीचे इलेक्ट्रीकल केटल मॉडेल नं.JEK-१८०० | १.८ लिटर | १३०० |
| २ | फिलिप्स कंपनी मॉडेल नं. H D ९३०३/०२ | १.८ लिटर | २१९९ |
| ३ | प्रेस्टिज कंपनी मॉडेल नं. PWKSS | १.८ लिटर | १५१४ |

वरिल प्रमाणे दराची पडताळणी केली असता जयपान कंपनीचे दर कमी असून योग्य व वाजवी आहेत. त्यामुळे खालील प्रमाणे आवश्यक कॅटल खरेदी करणे आवश्यक आहेत.

| अं.क्र | मशीनचा तपशिल | क्षमता | दर प्रति नग | आवश्यक नग | रक्कम |
|---|---|---|---|---|---|
| १. | जयपान कंपनीचे इलेक्ट्रीकल केटल मॉडेल नं.JEK-१८०० | १.८ लिटर | १३००/- सर्व करासहित | ७० | ९१००० |
| | | | | एकुण | ९१,००० /- |

सदरचा खर्च सन २०२०-२१ मधील वैद्यकीय विभागातील रुग्णालय व शहराअंतर्गत विविध ठिकाणी दवाखाने व्यवस्थापन अंतर्गत रुग्णालय इतर साहित्य खरेदी या लेखाशिर्ष अंतर्गत करण्यात येईल.

तरी उपरोक्त साहित्य महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियम १९४९ चे कलम ६७(३) क अन्वये मा.आयुक्तांचे अधिकार व कर्तव्य नुसार विना निविदा तात्काळ विक्रेते मे.एम.के.शहा इंटरप्रायझेस यांचे

कडून थेट खरेदी करण्यास येणाऱ्या रक्कम रु.९१,०००/- खर्चास मा. आयुक्त तथा प्रशासक यांचे प्रशासकीय व वित्तीय मंजुरीस्तव सादर.

ठराव :- सदर साहित्य कोविड-१९ प्रतिबंधक उपाययोजनेकरिता आवश्यक आहे. तरी उपरोक्त प्रस्तावा मधील वरील नमुद गरम पाण्याचे भांडे (कॅटल) तात्काळ मे. एम.के.शहा इंटरप्रायझेस हयाच्यांकडून विना ई निविदा खरेदी करणेकामी महानगरपालिका अधिनियम १९४९ चे कलम ६७(३) (क) अन्वये मला प्राप्त असलेल्या अधिकारानुसार कोविड-१९ रुग्णांकरिता गरम पाण्याचे भांडे खरेदी करणेकामी येणाऱ्या रक्कम रु. ९१,०००/- (अक्षरी रुपये एक्याणव हजार मात्र) खर्चास प्रशासकीय व वित्तीय मान्यता देण्यात येत आहे.

आयुक्त तथा प्रशासक
वसई विरार शहर महानगरपालिका

# वसई-विरार शहर महानगरपालिका

मुख्य कार्यालय, विरार पुर्व, जि. - पालघर, पिन नं. ४०१ ३०५
दुरध्वनी - ०२५०-२५२५१०१/०२/०३/०४/०५/०६, फॅक्स ०२५०-२५२५१०७,
ई-मेल- vasaivirarcorporation@yahoo.com

प्रशासकीय ठराव क्र. ७२

विभागः सामान्य प्रशासन
दिनांक२०/८/२०२०

**प्रस्तावाचा विषय:- कोविड-१९ रुग्णांकरिता उपचार केंद्रावर साहित्य खरेदी करणेकामी येणा-या खर्चास कार्योत्तर प्रशासकीय व वित्तीय मंजुरीबाबत.**

**प्रस्तावाचा मजकूर :-** सादर करण्यांत येते की, वसई विरार शहर महानगरपालिका हद्दीमध्ये कोविड-१९ या साथीच्या रोगाचे रुग्ण मोठ्या प्रमाणात सापडत आहेत. सदर रुग्णांवर उपचार करण्यासाठी व संशयित रुग्ण विलगिकरण केंद्र म्हणून महानगरपालिकेमार्फत खालील ठिकाणी व्यवस्था केलेली आहे.

| अ.क्र. | ठिकाण | रुग्ण संख्या |
|---|---|---|
| १. | गोन्सालो गार्सीया कॉलेज, वसई | समर्पित कोविड उपचार केंद्र |

सदर केंद्रामध्ये रुग्णांना आवश्यक सुविधा देण्यासाठी मा. आयुक्त सो. यांनी खालील साहित्य तात्काळ खरेदी करण्याबाबत सुचना दिलेल्या आहेत. त्याप्रमाणे खालील साहित्य होलसेलरकडून खरेदी केलेले आहे.

| अ.क्र | ठिकाण | आवश्यक नग | दर प्रति नग + GST | एकूण |
|---|---|---|---|---|
| १. | गोन्सालो गार्सीया कॉलेज, वसई | हॅन्ड सॅनिटायझर स्टॅड १ लिटर - ३० नग | २५५ +५ % | ८०३२.५ |
| | | सॅनिटायझर ५ लिटर - ५५ नग | ८१० + ५ % | ४६७७७.५ |
| | | मिल्क पावडर - १३५० नग | १० + ५ % | १४१७५ |
| | | फेस शिल्ड - ४०० नग | ५० + ५ % | २१००० |
| | | सर्फ एक्सेल पावडर - ५४० किलो | १६२ + १८ % | १०३२२६.४ |
| | | हॅंड वॉश लिकवीड - २४ नग (एकावर १ फ्रि स्कीम) | १८९ + १८ % | ५३५२.४ |
| | | | एकूण | १,९८,५६४/- |

तसेच सदरचा खर्च सन २०२०-२१ मधील सामान्य प्रशासन विभाग अंतर्गत सामान्य प्रशासन स्टेशनरी छपाई / स्टेशनरी खरेदी या लेखाशिर्ष अंतर्गत करण्यात येईल.

तरी उपरोक्त साहित्य गोन्सालो गार्सीया कॉलेज, वसई येथील कोविड उपचार केंद्राकरिता खरेदी केलेले आहे. त्याकरीता महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियम कलम ६७ (३) क अन्वये मा. आयुक्त सो. यांना असलेले अधिकारानुसार विना निविदा मे.प्रभात इंटरप्रायझेस, नालासोपारा यांचेकडून दिनांक २३/०५/२०२० ते दिंनाक २९/०७/२०२० रोजीच्या कालावधीत तात्काळ थेट खरेदी करून झालेल्या रक्कम रु.१,९८,५६४/- खर्चास मा. आयुक्त तथा प्रशासक यांचे कार्योत्तर प्रशासकीय व वित्तीय मंजुरीस्तव सविनय सादर.

**ठरावः-** सदर साहित्य कोविड-१९ प्रतिबंधात्मक उपाययोजनेकरिता आवश्यक आहे. तरी उपरोक्त प्रस्तावा मधील वरील नमुद साहित्य तात्काळ मे.प्रभात इंटरप्रायझेस, नालासोपारा हयाच्यांकडून विना ई निविदा खरेदी करणेकामी महानगरपालिका अधिनियम कलम ६७(३)(क) अन्वये मला प्राप्त असलेल्या अधिकारानुसार कोविड-१९ रुग्णांकरिता उपचार केंद्रावर सॅनिटायझर स्टॅंड, सॅनिटायझर, मिल्क पावडर, फेस शिल्ड व इतर साहित्य खरेदी करणेकामी झालेल्या रक्कम रु.१,९८,५६४/- (अक्षरी एक लक्ष अठ्याण्णव हजार पाचशे सौसष्ट मात्र) खर्चास कार्योत्तर प्रशासकीय व वित्तीय मान्यता देण्यात येत आहे.

आयुक्त तथा प्रशासक
वसई विरार शहर महानगरपालिका

वसई विरार शहर महानगरपालिका
मुख्य कार्यालय, विरार (पुर्व)
ता. वसई, जि.पालघर

---

प्रशासकीय ठराव क्र. ८३ विभाग:- सार्व. वाचनालय

दि.२०/०८/२०२०

प्रस्तावाचा विषय :- सन २०२०-२१ या सालाकरीता दैनंदिन वृत्तपत्रे, मासिके, साप्ताहिके, पाक्षिके व दिवाळीअंक पुरविणेकामी आलेल्या दरपत्रकांपैकी जास्त सुट देणारे व योग्य दराचे दरपत्रक मंजूर करणेबाबत.

प्रस्तावाचा मजकूर :-

वसई - विरार शहर महानगरपालिकेच्या प्रभाग समिती 'एच' नवघर येथील सार्व.वाचनालयासाठी सन २०२०-२१ या वित्तिय वर्षाकरीता लागणारी दैनंदिन वृत्तपत्रे, मासिके, साप्ताहिके, पाक्षिके व दिवाळी अंक पुरवठा करणेकामी प्रभाग समिती 'एच' नवघर येथील कार्यालयाच्या सुचना फलकावर तसेच वसई-विरार शहर महानगरपालिकेच्या संकेत स्थळावर जा.क्र. /ग्रंथा. / ९२८ /२०-२१ अन्वये दि. ३१/०७/२०२० रोजी दरपत्रक प्रसिध्द करण्यात आलेले होते. सदर दरपत्रक सादर करण्याची मुदत दि. १०/०८/२०२० पर्यंत दुपारी १२.०० वाजेपर्यंत ठेवण्यात आलेली होती. मुदतीत प्राप्त झालेली दरपत्रके मंगळवार दि.११ /०८/२०२० रोजी दुपारी ३.०० वा. मा.सहा.आयुक्त साहेब यांच्या दालनात उघडण्यांत आली . त्यांचा तपशिल खालीलप्रमाणे...

| अ.क्र. | तपशिल | सवलतीचे दर | | |
|---|---|---|---|---|
| | | शनमुगम | पी. मारीअप्पन | एस.मुरुगेशन |
| १) | वृत्तपत्रे | १% सवलतीचे दर | २% सवलतीचे दर | ५% सवलतीचे दर |
| २) | मासिके | १% सवलतीचे दर | २% सवलतीचे दर | ५% सवलतीचे दर |
| ३) | साप्ताहिके | १% सवलतीचे दर | २% सवलतीचे दर | ५% सवलतीचे दर |
| ४) | पाक्षिके | १% सवलतीचे दर | २% सवलतीचे दर | ५% सवलतीचे दर |
| ५) | दिवाळी अंक | १% सवलतीचे दर | ३% सवलतीचे दर | ५% सवलतीचे दर |

प्रत्यक्षात आलेली दरपत्रके उघडल्यानंतर तुलनात्मक तक्त्याची पडताळणी केली असता सर्वात जास्त सवलत देणारे व योग्य दराचे दरपत्रक मे. एस.मुरुगेशन यांचे (सर्व घटकांसाठी ५%) आहेत. तरी या दरपत्रकाच्या मंजूरीसाठी मा.आयुक्त वसई-विरार शहर महानगरपालिका समोर ठेवण्यास शिफारस असे.

ठराव :-

वरील विषयावर मा.आयुक्त साहेब प्रशासक व.वि.श.म. यांचे सभागृहात सविस्तर चर्चा करण्यात आली. त्यानुसार सन २०२०-२१ या वित्तीय वर्षा करीता व.वि.श.म.च्या प्रभाग समिती 'एच' नवघर येथील सार्व. वाचनालयाकरीता लागणारी वृत्तपत्रे / मासिके / साप्ताहिके / पाक्षिके व दिवाळी अंक खरेदी करणेकामी प्रभाग समिती 'एच' नवघर येथील कार्यालयाच्या सुचना फलकावर तसेच वृत्तपत्रात जाहीर दरपत्रक सूचना प्रसिध्द करुन तसेच वसई-विरार शहर महानगरपालिकेच्या संकेत स्थळावर जा.क्र. /ग्रंथा. /९२८ /२०-२१ अन्वये दि. ३१/०७/२०२० रोजी दरपत्रक प्रसिध्द करण्यात आलेले होते. सदर दरपत्रक सादर करण्याची मुदत दि.१०/०८ /२०२० पर्यंत दुपारी १२.०० वाजेपर्यंत ठेवण्यात आलेली होती. मुदतीत प्राप्त झालेली दरपत्रके मंगळवार दि. ११ / ०८ /२०२० रोजी दुपारी ३.०० वा. मा.सहा.आयुक्त साहेब यांच्या दालनात उघडण्यांत आली . प्रत्यक्षात आलेली दरपत्रके उघडल्यानंतर तुलनात्मक तक्त्याची पडताळणी केली असता सर्वात जास्त सवलत देणारे व योग्य दराचे दरपत्रक मे. एस.मुरुगेशन यांचे (सर्व घटकांसाठी ५%) आहेत. जास्त सवलत देणा-या मे. एस.मुरुगेशन या मंजूर दरपत्रकधारकाकडून प्रभाग समिती 'एच' नवघर येथील सार्व. वाचनालयाकरीता लागणारी वृत्तपत्रे / मासिके / साप्ताहिके / पाक्षिके व दिवाळी अंक खरेदी करणेकामी खरेदी करणेकामी प्रशासकीय मंजूरी देत आहे,

प्रशासक

वसई विरार शहर महानगरपालिका

# वसई- विरार शहर महानगरपालिका

मुख्य कार्यालय, विरार (पूर्व), जि.- पालघर, पिन नं. 401 305
दूरध्वनी- 0250-2525101/02/03/04/05/06, फॅक्स – 0250-2525107
ई-मेल- vasaivirarcorporation@yahoo.com

**प्रशासकीय ठराव क्र.** 48

**विभाग : वैद्यकीय आरोग्य**
**दिनांक** 20 /08/2020

**प्रस्तावाचा विषय** :- वसई विरार शहर महानगरपालिकेच्या प्रभाग समिती 'सी' कार्यालय अंतर्गत येणाऱ्या चंदनसार, विरार (पूर्व) येथील नव्याने सुरु करण्यांत येणाऱ्या रुग्णालयास वसई विरार शहर महानगरपालिका श्री जीवदानी देवी रुग्णालय, चंदनसार असे नाव देणेकामी मान्यता मिळणेबाबत.

**प्रस्तावाचा मजकूर** :- वसई विरार शहर महानगरपालिका कार्यक्षेत्रात प्रभाग समिती 'सी' कार्यालय अंतर्गत येणाऱ्या विरार (पूर्व) चंदनसार येथे नव्याने तळमजला + चौथा मजला असे बांधकाम महानगरपालिकेच्या बांधकाम विभागाकडुन पूर्ण करण्यांत आले असून या इमारतीत सद्यस्थितीत कोव्हीड- १९ चा प्रादुर्भाव लक्षात घेता नव्याने रुग्णालय सुरु करण्यांत येणार आहे. या रुग्णालयास प्रथमत: आय.सी.यू विभागाची खालीलप्रमाणे रचना व वैशिष्टयेपुर्ण कामकाज करण्यांत येणार आहे.

| अ.क्र | रुग्णालयाचा मजला प्रकार | मजले निहाय प्रस्तावित कामकाज |
|---|---|---|
| १ | तळमजला | • पॅथॉलॉजी लॅब<br>• आरटीपीसीआर लॅब<br>• एक्स-रे विभाग<br>• आंतर रुग्ण आय.सी.यू विभाग<br>• फार्मसी विभाग |
| २ | पहिला मजला | आंतर रुग्ण आय.सी.यू विभाग |
| ३ | दुसरा मजला | आंतर रुग्ण आय.सी.यू विभाग |
| ४ | तिसरा मजला | आंतर रुग्ण आय.सी.यू विभाग |
| ५ | चौथा मजला | आंतर रुग्ण प्रस्तावित शस्त्रक्रिया विभागासह |

यानुसार नव्याने सुरु करण्यांत येणाया या रुग्णालयात वरील प्रमाणे प्रस्तावित एकूण १२० खाटांचे कामकाज २४ X ७ यावेळेत करण्यांत येणार आहे. या कामकाजाकरिता आवश्यक असणारे वैद्यकीय अधिकारी व आवश्यक कर्मचारी वर्ग कंत्राटी पद्धतीने नियुक्त करण्यात आलेले असुन सद्यस्थितीत महानगरपालिकेच्या इतर ठिकाणी असलेल्या कोव्हीड सेंटर/रुग्णालयात कामकाज करीत आहेत. तथापि यापैकी सद्यस्थितीत तळमजला व पहिला मजला असे एकूण ५० आय.सी.यू खाटांचे कामकाज २४ X ७ यावेळेत करण्यांत येणार आहे. तसेच रुग्णांची वाढती संख्या लक्षात घेता टप्प्याटप्प्याने रुग्णालयात दुसरा मजला, तिसरा मजला व चौथा मजल्याचा वापर करुन एकूण १२० आय.सी.यू बेड क्षमतेने काम करणे आवश्यक आहे. त्यामुळे या रुग्णालयात खाटांसाठी आवश्यक सर्व व्हेंटीलेटर सहीत व्यवस्था करण्यांत येणार आहे. तसेच याकामी आवश्यक औषधे व उपकरणे महानगरपालेकेच्या मंजुर निविदाधारकांकडून खरेदी करुन उपलब्ध करुन देण्यांत येणार आहेत. सदर रुग्णालयासाठी रुग्णवाहिका, रिक्षा इत्यादीची व्यवस्था वाहन विभागाकडुन करण्यांत येत आहे.

तरी वरील सर्व व्यवस्थेसह १) कोव्हीड-१९ रुग्णाच्या वाढत्या संख्येनुसार सद्यस्थितीत तळमजला व पहिला मजला एकूण ५० आय.सी.यू बेड्स तद्नंतर टप्प्याटप्प्याने दुसरा मजला, तिसरा मजला व चौथा मजला यांचा वापर करुन एकूण १२० आय.सी.यू बेड क्षमतेचे रुग्णालय सुरु करणेस २) प्रामुख्याने विरार मधील प्रसिध्द श्री जीवदानी देवीचे मंदिर असल्याने या रुग्णालयास वसई विरार शहर महानगरपालिका श्री जीवदानी देवी रुग्णालय, चंदनसार असे नाव देणे ३) कोव्हीड-१९ चा प्रादुर्भाव संपलेनंतर सदरचे रुग्णालयाचा १२० बेड क्षमतेचा वापर हा सामान्य वापरासहीत आय.सी.यू विभाग सुरु ठेवणे अशा या ३ बाबीस मान्यता आवश्यक आहे. तरी वरील क्र. १ ते ३ बाबतच्या मान्यतेस्तव सादर.

**ठराव :-** वसई विरार शहर महानगरपालिकेच्या प्रभाग समिती 'सी' कार्यालय अंतर्गत येणाऱ्या चंदनसार, विरार (पूर्व) येथील नवीन इमारतीत (तळमजला + चौथा मजला) महानगरपालिका कार्यक्षेत्रात कोव्हीड-१९ चा प्रादुर्भाव लक्षात घेता नव्याने १२० आय.सी.यू बेडचे रुग्णालय सुरु करणेस, या रुग्णालयास वसई विरार शहर महानगरपालिका श्री जीवदानी देवी रुग्णालय, चंदनसार असे नाव देणेस व कोव्हीड-१९ चा प्रादुर्भाव संपलेनंतर सदर रुग्णालयातील १२० बेडच्या क्षमतेचा वापर हा सामान्य सहीत आय.सी.यू बेड वापर करणेस मान्यता देण्यांत येत आहे. तसेच याकामी येणाऱ्या संपूर्ण खर्चास प्रशासकीय व वित्तीय मान्यता देण्यांत येत आहे.

(गंगाथरन डी.) 20/8/2020

आयुक्त तथा प्रशासक

वसई विरार शहर महानगरपालिका

# वसई-विरार शहर महानगरपालिका

मुख्य कार्यालय, विरार पुर्व जि. पालघर, पिन नं. ४०१ ३०५.
दुरध्वनी ०२५०-२५२५१०१/०२/०३/०४/०५/०६ फॅक्स-०२५०-२५२५१०७.
ई मेल vasaivirarcorporation@yahoo.com

---

प्रशासकीय ठराव क्रं. ८०५      विभाग :- अग्निशमन व आणीबाणी सेवा
दिनांक :-२४/०८/२०२०

---

**<u>प्रस्तावाचा विषय</u> :-** विषय :- वसई-विरार शहर महानगरपालिकेच्या अग्निशमन विभागा करीता ४ नग मकिटा कंपनीचे सॉ कटर मशिन खरेदी करणे कामी प्रशासकीय व वित्तिय मंजूरी मिळणे बाबत.

**<u>प्रस्तावाचा मजकूर</u> :-** सविनय सादर करण्यात येते की, वसई-विरार शहर महानगरपालिकेच्या कार्यक्षेत्रामध्ये नैसर्गिक आपत्ती, पुर परिस्थिती, झाड पडण्याचे कॉल मोठया प्रमाणावर प्राप्त होत असतात. नुकत्याच झालेल्या चक्रिवादळ तसेच सद्या पावसाळा सुरु झाला असल्याने जोरात वादळी वारे वाहू लागले आहेत त्यामुळे प्रभाग समिती क्षेत्रामधील रहदारीच्या ठिकाणी, वस्तीच्या ठिकाणी, घरावर, इमारतींवर, विद्युत तारांवर, ट्रांन्सफॉर्मरवर, वाहनांवर, रस्त्यावर खुप मोठया प्रमाणात झाडे उन्मळून पडत आहेत त्यामुळे सदर झाडे हि कापून बाजुला करण्यासाठी मकिटा कंपनीचे पेट्रोल ड्रिव्हन सॉ कटर मशिनची आवश्यकता आहे. मा. आयुक्त महोदय यांनी सदर मशिनची आवश्यकता व महत्व समजून घेऊन सदर मशिन खरेदी करणे करीता सूचना दिलेल्या आहेत त्यानुसार मकिटा कंपनीचे सॉ कटर विना निविदा थेट मकिटा कंपनीचे अधिकृत विक्रेत्याकडून खरेदी करणे करीता प्राप्त झालेले दर खालील प्रमाणे आहेत.

| अ. क्र | तपशील | दर प्रति नग | खरेदी नग | एकुण अपेक्षित खर्च |
|---|---|---|---|---|
| 1 | Makita Chain Saw Cutter EA7900P (Supply with 24" guide bar & Chain) | 63550/- | 4 | 2,54,200/- |
| | | | १८% GST | 45,756/- |
| | | | एकुण | 2,99,956/- |

सदर मकिटा कटर मशिन खरेदीस होणारा खर्च वसई-विरार शहर महानगरपालिकेच्या सुधारीत अर्थसंकल्प २०१९-२० सह सन २०२०-२१ च्या अर्थसंकल्पीय अंदाजपत्रकात पान नं. ८७ वर ४ नंबरचे लेखाशिर्ष <u>अग्निशमन व्यवस्था साहित्य खरेदी</u> यामध्ये एकुण वार्षिक रक्कम रुपये ६०,००,०००,/- (अक्षरी रक्कम साठ लक्ष रुपये ) तरतुद असून सदर खर्च या तरतुदी मधून करता येईल.

सद्या पावसाळा सुरु असून वादळी वा-यामुळे महापालिका क्षेत्रात झाडे उन्मळून पडण्याचे प्रकार जास्त घडतात महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियम १९४९ चे कलम ६७ (३) क अन्वये मा. आयुक्त सो. यांना असलेले अधिकारानुसार विना निविदा तातडीने मकिटा कंपनीचे पेट्रोल ड्रिव्हन सॉ कटर मशिन विना निविदा थेट अधिकृत विक्रेत्याकडून खरेदी करता येणे शक्य होईल.

तरी मकिटा कंपनीचे पेट्रोल ड्रिव्हन नविन सॉ कटर मशिन ४ नग विना निविदा थेट अधिकृत विक्रेत्याकडून खरेदी करणेस येणा-या अंदाजित रक्कम रु. 2,99,956/- खर्चास महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियम १९४९ चे कलम ६७ (३) क अन्वये मा. आयुक्त सो. तथा प्रशासक यांचे प्रशासकीय व वित्तिय मंजुरीस्तव सादर.

**ठराव :-** वसई-विरार शहर महानगरपालिकेच्या कार्यक्षेत्रामध्ये नैसर्गिक आपत्ती, पुर परिस्थिती, झाड पडण्याचे कॉल मोठया प्रमाणावर असतात तसेच सद्या पावसाळा सुरु असून वादळी वा-यामुळे महापालिका क्षेत्रात झाडे उन्मळून पडण्याचे प्रकार जास्त घडतात सदर झाडे हि कापून बाजुला करण्यासाठी मकिटा कंपनीचे पेट्रोल ड्रिव्हन सॉ कटर मशिनची आवश्यकता असल्याने सदर मशिन विना निविदा थेट अधिकृत विक्रेत्याकडून खरेदी करणे कामी येणा-या अंदाजीत रक्कम रु. २,९९,९५६/- खर्चास महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियम चे कलम ६७ (३) क अन्वये मला प्राप्त असलेल्या अधिकारानुसार सदर कामास प्रशासकीय व वित्तिय मान्यता देण्यात येत आहे.

आयुक्त तथा प्रशासक
वसई-विरार शहर महानगरपालिका

# वसई विरार शहर महानगरपालिका

**मुख्य कार्यालय, विरार पुर्व, जि.- पालघर, पिन नं. ४०१३०५**
दुरध्वनी -०२५०-२५२५१०१/०२/०३/०४/०५/०६, फॅक्स ०२५०-२५२५१०७,
ई-मेल- vasaivirarcorporation@yahoo.com

---

प्रशासकीय ठराव क्र. ७६

विभाग:- माहिती तंत्रज्ञान
दिनांक:- २४/०८/२०२०

प्रस्तावाचा विषय:- वसई विरार शहर महानगरपालिके अंतर्गत गणेश विसर्जनाकरीता भाडेतत्त्वावर सी.सी.टिव्ही यंत्रणा बसविणेबाबत.

प्रस्तावाचा मजकूर :- वसई विरार शहर महानगरपालिका अंतर्गत आयोजीत केल्या जाणा-या विविध गणपती विसर्जन, माघी गणेशोत्सव विसर्जन, दुर्गाष्टमी विसर्जन, दशमा देवा विसर्जन, छट पुजा इत्यादीसाठी सुरक्षेच्या दृष्टीने तात्पुरती सी.सी.टिव्ही यंत्रणा बसविण्यात येते. अश्याच प्रकारे इतर काही महत्वाच्या कार्यक्रमांसाठी तात्पुरती सी.सी.टिव्ही यंत्रणा लागू शकते. सद्य स्थितीत सदरचे काम हे प्रभाग स्तरावरुन केले जात होते. तरी हया वेळेस सदरचे काम हे मुख्यालय स्तरावरुन करण्याचे सुचना मा. आयुक्त यांनी दिलेले आहेत. याकरीता ९ प्रभाग समिती अंतर्गत एकुण २५ तलावांवर सी.सी.टिव्ही यंत्रणा बसविणे प्रस्तावित आहे. त्याकरीता लागणा-या सी.सी.टिव्ही साहित्याची यादी खालील प्रमाणे आहे.

| अनु. क्र. | साहीत्याचे नाव / कामाचा तपशिल | नग | प्रति नग अंदाजित दर | अंदाजित रक्कम |
|---|---|---|---|---|
| १ | ४ चॅनेल डिव्हीआर हार्डडिस्क सह | २५ | २००० | ५०,०००/- |
| २ | नाईट व्हिजन बुलेट आय आर कॅमेरा | २५*४=१०० | १००० | १,००,०००/- |
| ३ | सी.सी.टिव्ही कॅमेरा केबल | २५*२००mtr= ५,०००mtr | २० | १,००,०००/- |
| ४ | वीएनसी कनेक्टर | २०० | ३० | ६,०००/- |
| ५ | पॉवर सप्लाय कनेक्टर | १०० | १० | १,०००/- |
| ६ | स्क्रीन, केबल मेन पॉवर देखभाल, मनुष्यबळासह कार्यान्वित करणे. | २५ | १५०० | ३७,५००/- |
| | | | एकुण | २,९४,५००/- |

उपरोक्त नुसार भाडेतत्त्वावर गणेश विसर्जनाकरीता अंदाजे २१ दिवसांसाठी सी.सी.टिव्ही यंत्रणा बसविणेकामी अंदाजित रक्कम रु. २,९४,५००/- इतका खर्च अपेक्षित आहे. सदरचा खर्च लेखासांकेतांक क्र. क्र.०४१-४१७२-२ 'संगणकीय व्यवस्थापन केंद्र/संगणकीय अभिलेख कक्ष निर्मीती, व्हिडीओ कॉन्फरन्सींग व क्लोज सर्किट कॅमेरे नियंत्रण कक्ष' या लेखाशिर्षा अंतर्गत भागवता येईल. तरी दरपत्रके मागवून सदरचे काम करण्यास व होणाऱ्या खर्चास मा.प्रशासक तथा आयुक्त सो! यांचे प्रशासकीय व वित्तीय मंजूरीस्तव सादर.

१०/८

ठराव :- वसई विरार शहर महानगरपालिके अंतर्गत गणेश विसर्जनाकरीता भाडेतत्त्वावर सी.सी.टिव्ही यंत्रणा बसविणे कामी दरपत्रके मागवून सदरचे काम करण्यास व होणा-या खर्चास प्रशासकीय व वित्तीय मान्यता देण्यात येत आहे. सदरचा खर्च सन २०२०-२१ मधील 'संगणकीय व्यवस्थापन केंद्र/संगणकीय अभिलेख कक्ष निर्मीती, व्हिडीओ कॉन्फरन्सींग व क्लोज सर्किट कॅमेरे नियंत्रण कक्ष' या लेखाशिर्षा अंगतर्गत करता येईल.

प्रशासक

वसई विरार शहर महानगरपालिका

# वसई विरार शहर महानगरपालिका

मुख्य कार्यालय, विरार पुर्व, जि.- पालघर, पिन नं. ४०१३०५
दुरध्वनी -०२५०-२५२५१०१/०२/०३/०४/०५/०६, फॅक्स ०२५०-२५२५१०७.
ई-मेल- vasaivirarcorporation@yahoo.com

प्रशासकीय ठराव क्र. ७७

विभाग:- माहिती तंत्रज्ञान
दिनांक:-२४/०८/२०२०

प्रस्तावाचा विषय: वसई-विरार शहर महानगरपालिकेतील प्रभाग समिती 'सी' मधील चंदनसार येथील कोव्हीड केंद्रामध्ये सि.सि.टि.व्ही तातडीने खरेदी करुन बसविणे बाबत.

प्रस्तावाचा मजकूर :- कोरोना (covid १९) विषाणूच्या नियंत्रणाकरीता व त्याचा प्रादुर्भाव कमी करण्याकरीता वसई-विरार शहर महानगरपालिकेतील प्रभाग समिती 'सी' चंदनसार येथे कोव्हीड केंद्र सुरु करण्यात येणार आहे. सदर ठिकाणी वसई विरार शहरातील कोरोना पॉझीटीव्ह रुग्णांना ठेवण्यात येणार आहे. त्यांची सि.सि.टि.व्ही तर्फे निगराणी करणे आवश्यक असून सदर बाब अत्यावश्यक असल्याने कोव्हीड केंद्रा अंतर्गत सि.सि.टि.व्ही बसविणे गरजेचे आहे. त्याअनुषंगाने चंदनसार येथील कोव्हीड केंद्रामध्ये सि.सि.टि.व्ही बसविणे कामीचा तपशील खालील प्रमाणे.

| अनु. क्र. | साहित्याचे नाव | नग | प्रति नग अंदाजित रक्कम रुपये (सर्व करांसहीत) | एकुण अंदाजित रक्कम रुपये |
|---|---|---|---|---|
| १ | Dome Camera | २७ | ३,७००/- | ९९,९००/- |
| २ | Bullet Camera | ४ | ४,५००/- | १८,०००/- |
| ३ | No.Of NVR/DVR-३२ PORT NVR | १ | २९,०००/- | २९,०००/- |
| ४ | ४TB HDD | २ | ११,०००/- | २२,०००/- |
| ५ | POE Switch | - | ३१,०००/- | ३१,०००/- |
| ६ | WIRING PVC Casing (meter) | ६८० | ८०/- | ५४,४००/- |
| ७ | Rack | १ | २,४००/- | २,४००/- |
| ८ | Power Supply | १ | ३,०००/- | ३,०००/- |
| ९ | ३२ inch TV | १ | १२,०००/- | १२,०००/- |
| १० | HDMI Cable (Meter) | १० | ९०/- | ९००/- |
| ११ | RJ४५ Connector/BNC Connector | ६२ | १०/- | ६२०/- |
| १२ | Spike Guard | १ | ४००/- | ४००/- |
| | | | | २,७३,६२०/- |

उपरोक्त प्रमाणे चंदनसार येथील कोव्हीड केंद्रामध्ये सि.सि.टि.व्ही खरेदी करुन बसविणे कामी एकूण अंदाजित रक्कम रु.२,७३,६२०/-इतका खर्च अपेक्षीत असुन सदर खर्च लेखासांकेतांक क्र.०४१-४१७२-२ 'संगणकीय व्यवस्थापन केंद्र/संगणकीय अभिलेख कक्ष निर्मीती, व्हिडीओ कॉन्फरन्सींग व क्लोज सर्किट कॅमेरे नियंत्रण कक्ष' या लेखाशिर्षा अंतर्गत भागवता येईल. तरी दरपत्रके मागवून प्रभाग समिती 'सी' मधील चंदनसार येथील कोव्हीड केंद्रामध्ये सि.सि.टि.व्ही खरेदी करुन बसविणे कामी एजन्सी निश्चित करणेस व होणा-या खर्चास मा. प्रशासक तथा आयुक्त सो यांचे प्रशासकीय व वित्तीय मंजूरीस्तव सादर.

ठराव :- वसई-विरार शहर महानगरपालिकेतील प्रभाग समिती 'सी' मधील चंदनसार येथील कोव्हीड केंद्रामध्ये सि.सि.टि.व्ही तातडीने खरेदी करुन बसविणे कामी दरपत्रके मागवून खरेदी करण्यास व होणा-या खर्चास प्रशासकीय व वित्तीय मान्यता देण्यात येत आहे. सदरचा खर्च सन २०२०-२१ मधील 'संगणकीय व्यवस्थापन केंद्र/संगणकीय अभिलेख कक्ष निर्मीती, व्हिडीओ कॉन्फरन्सींग व क्लोज सर्किट कॅमेरे नियंत्रण कक्ष' या लेखाशिर्षा अंगतर्गत करता येईल.

14/8

प्रशासक

वसई विरार शहर महानगरपालिका

# वसई विरार शहर महानगरपालिका

मुख्य कार्यालय, विरार पुर्व, जि.- पालघर, पिन नं. ४०१३०५
दुरध्वनी -०२५०-२५२५१०१/०२/०३/०४/०५/०६, फॅक्स ०२५०-२५२५१०७,
ई-मेल- vasaivirarcorporation@yahoo.com

प्रशासकीय ठराव क्र. ७८

विभाग:- माहिती तंत्रज्ञान
दिनांक:-२४/०८/२०२०

प्रस्तावाचा विषय:- वसई विरार कार्यक्षेत्रातील म्हाडा कॉलनी बिल्डींग १० विलगीकरण (आयसोलेशन) केंद्र परिसरात सि.सि.टि.व्ही तातडीने खरेदी करुन बसविणे बाबत.

प्रस्तावाचा मजकूर :- सद्यस्थितीत देशभरात कोरोना (covid १९) या विषाणूंच्या संसर्गाचा प्रादुभार्व झपाटयाने वाढत आहे. या पार्श्वभुमीवर वसई विरार शहर महानगरपालिकेच्या कार्यक्षेत्रामध्ये म्हाडा कॉलनी बिल्डींग १० येथील (आयसोलेशन) कक्षात सुरक्षिततेच्या दृष्टीकोनातून सदर ठिकाणी नविन सि.सि.टि.व्ही कॅमेरे बसविणेकरीता उपरोक्त संदर्भनुसार प्र. वैद्यकीय अधिकारी यांची मागणी प्राप्त झाली आहे.

सदर विलगीकरण कक्षात वसई विरार शहरातील कोरोना पॉझीटीव्ह रुग्णांच्या नातेवाईकांना अलग ठेवण्यात येणार आहे. त्यांची सि.सि.टि.व्ही तर्फे निगराणी करणे आवश्यक असून सदर बाब अत्यावश्यक असल्याने विलगीकरण कक्षा अंतर्गत सि.सि.टि.व्ही बसविणे गरजेचे आहे. त्याअनुषंगाने म्हाडा कॉलनी बिल्डींग १० येथील विलगीकरण(आयसोलेशन) केंद्र परिसरात सि.सि.टि.व्ही बसविणे कामीचा तपशील खालील प्रमाणे.

| अ.क्र | प्रभाग समिती | कामाचे नाव | कामाचे स्वरुप/ अंदाजपत्रकीय रक्कम |
|---|---|---|---|
| १ | प्रभाग समिती ए | म्हाडा कॉलनी बिल्डींग १० विलगीकरण केंद्र परिसरात सि.सि.टि.व्ही बसविणे बाबत. | IR Bullet Camera – ७, IR Dome Camera – १, ८ Channel DVR – १, BNC Connectors -१४, Power Supply-२, ४ TB HDD – १, Rack -१, Inverter – १ Cable ५६० Mtr Including Labor |

उपरोक्त प्रमाणे म्हाडा कॉलनी बिल्डींग १० विलगीकरण (आयसोलेशन) कक्षामध्ये सि.सि.टि.व्ही खरेदी करुन बसविणे कामी एकूण अंदाजित रक्कम रु. ६२,०००/-इतका खर्च अपेक्षीत असुन सदर खर्च लेखासांकेतांक क्र.०४१-४१७२-२ 'संगणकीय व्यवस्थापन केंद्र/संगणकीय अभिलेख कक्ष निर्मीती, व्हिडीओ कॉन्फरन्सींग व क्लोज सर्किट कॅमेरे नियंत्रण कक्ष' या लेखाशिर्षा अंतर्गत भागवता येईल.

तरी दरपत्रके मागवून म्हाडा कॉलनी बिल्डींग १० विलगीकरण (आयसोलेशन) केंद्र परिसरात सि.सि.टि.व्ही खरेदी करुन बसविणे कामी एजन्सी निश्चित करणेस व होणा-या खर्चास मा. प्रशासक तथा आयुक्त सो! यांची प्रशासकीय व वित्तीय मान्यता मिळणेस मंजुरीस्तव सादर.

ठराव :- वसई विरार कार्यक्षेत्रातील म्हाडा कॉलनी बिल्डींग १० विलगीकरण (आयसोलेशन) केंद्र परिसरात सि.सि.टि.व्ही तातडीने खरेदी करुन बसविणे कामी दरपत्रके मागवून एजन्सी निश्चित करणेस व होणा-या खर्चास प्रशासकीय व वित्तीय मान्यता देण्यात येत आहे. सदरचा खर्च सन २०२०-२१ मधील 'संगणकीय व्यवस्थापन केंद्र/संगणकीय अभिलेख कक्ष निर्मीती, व्हिडीओ कॉन्फरन्सींग व क्लोज सर्किट कॅमेरे नियंत्रण कक्ष' या लेखाशिर्षा अंगतर्गत करता येईल.

(गंगाथरन डी.)
प्रशासक तथा आयुक्त
वसई विरार शहर महानगरपालिका

# वसई विरार शहर महानगरपालिका

मुख्य कार्यालय, विरार पुर्व, जि.- पालघर, पिन नं. ४०१३०५
दुरध्वनी -०२५०-२५२५१०१/०२/०३/०४/०५/०६, फॅक्स ०२५०-२५२५१०७,
ई-मेल- vasaivirarcorporation@yahoo.com

प्रशासकीय ठराव क्र. ७९

विभाग:- माहिती तंत्रज्ञान
दिनांक:- २४/०८/२०२०

प्रस्तावाचा विषय:- वसई विरार शहर महानगपालिकेत स्थापन करण्यात आलेल्या विलगीकरण (आयसोलेशन) कक्षामध्ये व वैद्यकीय आरोग्य केंद्रा अंतर्गत वायरलेस टेलिफोन सुविधा सुरु करणे व वायरलेस राऊटर खरेदी करणेबाबत.

प्रस्तावाचा मजकूर :- कोरोना (covid १९) विषाणूच्या नियंत्रणाकरीता व त्याचा प्रादुर्भाव कमी करण्याकरीता वसई विरार शहर महानगरपालिकेद्वारे विलगीकरण कक्षांची (अग्रवाल विलगीकरण कक्ष, कौलसिटी हेरीटेज, म्हाडा कॉलनी, जी.जी कॉलेज या विलगीकरण कक्षाची स्थापना केली आहे. सदर विलगीकरण कक्षामधील रुग्णांच्या स्थितीचा व इतर कामकाजाचा अहवाल प्रायवेट हॉस्पिटल मधून येणाऱ्या रुग्णांचे पत्ते तपासण्यासाठी देखील दुरध्वनी द्वारे संपर्क साधावा लागतो. याकामी विलगीकरण कक्षांमध्ये ५ वायरलेस टेलिफोन व वैद्यकीय आरोग्य विभाग मुख्यालय येथे २ वायरलेस टेलिफोन असे एकुण ७ टेलिफोन तसेच कोविड -१९ च्या कामकाजामध्ये मोबाईलद्वारे अहवाल पाठविणे, Android App द्वारे रुग्णांची माहिती भरणे आवश्यक आहे. सदर ठिकाणी वायफाय राऊटर बसविणे गरजेचे आहे.

| अनु. क्र. | साहीत्य | तपशिल | नग | प्रति नग रक्कम (सर्व करांसहीत) | एकूण रक्कम (सर्व करांसहीत) |
|---|---|---|---|---|---|
| १ | Wireless Telephone | • GSM quad band*, Send and receive SMS,<br>• Store up to 200 SMS messages on the FW200L base, messages can also be stored on the SIM card,<br>• long Battery back up<br>• 2.2" black and white backlit display<br>• 3G and 4G SIM cards can be used in the FW200L | ७ | रु.२,५५०/- | रु.१७,८५०/- |
| २ | Sim Card | 1 year plan | ७ | रु.२,०००/- | रु.१४,०००/- |

| | | | | | |
|---|---|---|---|---|---|
| ३ | Wi-fi Router | • Wireless Speed: 300 Mbps.<br>• Antennae Capacity: 5 dBi.<br>• 4 LAN ports.<br>• 1 WAN ports.<br>• Network Frequency: 2.4 GHz. | १० | रु.१,५००/- | रु.१५,०००/- |
| एकूण | | | | | रु.४६,८५०/- |

वरील प्रमाणे साहित्य खरेदी करणे कामी अंदाजित रक्कम रु. ४६,८५०/- इतका खर्च अपेक्षित असून सदरचा खर्च लेखासांकेतांक क्र. ०४१-४१७२-१ "संगणकीय साहीत्य खरेदी" या लेखाशिर्षा अंतर्गत भागवता येईल. तरी दरपत्रके मागवून वायरलेस टेलिफोन व वायरलेस राऊटर खरेदी करण्यास व होणा-या खर्चास मा. प्रशासक तथा आयुक्त सो यांचे प्रशासकीय व वित्तीय मंजूरीस्तव सादर.

ठरावः- वसई विरार शहर महानगपालिकेत स्थापन करण्यात आलेल्या विलगीकरण (आयसोलेशन) कक्षामध्ये व वैद्यकीय आरोग्य केंद्रा अंतर्गत वायरलेस टेलिफोन व वायरलेस राऊटर दरपत्रके मागवून खरेदी करण्यास व होणा-या खर्चास प्रशासकीय व वित्तीय मान्यता देण्यात येत आहे. सदरचा खर्च सन २०२०-२१ मधील संगणकीय साहीत्य खरेदी' या लेखाशिर्षा अंगतर्गत करता येईल.

(गंगाथरन डी.)
प्रशासक तथा आयुक्त
वसई विरार शहर महानगरपालिका

# वसई विरार शहर महानगरपालिका

**मुख्य कार्यालय, विरार पुर्व, जि.- पालघर, पिन नं. ४०१३०५**

दुरध्वनी -०२५०-२५२५१०१/०२/०३/०४/०५/०६, फॅक्स ०२५०-२५२५१०७,

ई-मेल- vasaivirarcorporation@yahoo.com

---

प्रशासकीय ठराव क्र. ८०

विभाग:- माहिती तंत्रज्ञान

दिनांक:- २४/०८/२०२०

प्रस्तावाचा विषय:- वसई-विरार शहर महानगरपालिकेतील संगणक व प्रिंटर दुरुस्त करणे कामी लागणारे साहित्य व इतर अनुषंगीक साहीत्य खरेदी करणे बाबत.

प्रस्तावाचा मजकूर :- वसई विरार शहर महानगरपालिकेत मुख्यालय,९ प्रभाग समिती, २ रुग्णालय, २१ नागरी आरोग्य केंद्रे व ६ अग्निशमन कार्यालये कार्यरत असून माहिती व तंत्रज्ञान विभागाने या कामी सर्वे केला असता एकुण ३९१ संगणक व २६० प्रिंटर कार्यरत असल्याचे निर्देशनास आले आहे. सदर पैकी ३०५ संगणक व २६० प्रिंटर यांची वॉरंटी संपलेली आहे. संगणक व प्रिंटर देखभाल दुरुस्तीचा वार्षिक ठेका माहे मार्च २०१७ मध्ये संपलेला असून सन २०१७-१८ करिता करण्यात आलेल्या ई-निविदा प्रक्रियेस मंजूर निविदाकारांकडून प्रतिसाद मिळत नसल्याने सदर ई-निविदा रद्द करण्यात आली होती.

सन २०१७-१८ या कालावधि पासुन संगणक देखभाल दुरुस्तीचे काम माहिती व तंत्रज्ञान विभागामार्फत आजतागायत केले जात आहे. संगणक व प्रिंटर दुरुस्त करताना स्पेअर पार्टस उपलब्ध नसल्याणे सदर स्पेअर पार्टस मागवुन संगणक व प्रिंटर दुरुस्त करणे कामी विलंब होत आहे व विभागातील होणाऱ्या दैनंदीन कामकाजात व्यत्यय निर्माण होतात.

कारोनाच्या पार्श्वभूमीवर वैद्यकिय आरोग्य विभाग व माहापालिकेतील इतर विभांगामार्फत कारोना (Covid-१९) संदर्भातील तसेच इतर विविध कामे केली जात आहेत. परंतू सद्यस्थितीत संगणक व प्रिंटर नादुरुस्त झाल्यास विभागांमार्फत होणारे दैनंदिन कामकाज तसेच कारोना Covid-१९ अंतर्गत होणा-या अतंत्य तातडीच्या कामांमध्ये अडथळे निर्माण होत आहेत.

सदरचे संगणक व प्रिंटर दुरुस्त करण्यासाठी माहिती व तंत्रज्ञान विभागात संगणकीय व प्रिंटर साहित्य उपलब्ध होणे आवश्यक आहे. तसेच इतर कामांसाठी लागणाऱ्या Cables, Socket, Converter, Router इत्यादी साहित्य आवश्यक आहे. संगणक व प्रिंटर दुरुस्त करण्यासाठी लागणाऱ्या व इतर अनुषंगीक साहित्यांचा तपशिल खालील प्रमाणे आहे.

तक्ता क्र. 1 (संगणकीय स्पेअर पार्ट)

| Sr. No. | Equipment | Estimated Quantity | Estimated Cost Rs (Per Unit) | Total (Rs) |
|---|---|---|---|---|
| 1 | Motherboard G41 | 20 | 3,500/- | 70,000/- |
| 2 | Motherboard H61 | 5 | 4,500/- | 22,500/- |
| 3 | Motherboard H81 | 5 | 4,500/- | 22,500/- |
| 4 | Motherboard H110 | 25 | 6,000/- | 1,50,000/- |
| 5 | Processor Core 2 Duo | 15 | 1,000/- | 15,000/- |
| 6 | Processor Fan | 15 | 500/- | 7,500/- |

| | | | | |
|---|---|---|---|---|
| 7 | RAM DDR2 (2 GB) | 10 | 1,000/- | 10,000/- |
| 8 | RAM DDR3 (2 GB) | 15 | 1,400/- | 21,000/- |
| 9 | RAM DDR3 (4 GB) | 10 | 1,900/- | 19,000/- |
| 10 | RAM DDR4 (4 GB) | 15 | 2,500/- | 37,500/- |
| 11 | SMPS | 25 | 1,000/- | 25,000/- |
| 12 | HDD 500 GB | 5 | 3,500/- | 17,500/- |
| 13 | CMOS BATTERY | 20 | 50/- | 1,000/- |
| 14 | Cabinet | 5 | 1,500/- | 7,500/- |
| | **TOTAL** | | | **4,26,000/-** |

तक्ता क्र. 2 (प्रिंटर स्पेअर पार्ट)

| Sr. No. | Equipment | Estimated Quantity | Estimated Cost Rs (Per Unit) | Total (Rs) |
|---|---|---|---|---|
| 1 | HP Fuser Teflon Sleeve | 35 | 1,250/- | 43,750/- |
| 2 | Hp Fuser Pressure Roller | 30 | 2,000/- | 60,000/- |
| 3 | Hp Page Pickup Roller & servicing | 30 | 1,000/- | 30,000/- |
| 4 | Hp Logic Board/Formatter Card | 10 | 4,130/- | 41,300/- |
| 5 | Ricoh Page Pickup Roller & servicing | 15 | 1,000/- | 15,000/- |
| | TOTAL | | | **1,90,050/-** |

तक्ता क्र. 3 (इतर संगणकीय साहित्य)

| Sr. No. | Equipment | Estimated Quantity | Estimated Cost Rs (Per Unit) | Total (Rs) |
|---|---|---|---|---|
| 1 | CAT 6 Cable 305 mtr | 1 | 6,000/- | 6,000/- |
| 2 | Wired Keyboard | 50 | 500/- | 25000/- |
| 3 | Wired Mouse | 50 | 500/- | 25,000/- |
| 4 | RJ45 Pin (100 per Box) | 2 | 1,000/- | 2,000/- |
| 5 | Wifi Adapter (300mbps) | 5 | 900/- | 4,500/- |
| 6 | Wifi Router (300mbps) | 5 | 1,500/- | 7,500/- |
| 7 | 4 Port Switch | 5 | 750/- | 3,750/- |
| 8 | 8 Port Switch | 5 | 1,000/- | 5,000/- |
| 9 | Crimping Tool | 1 | 800/- | 800/- |
| 10 | Pen drive 32 GB | 20 | 600/- | 12,000/- |
| 11 | UPS 600 VA | 10 | 2,000/- | 20,000/- |
| 12 | Acer laptop charger | 1 | 1,500/- | 1,500/- |
| 13 | SPIKE GUARD | 5 | 450/- | 2,250/- |
| 14 | 1 TB PORTABLE HDD | 2 | 4,000/- | 8,000/- |
| | | | TOTAL | **1,23,300/-** |

उपरोक्त तक्ता क्र. १, तक्ता क्र. २ व तक्ता क्र. ३ अन्वये साहित्य खरेदी करणे करीता अंदाजित रक्कम रु. ७,३९,३५०/- इतका खर्च अपेक्षित आहे. सदर खर्च लेखासांकेतांक क्रं. ०४१-४१७२-१ 'संगणकीय साहित्य खरेदी' या लेखाशिर्षा अंतर्गत भागवता यईल. तरी ई-निविदा प्रक्रियेद्वारे एजन्सी निश्चित करुन संगणक स्पेअर पार्टस, प्रिंटर स्पेअर पार्टस व इतर अनुषंगीक साहित्य खरेदी करणेकामी व होणाऱ्या खर्चास मा. प्रशासक तथा आयुक्त सो! यांचे प्रशासकीय व वित्तीय मान्यता मिळणेस्तव सादर.

ठराव :- वसई-विरार शहर महानगरपालिकेतील संगणक व प्रिंटर दुरुस्त करणे कामी लागणारे साहित्य व इतर अनुषंगीक साहीत्य खरेदी करणे कामी ई-निविदा प्रक्रियेद्वारे एजन्सी निश्चित करणेस व होणा-या खर्चास प्रशासकीय व वित्तीय मान्यता देण्यात येत आहे. सदरचा खर्च सन २०२०-२१ मधील 'संगणकीय साहित्य खरेदी' या लेखाशिर्षा अंगतर्गत करता येईल.

20/8/2020.

( गंगाथरन डी.)

प्रशासक तथा आयुक्त

वसई विरार शहर महानगरपालिका

# वसई विरार शहर महानगरपालिका

प्रशासकीय ठराव क्र. ८६

विभाग :- घनकचरा व्यवस्थापन
दिनांक :-२४/०८/२०२०

---

**प्रस्तावाचा विषय :-** सन २०२०-२१ या वित्तीय वर्षात वसई विरार शहर महानगरपालिका कार्यक्षेत्रातील भटक्या व जखमी कुत्र्यांना पकडून त्यांच्यावर निर्बिजीकरण शस्त्रक्रिया करुन रॅबीज लस देणे व जखमी कुत्र्यांवर औषध उपचार करणेकामी अभिकर्त्याची नेमणूक करणेसाठी ई-निविदा मागवून होणाऱ्या खर्चास प्रशासकीय व वित्तीय मान्यता मिळणेबाबत.

**प्रस्तावाचा मजकूर :-** वसई विरार शहर महानगरपालिकेची स्थापना ०३ जूलै २००९ रोजी झाली असून मनपाचे क्षेत्रफळ ३११ चौ.कि.मी.एवढे मोठ विस्तीर्ण आहे. भारताची आर्थिक राजधानी असलेल्या मुंबई शहराच्या लगतचे शहर म्हणून वसई विरार शहर विकसनशील शहर उदयास आले आहे. या शहराची लोकसंख्या २० लक्षाच्या आसपास आहे. लोकसंख्या वाढी बरोबर येथे भटक्या कुत्र्यांची संख्या हि मोठया प्रमाणात आहे. भटक्या कुत्र्यांमुळे शहरातील नागरीक, लहान मुले यांना चावण्याचे प्रमाण मोठया प्रमाणात आहे. कुत्र्यांच्या चावण्यामुळे रॅबीज सारख्या गंभीर स्वरुपाचा आजार होण्याची दाट शक्यता आहे. तरी भटक्या कुत्र्यांच्या उपद्रवास आळा घालणेसाठी केंद्र शासनाने प्राणी उत्पत्ती प्रतिबंधक कायदा २००१ नियमांची अंमलबजावणी करणे बंधनकारक केले असल्याने वसई विरार शहर महानगरपालिका कार्यक्षेत्रातील भटक्या कुत्र्यांना पकडून त्यांचेवर निर्बिजीकरण शस्त्रक्रिया करणे व रॅबीज प्रतिबंधक लस देणे हे काम दि.१४/१०/२०११ पासून सुरु आहे. तसेच महाराष्ट्र शासनाचा संकीर्ण १०२००४/प्र.क्र.४२/नवि-२०. नगरविकास विभाग मंत्रालय, मुंबई -४०००३२ दि.२४/०८/२००७ आदेशान्वये भटक्या कुत्र्यांच्या समस्येवर उपाययोजना करणेबाबत मा.उच्च न्यायालय यांचे आदेशान्वये संपूर्ण वसई विरार शहर महानगरपालिका हद्दीत कमीत कमी तीन ठिकाणी डॉग सेंटर उभारुन भटक्या कुत्र्यांवर निर्बिजीकरण शस्त्रक्रिया करणे आवश्यक आहे.

परंतु सद्य स्थितीत वसई विरार महानगरपालिका कार्यक्षेत्रातील नवघर माणिकपूर हद्दीत नवघर पूर्व स्मशान भुमीजवळ एक डॉग सेंटर कार्यरत आहे.

सदरील डॉग सेंटर मध्ये कुत्र्यांना पकडून त्यांचेवर निर्बिजीकरण शस्त्रक्रिया करणे व रॅबीज प्रतिबंधक लस देणेकामी सन २०१९-२० या वित्तीय वर्षाकरिता मा.स्थायी समिती ठराव क्र.३२१ दि.११/०९/२०१९ अन्वये वविशम/आरोग्य/८७/२०१९-२० दि.१३/०९/२०१९ अन्वये मे.युनिव्हर्सल ॲनिमल वेल्फेअर सोसायटी यांना कार्यादेश देण्यात आला होता. तरी मे.युनिव्हर्सल ॲनिमल वेल्फेअर सोसायटी यांनी सन २०१९-२० या वित्तीय वर्षात खालीलप्रमाणे भटक्या कुत्र्यांवर निर्बिजीकरण शस्त्रक्रिया व रॅबीज प्रतिबंधक लस दिली आहे

| अ.क्र. | महिना | नर | मादी | एकुण संख्या |
|---|---|---|---|---|
| १ | सप्टेंबर -२०१९ | ५९ | ५३ | ११२ |
| २ | ऑक्टोबर -२०१९ | २१७ | २०९ | ४२६ |
| ३ | नोव्हेंबर -२०१९ | १०९ | ११६ | २२५ |
| ४ | डिसेंबर -२०१९ | ५७ | ७५ | १३२ |
| ५ | जानेवारी-२०२० | १३९ | १२९ | २६८ |
| ६ | फेब्रुवारी -२०२० | २१४ | २२२ | ४३६ |
| ७ | मार्च -२०२० | २०९ | २५८ | ४६७ |
| एकुण | | १००४ | १०६२ | २०६६ |

वरीलप्रमाणे मे.युनिव्हर्सल ॲनिमल वेल्फेअर सोसायटी यांनी वसई विरार शहर महानगरपालिका कार्यक्षेत्रात १००४ नर व १०६२ मादी अशा एकूण २०६६ भटक्या कुत्र्यांवर निर्बिजीकरण शस्त्रक्रिया केली आहे. परंतु मे.युनिव्हर्सल ॲनिमल वेल्फेअर सोसायटी यांची कामाची मुदत माहे मार्च २०२० पर्यत असल्याने मनपाने मे.युनिव्हर्सल ॲनिमल वेल्फेअर सोसायटी यांना ठराव क्र.४५ दि.०६/०८/२०२० अन्वये माहे एप्रिल २०२० ते माहे सप्टेंबर २०२० या ६ महिन्यांसाठी प्रशासकीय मान्यता देण्यात आली आहे. तरी महो सप्टेंबर २०२० रोजी मे.युनिव्हर्सल ॲनिमल वेल्फेअर सोसायटी यांची मुदतवाढ संपत असल्याने भटक्या कुत्र्यांच्या उपद्रवास आळा घालणेसाठी व केंद्र शासनाने प्राणी उत्पत्ती प्रतिबंधक कायदा २००१ नियमाची अंमलबजावणी करणेसाठी

भटक्या कुत्र्यांवर निर्बिजीकरण शस्त्रक्रिया करणे व रॅबीज प्रतिबंधक लस देणेकामी नव्याने ई-निविदा प्रक्रिया करणे आवश्यक आहे.

सदरील कामी होणारा खर्च सन २०२-२१ या वित्तीय वर्षाच्या अर्थसंकल्पातील लेखाशिर्ष **"मोकाट आणि पिसाळलेल्या जनावरांचा बंदोबस्त व मादी श्वान निर्बिजीकरण करण्यावरील खर्च"** या लेखाशिर्षाच्या अंतर्गत तरतूद रक्कम रु.~~६०~~ ९० लक्ष मधून भागविता येईल. तरी भटक्या कुत्र्यांवर निर्बिजीकरण शस्त्रक्रिया करणे व रॅबीज प्रतिबंधात्मक लस देणे या कामाची नव्याने ई-निविदा करणेस व होणाऱ्या खर्चास प्रशासकीय व वित्तीय मान्यता मिळणेकामी सदरचा प्रस्ताव सादर.

<u>**निर्णय :-**</u>

सन २०२०-२१ या वित्तीय वर्षात वसई विरार शहर महानगरपालिका कार्यक्षेत्रातील भटक्या व जखमी कुत्र्यांना पकडून त्यांच्यावर निर्बिजीकरण शस्त्रक्रिया करुन रॅबीज लस देणे व जखमी कुत्र्यांवर औषध उपचार करणेकामी अभिकर्त्याची नेमणूक करणेसाठी ई-निविदा मागवून होणाऱ्या खर्चास प्रशासकीय व वित्तीय मान्यता देण्यात येत आहे.

24/8/2020

**प्रशासक**
**वसई विरार शहर महानगरपालिका**

D/Aarogy/korona/GEM Portal/ prashaskiy thrav

# वसई-विरार शहर महानगरपालिका

मुख्य कार्यालय, विरार पुर्व, जि. - पालघर, पिन नं. ४०१ ३०५
दुरध्वनी - ०२५०-२५२५१०१/०२/०३/०४/०५/०६, फॅक्स ०२५०-२५२५१०७,
ई-मेल- vasaivirarcorporation@yahoo.com

प्रशासकीय ठराव क्र. ८२

विभाग: सामान्य प्रशासन
दिनांक२५/८/२०२०

**प्रस्तावाचा विषय:-** कोरोना (कोविड-१९) उपचार केंद्रावर अल्पोहार व भोजन व्यवस्था करण्यास जेवण्याचे कंटेनर व नाश्त्याचे फॉईल कंटेनर येणाऱ्या खर्चास प्रशासकीय व वित्तीय मंजुरीबाबत.

**प्रस्तावाचा मजकूर :-** वसई-विरार शहर महानगरपालिका हद्दीत कोविड-१९ साथीचे मोठया प्रमाणात रुग्ण सापडत असुन या रुग्णांवर उपचार करण्यासाठी मनपाने खालील ठिकाणी रुग्ण उपचार केंद्र सुरु केलेली आहेत.

| अ.क्र. | ठिकाण | प्रकार |
|---|---|---|
| १. | अग्रवाल कोविड ट्रीटमेंट केंद्र | उपचार केंद्र |
| २. | रिध्दी विनायक हॉस्पीटल कोविड ट्रीटमेंट सेंटर | उपचार केंद्र |
| ३. | जी.जी. कॉलेज कोविड ट्रीटमेंट सेंटर | उपचार केंद्र |
| ४. | म्हाडा इमारत क्रं. १० | संशयित कोविड रुग्ण विलगीकरण केंद्र |
| ५. | म्हाडा इमारत क्रं. १४ | डॉक्टर, नर्स, कर्मचारी निवास |
| ६. | बोळीज UPHC कोविड ट्रीटमेंट केंद्र | उपचार केंद्र |
| ७. | बाभोळा अग्रवाल कोविड ट्रीटमेंट केंद्र | उपचार केंद्र |

वरील ठिकाणी उपचार केंद्र असून त्यामध्ये दैनंदिन रुग्णांना नाश्ता व जेवणाची व्यवस्था मनपा तर्फे करण्यात येते. यासाठी मोठया प्रमाणावर निधी खर्च होतो. शहरामधील जिवदानी देवी संस्थान, ओम साईधाम मंदीर ट्रस्ट, यंग स्टार्स ट्रस्ट, विवा चॅरिटेबल ट्रस्ट यांचे मार्फत सदर ठिकाणी दैनंदिन नाश्ता व भोजन व्यवस्था पूरविण्यांत येते. सदरचे जेवण व नाश्ता पुरविणे करिता लागणारे फॉईल कंटेनर व जेवणाचे पाच खणी कंटेनर महापालिकेमार्फत पुरविण्यात येतात व रुग्णांना जेवण नाश्ता मोफत दिला जातो.

उपरोक्त ठिकाणी यापूर्वी कंटेनर व जेवणाचे बंद डिश व फाईल कंटेनर, चमचे इत्यादी साहित्य महापालिकेने विना निविदा अधिकृत विक्रेता मे. अरिहंत ट्रेडर्स यांचेकडून खालील दराने खरेदी केलेले आहे. कोविड १९ साथ अजून पर्यत संपलेली नसून यापुढे कधी संपेल यांचा निश्चित कालावधी नसून भोजन नाश्ता पुरवठा सुरळीत रहावा याकरीता खालील साहित्य खरेदी करणे आवश्यक आहे. याबाबत भोजन पुरवठा करणा-या कर्मचा-यांच्या गटाने मागणी दिलेली आहे.

| अं.क्र. | साहित्याचा तपशिल | दर (सर्व करासहित) | वाटाघाटीचा दर |
|---|---|---|---|
| १. | पाच खणी जेवणाचा कंटेनर | ११/- प्रती नग | १०.५०/- प्रती नग |
| २. | नाश्ता कंटेनर | १.५०/- प्रती नग | १.२५/- प्रती नग |
| ३. | नाश्ता प्लास्टिक चमचा | ०.३० पैसे प्रती नग | ०.३० पैसे प्रती नग |
| ४. | सफेद एच एम बॅग ५१ मायक्रो २०X२६ इंच (नाश्ता पॅकिंगसाठी) | ३.६० पैसे प्रती नग | ३.६० पैसे प्रती नग |

| | | | |
|---|---|---|---|
| ५. | ब्ल्यू एच एम बॅग ५१ मायक्रो २७X३० इंच | ७.६० पैसे प्रती नग | ७.६० पैसे प्रती नग |

वरील केंद्रावर दैनंदिन सुमारे २४०० प्लेट जेवण व्यवस्था करावी लागते त्यामुळे दैनंदिन सकाळ व रात्रीकरिता सुमारे २४०० जेवणाचे कंटेनर व १२०० नाश्त्याचे कंटेनर, १२०० प्लास्टिक चमचे व पॅकिंगसाठी झबला पिशव्या इ. साहित्याची दैनंदिन आवश्यकता लागते व सदर साहित्य तात्काळ उपलब्ध होत नसल्याने ते साठयामध्ये खरेदी करुन ठेवावे लागते.

कोविड-१९ ही साथ यापूढे २ ते ३ महिने राहण्याची शक्यता आहे. जो पर्यंत लस उपलब्ध होत नाही तो पर्यंत अथवा साथ आटोक्यात येत नाही तोपर्यंत किमान २ महिने पूरेल एवढा साठा उपलब्ध करण्यास खालीलप्रमाणे खर्च अपेक्षित आहे.

| अं. क्र | साहित्याचा तपशिल | प्रति दिन वापर | दिवस | लागणारे आवश्यक नग | किमंत(सर्व करासहित) | रक्कम |
|---|---|---|---|---|---|---|
| १. | नाश्ता कंटेनर (फॉईल कंटेनर २५० ग्रॅम) | १२०० | ६० | ७२००० | १.२५/- प्रती नग | ९०००० |
| २. | नाश्ता प्लास्टिक चमचा | १२०० | ६० | ७२००० | ०.३० पैसे प्रती नग | २१६०० |
| ३. | पाच खणी जेवणाचा कंटेनर | २४०० | ६० | १४४००० | १०.५० प्रति नग | १५१२००० |
| ४. | सफेद एच एम बॅग ५१ मायक्रो २०X२६ इंच (नाश्ता पॅकिंगसाठी) | ४० | ६० | २४०० | ३.६० पैसे प्रती नग | ८६४० |
| ५. | ब्ल्यू एच एम बॅग ५१ मायक्रो २७ X ३० इंच | १२० | ६० | ७२०० | ७.६० पैसे प्रती नग | ५४७२० |
| | | | | | एकुण | १६,८६,९६०/- |

तसेच सदरचा खर्च सन २०२०-२१ मधील वैद्यकीय आरोग्य विभाग अंतर्गत रुग्णालय स्टेशनरी खरेदी या लेखाशिर्ष अंतर्गत करण्यात येईल.

तरी कोविड उपचार केंद्रावर विलगीकरण, अलगीकरण केंद्र व डॉक्टर व नर्स निवास व्यवस्थेच्या ठिकाणी दैनंदिन अल्पोपहार व भोजन पुरवठा करण्यास लागणारे कंटेनर व उपरोक्त इतर साहित्य खरेदी करणे आवश्यक आहे. त्याकरीता महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियम कलम ६७ (३) क अन्वये मा. आयुक्त सो. यांना असलेले अधिकारानुसार विना निविदा मे.अरिहंत ट्रेडर्स, वसई यांचेकडून तात्काळ थेट खरेदी करण्यास येणाऱ्या रक्कम रु. १६,८६,९६०/- खर्चास मा. आयुक्त तथा प्रशासक यांचे प्रशासकीय व वित्तीय मंजुरीस्तव सविनय सादर.

**ठराव:-** सदर साहित्य कोविड-१९ प्रतिबंधात्मक उपाययोजनेकरिता आवश्यक आहे. तरी उपरोक्त प्रस्तावा मधील वरील नमुद आवश्यक साहित्य तात्काळ में. अरिहंत ट्रेडर्स. वसई हयाच्यांकडून विना ई निविदा खरेदी करणेकामी महानगरपालिका अधिनियम कलम ६७(३)(क) अन्वये मला प्राप्त असलेल्या अधिकारानुसार कोविड-१९ रुग्णांकरिता उपचार केंद्रावर जेवण्याचे कंटेनर व नाश्त्याचे फॉईल कंटेनर साहित्य खरेदी करणेकामी येणाऱ्या रक्कम रू. १६,८६,९६०/- (अक्षरी सोळा लक्ष शहाऐंशी हजार नऊशे साठ मात्र) खर्चास प्रशासकीय व वित्तीय मान्यता देण्यात येत आहे.

(स्वाक्षरी) २८/८/२०२०

आयुक्त तथा प्रशासक
वसई विरार शहर महानगरपालिका

# वसई-विरार शहर महानगरपालिका

मुख्य कार्यालय, विरार पुर्व, जि. - पालघर, पिन नं. ४०१ ३०५
दुरध्वनी - ०२५०-२५२५१०१/०२/०३/०४/०५/०६, फॅक्स ०२५०-२५२५१०७,
ई-मेल- vasaivirarcorporation@yahoo.com

प्रशासकीय ठराव क्र. ८३

विभाग: सामान्य प्रशासन
दिनांक २५/८/२०२०

**प्रस्तावाचा विषय:- गणेश विसर्जनासाठी साऊंड सिस्टीम मशीन खरेदी करणेबाबत येणाऱ्या खर्चास प्रशासकीय व वित्तीय मंजुरीबाबत.**

**प्रस्तावाचा मजकूर :-** वसई-विरार शहर महानगरपालिका क्षेत्रामध्ये गणेश विसर्जन सोहळा मोठया प्रमाणावर साजरा करण्यांत येतो. शहरामध्ये घरगूती गणेश मूर्ती व सार्वजनिक गणेश उत्सव मंडळांच्या गणेश मूर्तीचे विसर्जन मोठया प्रमाणावर करण्यांत येते.

सन २०२० मधील गणेश विसर्जन व्यवस्था शहरामध्ये खालील तारखांना करण्यांत येणार आहे.

| अ.क्र | दिनांक | विसर्जन दिवस |
|---|---|---|
| १. | २३/०८/२०२० | दिड दिवसाचे गणेश विसर्जन |
| २. | २६/०८/२०२० | पाच दिवसाचे गणेश विसर्जन |
| ३. | २७/०८/२०२० | जेष्ठ गौरी विसर्जन |
| ४. | २८/०८/२०२० | सात दिवसाचे गणेश विसर्जन |
| ५. | ०१/०९/२०२० | अनंत चतुदर्शी गणेश विसर्जन |

दरवर्षी शहरामध्ये सुमारे १०२ ठिकाणी विसर्जन होत असते. शासनाने यावर्षी कोविड-१९ ची साथ असल्याने प्रतिबंधात्मक उपाय योजना अंतर्गत साध्या पद्धतीने गणेश विसर्जन करण्याबाबत दिनांक ११/०७/२०२० अन्वये मार्गदर्शक सूचना शासनाने दिलेल्या आहेत. तसेच महानगरपालिकेने नागरीकांना साध्या पद्धतीने गणेश विसर्जन करण्याबाबत आव्हान केलेले आहे. याबाबत मा.आयुक्त तथा प्रशासक सो. यांनी दिनांक १३/०८/२०२० रोजी च्या विसर्जन व्यवस्था टिपणीस मान्यता देण्यात आली असून जावक क्र : व.वि.श.म/आ.का./५०/२०२०-२१ दिनांक १०/०८/२०२० रोजीचे आदेशा अन्वये गणेश विसर्जन व्यवस्थेसाठी ३१ ठिकाणे निश्चित केलेली आहेत. या ठिकाणी गर्दी होणार असल्याने भावीकांना सूचना देण्यांस ध्वनी क्षेपकाची आवश्यकता आहे. सदर ३१ ठिकाणी साधी साऊंड सिस्टीम १ एप्लीफायार, दोन भोंगे युनिट यंत्र इ. खरेदी करण्यासाठी मा.आयुक्त तथा प्रशासक सो. यांनी दि. १३/०८/२०२० रोजी खरेदी करण्यांस सुचना दिलेल्या आहेत.

सदर साधी साऊंड सिस्टीम १ एप्लीफायार, दोन भोंगे इ. खालीलप्रमाणे असुन पुरवठादाराने सवलतीचा दर दिलेला आहे. त्या दराने २५ नग मशीन संच खरेदी करणे आवश्यक आहे.

| अं. क्र | मशीनचा तपशिल | आवश्यक नग | दर प्रति नग सर्व करासहित | रक्कम |
|---|---|---|---|---|
| १. | एप्लीफायर विशाल कंपनी १६० वॅट मशिन | ३० नग | ८०२४ प्रती मशिन | २४०७२० |
| २. | अहूजा युनिट ६० | ६० नग | १२२५ प्रती नग | ७३५०० |
| ३. | ट्रम्पेट १८ इंच (भोंगे) | ६० नग | ९५० प्रती नग | ५७००० |
| ४. | बेटा माईक वायर ५ मिटर वायर सहित | ३० नग | ७०० प्रती नग | २१००० |
| ५. | स्पीकर वायर बंडल | ३० नग | १२०० प्रती बंडल | ३६००० |
| | | | एकुण | ४,२८,२२०/- |

तसेच सदरचा खर्च सन २०२०-२१ मधील तलाव व्यवस्थापनाअंतर्गत देव देवतांच्या मुर्ती विसर्जन तराफे दुरुस्ती या लेखाशिर्ष अंतर्गत करण्यात येईल.

तरी उपरोक्त मशिन महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियम कलम ६७(३) क अन्वये मा.आयुक्तांचे अधिकार व कर्तव्य नुसार विना निविदा तात्काळ विक्रेते में.साईनाथ साऊंड सिस्टीम यांचे कडून थेट तात्काळ खरेदी करण्यांस येणाऱ्या रक्कम रु. ४,२८,२२०/- खर्चास मा. आयुक्त तथा प्रशासक यांचे प्रशासकीय व वित्तीय मंजुरीस्तव सादर.

**ठराव:-** सदर साऊंड सिस्टीम मशीन गणेश विसर्जनासाठी आवश्यक आहे. तरी उपरोक्त प्रस्तावा मधील वरील नमुद आवश्यक मशिन तात्काळ में.साईनाथ साऊंड सिस्टीम हयाच्यांकडून विना ई निविदा खरेदी करणेकामी महानगरपालिका अधिनियम कलम ६७(३)(क) अन्वये मला प्राप्त असलेल्या अधिकारानुसार गणेश विसर्जनासाठी साऊंड सिस्टीम मशीन खरेदी करणेकामी येणाऱ्या रक्कम रु. ४,२८,२२०/- (अक्षरी चार लक्ष अठ्ठावीस हजार दोनशे वीस मात्र) खर्चास प्रशासकीय व वित्तीय मान्यता देण्यात येत आहे.

आयुक्त तथा प्रशासक
वसई विरार शहर महानगरपालिका

# वसई विरार शहर महानगरपालिका

**मुख्य कार्यालय, विरार पुर्व, जि.- पालघर, पिन नं. ४०१३०५**

दुरध्वनी -०२५०-२५२५१०१/०२/०३/०४/०५/०६, फॅक्स ०२५०-२५२५१०७,

ई-मेल- vasaivirarcorporation@yahoo.com


प्रशासकीय ठराव क्र. ८४

विभाग:- माहिती तंत्रज्ञान

दिनांक:- २८/०८/२०२०

प्रस्तावाचा विषय:- वसई विरार शहर महानगरपालिकेतील स्थालांतरीत होणाऱ्या प्रभाग समिती 'ई' तसेच प्रभाग समिती 'बी' कार्यालयात कार्यालयीन कामकाजासाठी संगणक संच खरेदी करणे कामी लघुत्तम दर मंजुर करुन निविदाकाराबारोबर संविदा करणेस व कार्यादेश देणेस मंजूरी मिळणे बाबत.

प्रस्तावाचा मजकूर :- वसई विरार शहर महानगरपालिकेतील स्थालांतरीत होणाऱ्या प्रभाग समिती 'ई' तसेच प्रभाग समिती 'बी' कार्यालयात कार्यालयीन कामकाजासाठी संगणक संच, यु.पी.एस, ब्लॅक अॅण्ड व्हाईट प्रिंटर, कलर प्रिंटर व स्कॅनर निविदा प्रक्रियाद्वारे खरेदी करणे कामी दि. ११/०७/२०२० रोजीच्या टिपणी नुसार मा.आयुक्त सो यांची प्रशाकसीय व वित्तीय मंजूरी घेऊन निविदा क्र (Bid no.) GEM/२०२०/B/७०८३३९ अन्वये दि. १३/०७/२०२० रोजी पसून ते दि. २३/०७/२०२० रोजी पर्यंत निविदा प्रसिद्ध करण्यात आली होती.

सबब विहीत मुदतीत एकूण चार निविदा प्राप्त झाल्या असून मा. निविदा समितीच्या दि.२८/०८/२०२० रोजीच्या मंजूरी अन्वये पात्र निविदारकारांचा वित्तीय बाबींचा लखोटा क्र. २ उघडणेस मंजूरी घेण्यात आली. त्याअनुषंगाने पात्र निविदाकारांचा लखोटा क्र. २ उघडण्यात आला असून प्राप्त दरांचा तुलनात्मक तक्ता खालील प्रमाणे आहे.

| अ.क्र | तपशील | All IN ONE PC | | |
|---|---|---|---|---|
| | | नग | प्रति नग रक्कम | एकूण |
| १ | **VINEET ENTERPRISES** | **२५** | **रु. ३३,९५०/-** | **रु. ८,४८,७५०/-** |
| २ | SUN SYSTEM | २५ | रु. ३४,१५०/- | रु. ८,५३,७५०/- |
| ३ | AGRO EXPERT COMPANY | २५ | रु. ३५,९००/- | रु. ८,९७,५००/- |

वरील प्राप्त दरांची बाजारभावाशी तुलना केली असता मे. VINEET ENTERPRISES या कंपनीचे दर तुलनात्मकरित्या कमी व वाजवी अूसन सदर प्राप्त दर दि.१०/०८/२०२० रोजीच्या निर्णया अन्वये मा.निविदा समितीने मंजूर केले असून पुढील मंजूरीस्तव मा. प्रशासक तथा आयुक्त सो! यांच्या मंजूरीस्तव ठेवणेस शिफारस केली आहे. त्याअनुषंगाने मे. VINEET ENTERPRISES यांचे प्राप्त दर मंजूर करुन निविदाकाराबारोबर संविदा करणेस व कार्यादेश देणेस मा. प्रशासक तथा आयुक्त सो! यांच्या मंजुरीस्तव सादर.

ठराव :- वसई विरार शहर महानगरपालिकेतील स्थालांतरीत होणाऱ्या प्रभाग समिती 'ई' तसेच प्रभाग समिती 'बी' कार्यालयात कार्यालयीन कामकाजासाठी संगणक संच खरेदी करणे कामी लघुत्तम निविदाकार मे. VINEET ENTERPRISES यांचे दर मंजूर करुन, संविदा करणेस व कार्यादेश देणेस प्रशासकीय व वित्तीय मान्यता देण्यात येत आहे.

20/8/2020

(गंगाथरन डी.)

प्रशासक तथा आयुक्त

वसई विरार शहर महानगरपालिका

# वसई विरार शहर महानगरपालिका

मुख्य कार्यालय, विरार पुर्व, जि.- पालघर, पिन नं. ४०१३०५
दुरध्वनी -०२५०-२५२५१०१/०२/०३/०४/०५/०६, फॅक्स ०२५०-२५२५१०७,
ई-मेल- vasaivirarcorporation@yahoo.com

प्रशासकीय ठराव क्र. ८५

विभाग:- माहिती तंत्रज्ञान
दिनांक:- २८/०८/२०२०

प्रस्तावाचा विषय:- वसई विरार शहर महानगरपालिकेतील स्थालांतरीत होणाऱ्या प्रभाग समिती 'ई' तसेच प्रभाग समिती 'बी' कार्यालयात कार्यालयीन कामकाजासाठी ब्लॅक अॅण्ड व्हाईट प्रिंटर खरेदी करणे कामी लघुत्तम दर मंजुर करुन निविदाकाराबारोबर संविदा करणेस व कार्यादेश देणेस मंजूरी मिळणे बाबत.

प्रस्तावाचा मजकूर :- वसई विरार शहर महानगरपालिकेतील स्थालांतरीत होणाऱ्या प्रभाग समिती 'ई' तसेच प्रभाग समिती 'बी' कार्यालयात कार्यालयीन कामकाजासाठी ब्लॅक अॅण्ड व्हाईट प्रिंटर निविदा प्रक्रियाद्वारे खरेदी करणे कामी दि. ११/०७/२०२० रोजीच्या टिपणी नुसार मा.आयुक्त सो यांची प्रशाकसीय व वित्तीय मंजूरी घेऊन निविदा क्र (Bid no.) GEM/२०२०/B/७११५१५ अन्वये दि. १५/०७/२०२० रोजी पसून ते दि. २५/०७/२०२० रोजी पर्यंत निविदा प्रसिद्ध करण्यात आली होती.

सबब विहीत मुदतीत एकूण सोळा निविदा प्राप्त झाल्या असून मा. निविदा समितीच्या दि.०८ /०८/२०२० रोजीच्या मंजूरी अन्वये पात्र निविदारकारांचा वित्तीय बाबींचा लखोटा क्र. २ उघडणेस मंजूरी घेण्यात आली. त्याअनुषंगाने पात्र निविदाकारांचा लखोटा क्र. २ उघडण्यात आला असून प्राप्त दरांचा तुलनात्मक तक्ता खालील प्रमाणे आहे.

| अ.क्र | तपशील | Black & White PRINTER | | |
|---|---|---|---|---|
| | | नग | प्रति नग रक्कम | एकूण |
| १ | VINEET ENTERPRISES | २० | रु. ८,५००/- | रु. १,७०,०००/- |
| २ | SUN SYSTEM | २० | रु. ९,१५०/- | रु. १,८३,०००/- |
| ३ | AGRO EXPERT COMPANY | २० | रु. ९,२५०/- | रु. १,८५,०००/- |

वरील प्राप्त दरांची तुलना केली असता में. VINEET ENTERPRISES या कंपनीचे दर तुलनात्मकरित्या कमी व वाजवी अूसन सदर प्राप्त दर दि.21/08/२०२० रोजीच्या निर्णया अन्वये मा.निविदा समितीने मंजूर केले असून पुढील मंजूरीस्तव मा. प्रशासक तथा आयुक्त सो! यांच्या मंजूरीस्तव ठेवणेस शिफारस केली आहे. त्याअनुषंगाने में. VINEET ENTERPRISES यांचे प्राप्त दर मंजूर करुन निविदाकाराबारोबर संविदा करणेस व कार्यादेश देणेस मा. प्रशासक तथा आयुक्त सो! यांच्या मंजुरीस्तव सादर.

ठराव :- वसई विरार शहर महानगरपालिकेतील स्थालांतरीत होणाऱ्या प्रभाग समिती 'ई' तसेच प्रभाग समिती 'बी' कार्यालयात कार्यालयीन कामकाजासाठी प्रिंटर खरेदी करणे कामी लघुत्तम निविदाकार में. VINEET ENTERPRISES यांचे दर मंजूर करुन, संविदा करणेस व कार्यादेश देणेस प्रशासकीय व वित्तीय मान्यता देण्यात येत आहे.

वसई-विरार शहर महानगरपालिका
सचिव

(गंगाथरन डी.)
प्रशासक तथा आयुक्त
वसई विरार शहर महानगरपालिका

वसई - विरार शहर महानगरपालिका
मुख्य कार्यालय, विरार पुर्व, जि- पालघर, पिन नं.-४०१ ३०५
दुरध्वनी -०२५०-२५२५१०१/०२/०३/०४/०५/०६, फक्स -०२५०-२५२५१०७
ई-मेल - vasaivirarcorporation@yahoo.com

प्रशासकीय ठराव क्र. :- ८६ विभाग :-वाहन
दिनांक :-३१।०८।२०२०

**प्रस्तावाचा विषय - सन २०२०-२१,२०२१-२२ व २०२२-२३ ह्या तीन वित्तिय वर्षासाठी**
**१) महानगरपालिकेस भाडेतत्वावर मनुष्यबळासहीत वाहने पुरवठा करणे ,**
**२) अतिक्रमण तोड कारवाईसाठी मनुष्यबळासहित यंत्रसामुग्री पुरवठा करणे ,**
**३) महापालिका मालकीची वाहने दुरुस्ती करुन घेणे या तीनही ई- निविदा प्रक्रिया पुर्ण होईपर्यंत मागील मंजुर निविदाधारकास देण्यात आलेल्या मुदतवाढीस कार्योत्तर व अंतिम मंजुरी मिळणेबाबत.**

प्रस्तावाचा मजकुर :- वसई विरार शहर महानगरपालिकेच्या मुख्य कार्यालयाकडील वाहन विभागामार्फत महापालिकेच्या सर्व प्रभाग समितींना व विविध विभागांना मनुष्यबळासहीत वाहन पुरवठा करणे, मनुष्यबळासहीत यंत्रसामुग्री पुरवठा करणे व महापालिका मालकीच्या वाहनांची देखभाल दुरुस्ती करणे या तीनही ई- निविदेची मुदत ही दि. ३१ मार्च २०२० रोजी पर्यंत होती. सदर तीनही कामाचा तपशील खालीलप्रमाणे :-

| अ.क्र. | ई-निविदेचे नाव | मंजुर निविदा धारकाचे नाव | कार्यादेश दिल्याचा दिनांक | कार्यादेश संपल्याचा दिनांक |
|---|---|---|---|---|
| १ | महापालिकेस आवश्यकतेनुसार मनुष्यबळासहीत भाडेतत्वावर वाहने पुरवठा करणे | मे. बरकत कॉन्ट्रक्टर | २४ जानेवारी २०१८ | ३१ मार्च २०२० |
| २ | महापालिकेस आवश्यकतेनुसार मनुष्यबळासहीत भाडेतत्वावर यंत्रसामुग्री पुरवठा करणे | मे. बी.ए. ट्रेडर्स | ३० मार्च २०१९ | ३१ मार्च २०२० |
| ३ | महापालिकेच्या मालकीच्या वाहनांची देखभाल दुरुस्ती करणे | मे. के एल एंटरप्रायजेस | २९ जून २०१९ | ३१ मार्च २०२० |

उपरोक्त तक्त्यात नमुद केल्याप्रमाणे वाहन विभागाकडील तीनही निविदेची मुदत दि. ३१ मार्च २०२० रोजी संपुष्टात आलेली आहे. पुढील त्रैवार्षिक वित्तीय वर्षाकरीता मा. सर्वसाधारण सभा ठराव क्र. २३,२४,२५ दिनांक २०/०२/२०२० अन्वये ई- निविदा प्रक्रिया राबविणेस प्रशासकीय व वित्तीय मंजुरी प्राप्त झाली. प्राप्त मंजुरीच्या अनुषंगाने तिनही ई - निविदेची कार्यवाही सुरु आहे.

संपुर्ण देशात कोरोना वायरस (कोव्हिड १९) या आजाराने थैमान घातले आहे. कोरोना वायरस (कोव्हिड १९) वाढता प्रादुर्भाव लक्षात घेता दिनांक २२/०३/२०२० पासुन संचारबंदी लागू करण्यात आली आहे. त्याचबरोबर देशातील कोरोना वायरस (कोव्हीड-१९) चा संसर्ग दिवसेंदिवस वाढत आहे. नागरिकांमध्ये संसर्ग वाढु नये याबाबत वेळीच वेगवेगळी उपाययोजना शासनामार्फत केल्या जात आहे. उपाययोजनामध्ये महापालिका मालकीच्या रुग्णवाहीका अद्यावत ठेवणे आवश्यक होते. त्याबरोबर देशात संचारबंदी व टाळेबंदी लागु करण्यात आल्यामुळे सार्वजनिक वाहतुक सेवा पुर्णपणे ठप्प आहे. करीता महापालिकेमार्फत भाडेतत्वावर घेण्यात आलेल्या वाहनांमार्फत कोव्हीड-१९ बाबतच्या अनुषंगिक कामे करणेकरीता तसेच शहरात साफसफाई ठेवणे व इतर अनुषंगिक कामे करणेकरीता यंत्रसामुग्री भाडेतत्वावर घेणे तितकेच आवश्यक होते. त्यामुळे ई-निविदा प्रक्रिया पुर्ण होईपर्यंत मागील संबंधित ठेकेदाराला मुदतवाढ देणे आवश्यक आहे.

तरी महापालिकेस आवश्यकतेनुसार मनुष्यबळासहीत भाडेतत्वावर वाहने पुरवठा करणे, महापालिकेस आवश्यकतेनुसार मनुष्यबळासहीत भाडेतत्वावर यंत्रसामुग्री पुरवठा करणे, महापालिकेच्या मालकीच्या वाहनांची देखभाल दुरुस्ती करणेकामास मागील मंजूर ठेकेदारांना कार्योत्तर मुदतवाढ देणेस सदरचा प्रस्ताव मा. आयुक्त तथा प्रशासक यांचेकडे अंतिम मंजूरीस सविनय सादर.

**ठराव :-** महापालिकेस आवश्यकतेनुसार मनुष्यबळासहीत भाडेतत्वावर वाहने पुरवठा करणे, महापालिकेस आवश्यकतेनुसार मनुष्यबळासहीत भाडेतत्वावर यंत्रसामुग्री पुरवठा करणे, महापालिकेच्या मालकीच्या वाहनांची देखभाल दुरुस्ती करणेकामास मागील मंजूर ठेकेदारांना पुढील ई-निविदा प्रक्रिया पूर्ण होईपर्यंत मुदतवाढ देणेस कार्योत्तर व अंतिम मंजूरी देणेत येत आहे.

आयुक्त तथा प्रशासक

वसई विरार शहर महानगरपालिका